म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. ९९२

# हिंदुस्थानांतील आमच्या ठिकठिकाणच्या

# सफरी

राजा रघुनाथराव शंकरराव पंडित, पंतसचिव

REFBK-0000572

हिंदुस्थानांतील आमच्या ठिकठिकाणच्यां सफरी

# सफर पहिली

सन १९०९

४७२

राजा रघुनाथराव शंकरराव पंडित, पंतसचिव

REFBK-0000572

प्रकाशक–भालचंद्र हणमंत देशपांडे, बी.ए., एल्एल्.बी.
प्रायव्हेट सेक्रेटरी, नि. राजेसाहेब, भोर

सर्व हक्क ग्रंथकर्त्याचे स्वाधीन

मुद्रक–स. रा. सरदेसाई, बी.ए., एल्एल्.बी., व्यवस्थापक,
नवीन समर्थ विद्यालयाचा ' समर्थ भारत ' प्रेस, पुणें २.

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ प्रवासाच्या वाटेवर | १– ३ |
| २ बडोदा | ४–२२ |
| ३ अहमदाबाद | २३–३० |
| ४ अबूचा पहाड | ३१–४३ |
| ५ अजमीर | ४४–५० |
| ६ जयपूर | ५१–६७ |
| ७ भरतपूर | ६८–६९ |
| ८ आग्रा | ७०–९३ |
| ९ मथुरा | ९४–९९ |
| १० सिमला | १००–१०७ |
| ११ बनारस | १०८–१११ |
| १२ अयोध्या | ११२–११४ |
| १३ पुन: काशी | ११५–११६ |
| १४ भोरास परत | ११७–११८ |
| १५ उपसंहार | ११९–१२० |
| परिशिष्ट (अ) | १२१ |
| परिशिष्ट (ब) | १२२–१२४ |

# चित्रानुक्रमणिका


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| १. श्रीमंत राजेसाहेब भोर ... ... ... | |
| २. नजरबाग राजवाडा, बडोदें ... ... ... | ६ |
| ३. आमचा ग्रुप फोटो ... ... ... | २० |
| ४. दिलवाडा देवळाचें अंतरंग, अबूचा पहाड ... ... | ३६ |
| ५. अनासागर तलाव, अजमीर ... ... ... | ४६ |
| ६. शहराचा सामान्य देखावा, जयपूर ... ... | ५३ |
| ७. अंबर येथील आरसेमहालाचें अंतरंग, जयपूर ... | ६० |
| ८. दिल्ली-दरवाजा किल्ला, आग्रा | ७२ |
| ९. राजवाड्यांतील स्नानखाना, आग्रा ... ... | ७६ |
| १०. सुमन अगर जॅस्मिन बुरूज, आग्रा ... ... | ७८ |
| ११. इतिमद्दौल्याची कबर, आग्रा ... ... ... | ८० |
| १२. ताजमहाल, आग्रा ... ... ... | ८१ |
| १३. ताजमहालचें अंतरंग, आग्रा ... ... ... | ८३ |
| १४. दिवाणी-खासमधील एक स्तंभ, फत्तेपूर शिक्री, आग्रा ... | ८६ |
| १५. शेख सलिम चिस्ती याची गुंबद, फत्तेपूर शिक्री, आग्रा ... | ८८ |
| १६. अकबराची कबर, शिकंदरा आग्रा ... ... | ९० |
| १७. सामान्य देखावा, मथुरा ... ... ... | ९४ |
| १८. घाटांतील आगगाडीच्या रस्त्याचें दृश्य, सिमला ... | १०० |
| १९. सामान्य देखावा, सिमला ... ... ... | १०२ |
| २०. श्रीक्षेत्र काशी येथील आमचें देऊळ ( श्रीशिवाशंकरेश्वर ) | १०९ |
| २१. श्रीविश्वेश्वराचें सुवर्ण-मंदिर, बनारस ... ... | १११ |
| २२. सामान्य देखावा, बनारस ... ... ... | ११४ |

# प्रकाशकाचे चार शब्द

जगांतील कोणतीहि सामान्य वा असामान्य गोष्ट घडून येण्यास ज्याप्रमाणें कांहींतरी कार्यकारणभाव असावा लागतो, त्याचप्रमाणें तिच्या प्रसिद्धीस योग्य त्या कालाची व प्रसंगाची जरुरी असते. श्रीमंत राजे रघुनाथराव बाबासाहेब यांनीं युवराजावस्थेंत केलेल्या प्रवासाचा समग्र वृत्तांत छापून प्रसिद्ध करण्याचा संकल्प करून त्यापैकीं प्रथम प्रवास-वृत्तांत छापल्यास सुमारें एक वर्षाचा अवधि लोटला. या प्रथम वृत्तांताचें मुद्रण होतांच त्याचें योग्य प्रकाशन व्हावयास एवढा अवधि लागावा यांत आश्चर्य वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. कारण, एकतर श्रीमंत राजेसाहेब यांचें हें वाङ्मयप्रांतांतील प्रथम पदार्पण असल्यामुळें आपलें लिखाण प्रकाशनक्षम झालें किंवा नाहीं, याबद्दल जिज्ञासा वाटणें साहजिकच आहे. या जिज्ञासापूर्तीकरितां श्रीमंत राजेसाहेब यांनीं पुस्तक छापून होतांच तें अभिप्रायार्थ अनेक वृत्तपत्रें, मासिकें व विद्वान् मित्रांकडे पाठवून त्यावर त्यांचे निर्भीड अभिप्राय मागविले. या सर्वांकडून त्यांचे समग्र अभिप्राय येण्यास एवढा कालावधि लागला. शिवाय, दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या प्रिय भारतवर्षाची राज्यघटना संक्रमणावस्थेंत असल्यामुळें, या परिस्थितीपासून श्रीमंत राजेसाहेब यांचें संस्थान अलिप्त असणें शक्य नाहीं, यामुळें आपल्या संस्थानच्या व संस्थानांतील प्रजेच्या कल्याणाच्या दृष्टीनें श्रीमंत राजेसाहेब यांचें लक्ष वेधल्यामुळें या प्रकाशनकार्यास विलंब झालेला आहे. परंतु, सुदैवानें श्री. रा. रा. न. चिं. केळकर, श्रीमंत माधवराव किबे, श्री. रा. रा. दत्तो वामन पोतदार यांच्यासारख्या प्रथितयश लेखकांनीं, ' केसरी ', ' ज्ञानप्रकाश ', ' नवा काळ ', ' मराठा ', ' महाराष्ट्र

साहित्य-पत्रिका ' वगैरेसारख्या श्रेष्ठ दर्जाच्या नियतकालिकांनीं व श्री. राजेसाहेब यांच्या सुहृद-संस्थानिकांनीं व इतर सन्मित्रांनीं श्रीमंत राजेसाहेबांच्या पुस्तकावर उत्कृष्ट व निवडक अभिप्राय देऊन श्रीमंतांच्या या वाङ्मयीन प्रथम प्रयत्नाचें कौतुक केलेलें, त्या त्या अभिप्राया-वरून कळून येईल, व त्यांवरून पुस्तकाची उपयुक्तता, उद्बोधकत्व व मनोरंजकत्व पटण्यासारखेंच आहे. सर्व अभिप्राय श्रीमंत राजेसाहेब यांच्या अवलोकनांत येऊन हें लिखाण प्रकाशित व्हावें अशी श्रीमंतांची आज्ञा झाल्यावरून व आम्हीं प्रथमारंभीं म्हटल्याप्रमाणें मध्यंतरींची संक्रमणावस्था संपण्याचा व मकरसंक्रमणाचा मंगल काल स्वाभाविक जुळून आल्यामुळें, आम्ही श्रीमंत राजेसाहेब यांचें हें पुस्तक मकरसंक्रमणा-सारख्या शुभदिनीं प्रकाशित करण्याची संधि घेत आहों व श्रीमंत राजेसाहेबांचें हें वाङ्मयीन प्रथम-पुष्प श्री. पंतसचिव घराण्याचें आद्य कुलदैवत सर्वशक्तिमान् प्रभु श्रीरामचंद्रचरणीं अर्पण करण्यास श्रीमंतांचे हातीं देत आहों.

प्रकाशकाला व्यक्तिमत्व म्हणून कांहींतरी असतेंच. तेव्हां, शेवटीं वैयक्तिकदृष्ट्या श्रीमंत राजेसाहेब यांनीं आपल्या या प्रयत्नांत आम्हांस अल्पांशानें कां असेना, सेवा करण्याची सुसंधि दिल्याबद्दल कृतज्ञता-पूर्वक उल्लेख करून हे चार शब्द संपवितों.

भोर
' मकरसंक्रमणदिन '
पौष शु॥ १, शके १८५८

श्रीमंतांचा नम्र सेवक,
**भा. ह. देशपांडे**
प्रायव्हेट सेक्रेटरी.

---

# अभिप्राय

महाराष्ट्र साहित्यपत्रिका                जानेवारी १९३६, अंक ४

सफर पहिली:—श्री. राजा रघुनाथराव शंकरराव पंतसचिव यांनीं इ. स. १९०९ मधील आपल्या पहिल्या " ज्ञानार्जन " सफरीचें हें छोटें प्रवासवर्णन सांप्रत लिहून प्रसिद्ध केलें आहे. यांत बडोदें, अहमदाबाद, अबू, जयपूर, भरतपूर, आग्रा, मथुरा, वृंदावन, सिमला, काशी, अयोध्या इत्यादि स्थळीं श्रीमंतांनीं युवराजावस्थेंत केलेल्या प्रवासाची हकीगत आहे. आपल्या या हकीगतीच्या वर्णनप्रसिद्धीचा उपयोग काय, याविषयींची मर्यादा श्रीमंतांनीं योग्य प्रकारें ओळखली आहे. त्रोटक असलें, तरी असल्या प्रसिद्ध स्थळांचें वर्णन वाचणें केव्हांहि बोधप्रद झाल्याशिवाय राहत नाहीं. त्यांतून ज्यांनीं हीं स्थळें स्वत: पाहिलीं, त्यांत पुन्हां प्रत्ययाचा आनंद अवश्यमेव झाल्याशिवाय राहत नाहीं. मग, लेखक कलावंत नसला तरीहि स्थळमाहात्म्यच इतकें जागृत असतें.

या छोटया वर्णनांतहि श्रीमंतांची धार्मिक मनोवृत्ति आणि गत-वैभवाविषयीं अभिमान यांचा प्रत्यय स्पष्टपणें उमटल्याशिवाय राहिला नाहीं.

हें प्रवासवर्णन सचित्र आहे. चित्रें चांगलीं छापलीं आहेत. यांतील कित्येक श्रीमंतांनीं स्वत: घेतलीं आहेत हें विशेष होय.

पुस्तकाची छपाई व बाह्यांग चांगलें आकर्षक आहे.

' इतिमादुद्दौला ' बद्दल हातिमद्दौला; जोधाबाई एकदां अकबराची तर एकदां जहांगीरची बायको, अशी कांहीं चुकीची माहिती राहून

गेली आहे. गुंबद ( गुंबझ ), मरि-याम-उल्-( उझ् )झमानी, अशा नांवाच्या चुका राहिल्या आहेत. पण, त्या क्वचितच. केळकरांनीं उपमा काळ्या भाताची घेतली नसून 'खिचडी'ची घेतली होती, कारण काळा भात याला कांहीं अर्थ नाहीं. असे दोष खरोखरच थोडे आहेत आणि पुढल्या भागांतून याविषयीं अधिक काळजी सहज घेतां येईल.

या प्रवासवर्णनाचा उपयोग प्रथम राजघराण्यांत साहजिकच अधिक होईल. नंतर संस्थानी प्रजेस त्याचें कुतूहल वाटून वाचन घडेल आणि सामान्य जन आणि प्रवासोत्सुक जे आहेत, त्यांस तर मिळेल तो ग्रंथ वाचून आढळेल ती विश्वसनीय माहिती संग्रहित करावयाची असते. अर्थात्, तेहीं हा ग्रंथ पाहिल्याशिवाय राहणार नाहींत.

श्री. राजेसाहेबांना अवश्य ती फुरसत मिळतांच आपला मूळ हेतू तडीस नेला, याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. पुढील, विशेषत: अनुभवांच्या भागाकडे आमचें विशेष लक्ष्य लागलेलें आहे, म्हणून हें कार्य लवकर समाप्त व्हावें अशी आमची सूचना आहे.

**संपादक.**

---

**लोकमान्य** ता. २८।४।३६

भोर संस्थानचे अधिपति श्रीमंत राजा रघुनाथराव पंडित यांनीं सन १९०९ सालीं उत्तर हिंदुस्थानांत जो प्रवास केला व जीं तेथील अनेक प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं, त्यांचें वर्णन प्रस्तुत पुस्तकांत केलेलें आढळून येतें. प्रवासवर्णनाच्या वेळीं फक्त मुद्याचीं टिपणें करून मागाहून त्याचा विस्तार केल्याचें आत्मनिवेदनांत नमूद केलें आहे. अर्थात,

तसें करतांना त्या त्या शहराचीं उपलब्ध असलेलीं दिग्दर्शक पुस्तकें ( Guides ) व कांहीं प्रवासात्मक पुस्तकें यांचा उपयोग लेखकांनीं केलेला असून पुस्तक शक्य तितकें माहितीपूर्ण व उपयुक्त करण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे, ही अभिनंदनाची गोष्ट होय. तसेंच, परदेशच्या प्रवासाचा दुर्दमनीय मोह आवरून खुद्द आपल्या जन्म-भूमींतीलच प्रेक्षणीय स्थळें पाहण्याचा श्रीमंतांचा निर्धार अभिनंदनीय नव्हे असें कोण म्हणेल? प्रवास हें करमणुकीचें साधन आहे असें आम्ही म्हणतोंच, पण त्यापेक्षांहि प्रवास केल्यानें मनुष्य चतुर होऊन त्याच्या मनास व्यापकत्व प्राप्त होतें. ठिकठिकाणचे लोक, त्यांच्या चालीरीती, निरनिराळे प्रदेश व त्यांतील सुंदर वस्तु या पाहण्यानें कलाविलास होऊन आपल्या व परदेशस्थ लोकांचा तौलनिक दृष्टीनें अभ्यास करतां येतो. कूपमंडूकवृत्ति जाण्यास प्रवास हाच एक मार्ग आहे. प्रवास केल्यानें आपल्यांतील संकुचितपणाचा दोष जाऊन मनास प्रगल्भता व आपल्या आवडीनिवडीला निराळें वळण लागतें, वगैरे उदात्त विचारांनीं प्रेरित होऊन श्रीमंतांनीं आपला प्रवास आरंभिलेला असल्यामुळें पुस्तकांतील वर्णनेंसुद्धां याच उदात्ततेनें केलेलीं आहेत, हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

प्रस्तुत पुस्तकांत मुंबईहून निघाल्यापासून बडोदें, अहमदाबाद, अबूचा पहाड, अजमीर, जयपूर, भरतपूर, आग्रा, मथुरा, सिमला, बनारस, अयोध्या, काशी वगैरे ऐतिहासिक व धार्मिक महत्त्वाचीं स्थळें श्रीमंतांनीं स्वतः नजरेखालीं घालून तेथील सुप्रसिद्ध गोष्टी पाहून व समजावून घेऊन कोणत्याहि प्रकारें ऐतिहासिक सत्याचा अपलाप न करतां सविस्तर वृत्तांत प्रस्तुत पुस्तकांत दिलेला असल्यामुळें प्रवासी लोकांना हें पुस्तक उपयुक्त होईल, याबद्दल आम्हांस मुळींच शंका

वाटत नाहीं. उत्तम कलापूर्ण वाङ्मयनिर्मिति हा या पुस्तकाचा जरी उद्देश नसला, तरी अभावितपणें वा होईना हें पुस्तक कलेच्या दृष्टीनें सुद्धा उत्कृष्ट झालेलें आहे. पुस्तक वाचतांना लेखकाचा सडेतोडपणा, त्याची स्थळाचें वर्णन मनोरंजक करण्याची हातोटी, प्रांजलपणा, वर्णनाची सूक्ष्मता, भाषेची सहजता वगैरे गुण प्रस्तुत पुस्तकांत बऱ्याच प्रमाणांत आढळून येत असल्यानें, प्रवासवर्णनपर पुस्तकांत एका संस्थानिकानें लिहिलेलें पुस्तक म्हणून पुस्तकाला मानाचें स्थान मिळाल्याशिवाय राहणार नाहीं, असें आम्हांस वाटतें.

सडेतोडपणा व प्रांजलपणा हे प्रस्तुत पुस्तकांतील गुणांचे मेरुमणीच होत. सडेतोडपणाचें एकच उदाहरण द्यावयाचें, तर तें " बडोदें स्टेशनवर उतरतांच श्री. गायकवाड यांच्या राजधानींत न शोभण्यासारखें तें लहानसें स्टेशन व स्टेशनाबाहेरील तो बकाल प्रदेश पाहून आमची निराशा झाली. " हें पहिलेंच वाक्य पाहा. यांत महाराजांची कोणत्याहि प्रकारें भीड न ठेवतां जें दिसलें तें प्रांजलपणें लिहावयाचें अशीच लेखकाची वृत्ति आढळून येते; आणि हाच प्रांजलपणा सर्वत्र दिसून येतो. हें वर्णन १९०९ सालचें आहे, हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें. मात्र १९३६ सालीं प्रसिद्ध होणाऱ्या या पुस्तकांत तत्संबंधीं अगदीं निराळाच मजकूर लिहिला जाणें आवश्यक होतें. कारण, गेल्या १६ वर्षांत इतर जगाप्रमाणेंच बडोद्याचीहि सर्वांगीण प्रगति झालेली असून निदान स्टेशन तरी आतां भव्य झालेलें आहे. अशाच प्रकारचे बदल इतर ठिकाणींहि झालेले असून १९०९ सालीं केलेलीं तत्कालीन परिस्थितीचीं वर्णनें, आजचीं सुधारलेलीं स्थळें डोळ्यापुढें ठेवून, बदललीं गेलीं असतीं, तर पुस्तकाला अद्ययावत्‌पणा आला असता. अर्थात्, हा एक मोठाच दोष प्रस्तुत पुस्तकांत राहून

गेला आहे. हा एक दोष सोडला, तर ब्याच प्रमाणांत प्रस्तुत पुस्तक उद्बोधक व मनोरंजक झालेलें असून, श्रीमंतांच्या प्रयत्नाचें व श्रमाचें सार्थक या पुस्तकानें झालेलें आहे, यांत शंकाच नाहीं.

पुस्तकांत त्या त्या ठिकाणचीं अशीं २२ आर्टपेपरवर छापलेलीं चित्रें दिलेलीं असून त्यांमुळें पुस्तकाच्या सौंदर्यांत व उपयुक्ततेंत भर पडलेली आहे. या पुस्तकांत पहिल्याच सफरीचें वर्णन आलेलें असून इतर सफरींचीं वर्णनें यथावकाश पुस्तकरूपानें प्रसिद्ध होणार आहेत. श्रीमंतांचा हा प्रयत्न स्तुत्य असून त्यांच्या विद्याभिरुचीचा निःसंशय द्योतक आहे. " विद्याभिरुची ज्यांना आहे असे संस्थानिक फक्त दोनच, एक श्रीमंत सरकार गायकवाड व दुसरे आम्ही," असें इंदूर साहित्यसंमेलन-प्रसंगीं अभिमानानें सांगणाऱ्या औंधकरांचें या तिसऱ्या संस्थानिकाकडे आम्ही लक्ष वेधितों.

प्रस्तुत पुस्तक विक्रीकरितां नसल्यामुळें पुस्तकाची किंमत अर्थातच दिलेली नाहीं.

---

**नवाकाळ** ता. १९-३-३६

पुण्यानजीकच्या भोर संस्थानचे हल्लींचे राजेसाहेब युवराज असतांना सन १९०९ सालीं फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला ते उत्तर हिंदुस्थानाच्या प्रवासास निघाले. एप्रिल महिन्याच्या अठराव्या तारखेला त्यांनीं आपली पहिली सफर पुरी केली. अशा जेमतेम दोन महिन्यांच्या अवधींत त्यांनीं आपली सर्व तीनहजार मैलांची मुशाफरी पार

पाडली. सदर मुशाफरींतील बडोदा, अहमदाबाद, आबू, अजमीर, जयपूर, भरतपूर, आग्रा, मथुरा, सिमला, बनारस, अयोध्या हे मुक्काम महत्त्वाचे म्हटले पाहिजेत. हीं सारीं ठिकाणें ऐतिहासिक, धार्मिक अथवा सामाजिक दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत; आणि सिमला हें निसर्गाच्या कृपेमुळें समाजांतील बड्या प्रकरणांचें उन्हाळ्यांतील निवासस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. आग्रा, अजमीर, जयपूर, भरतपूर हीं मानवी जीवनांतील कर्तबगारीनें होणाऱ्या भल्याबुऱ्या उलथापालथी-साठीं प्रेक्षणीय स्थळें असलीं, तर मथुरा, बनारस, अयोध्या हीं स्थानें तीर्थाचीं म्हणजे धार्मिक महतीचीं आहेत. मुसलमानाच्या धर्मवेडेपणानें या ठिकाणीं हिंदुसमाजाला उद्वेग वाटेल अशा आततायी कृत्यांच्या साक्षी असल्या, तरी राम, कृष्ण, शंकर यांच्या सगुण चरित्रांनीं पावन झालेली ही भूमी होय, अशी सात्त्विक भावना व हिंदूंचें हृदय उचंबळून सोडण्याचें सामर्थ्य अद्यापि या स्थळांच्या वातावरणांतून खचित आहे. १९०९ सालीं भोरच्या राजेसाहेबांनीं या ठिकाणचें दर्शन घेतलें. सुमारें ५०-५५ दिवसांच्या अवधींत जवळजवळ सवातीन हजार मैलांची दौड झाली हा हिशोब लक्षांत घरल्यास निरनिराळ्या स्थळांचें निरीक्षण कसें झालें असेल, हें कळण्यास उशीर लागत नाहीं. परंतु, प्रत्येक ठिकाणीं जें पाहिलें किंवा अनुभवलें त्याचा सर्व बारीकसारीक तपशील राजेसाहेबांनीं साध्या सरळ भाषेंत सांगण्याचा प्रयत्न केला असल्यामुळें पुस्तकाला चांगला भारदस्त आकार लाभला आहे. शाब्दिक चित्रणाला फोटोची जोड दिल्यानें पुस्तकाचें अवलोकनीयत्व वृद्धिंगत झालें आहे. संस्थानिकांचा प्रवास संस्थानिकाच्या थाटानें व्हावयाचा, सर्वत्र स्वागत सन्मान सज्ज, साधनाची कमतरता नाहीं, अशा रीतीनें घडणाऱ्या प्रवासांत अनुभवाचें वैचित्र्य आढळणें शक्य नाहीं. साधारणपणें

एकाच ठशाचे अनुभव ह्या पुस्तकांमध्यें दृष्टीस पडतात. मोठ्या दर्जाच्या मुशाफराला निरीक्षणस्वातंत्र्य बेताचेंच लाभतें. पण, प्रवासाच्या शास्त्रास अनुसरून प्रेक्षणीय स्थळांची माहिती आगाऊच संपादण्याची दक्षता ठेवल्यामुळें राजेसाहेबांना बऱ्याच मार्मिकपणानें आपला प्रवास करतां आला, असें पुस्तक वाचीत असतांना कळतें. पुस्तक छापण्याचा उद्देश, होतकरू मुशाफरांना साह्य व्हावें असा असून डायरेक्टरीप्रमाणें या पुस्तकाचा उपयोग करतां येईल. पण त्याबरोबर हें सुद्धां लक्षांत बाळगणें अवश्य आहे कीं, पुस्तकांतील माहिती एका पिढीच्या मागची आहे. प्रवासानंतरच्या सत्तावीस वर्षांत राजेसाहेबांनीं पाहिलेल्या प्रत्येक ठिकाणीं विलक्षण फरक झालेला आहे. प्रत्येक शहरानें नवें रूप धारण केलें आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं. तथापि, आपल्या संग्रहांतील ज्ञान बहुजन समाजाला द्यावें, अशा बुद्धीचे संस्थानिक फारसे दिसत नाहींत. ही उणीव लक्षांत घेतल्यास, भोरच्या राजेसाहेबांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाचें प्रत्येकास सादर कौतुकच वाटेल. आपण लेखनपटु आहों, अथवा अप्रतिहत योग्यतेचे मर्मज्ञ निरीक्षक आहों, अशा तऱ्हेच्या खोट्या अभिमानाला राजेसाहेबांच्या लिखाणांत कोठेंच थारा नाहीं, हा त्यांचा अकृत्रिम सरळपणा मोहक भासतो आणि राजेसाहेबांच्या हृदयाची ठेवण वाचकांच्या चित्तास पटवून घेण्याच्या दृष्टीनें हें पुस्तक वाङ्मयभक्ताला संग्राह्य वाटेल. पुस्तकाची छपाई चांगल्या प्रशस्त आकाराच्या कागदावर स्वच्छ केलेली आहे. बांधणी त्यास अनुरूप आहे. फोटोंचें मुद्रणही सुबक आहे.

**ज्ञानप्रकाश** ता. १३-३-३६

भोर संस्थानचे अधिपति श्रीमंत राजे बाबासाहेब पंतसचिव यांनीं हिंदुस्थानांत केलेल्या ठिकठिकाणच्या प्रवासवर्णनांचे वृत्तांत प्रसिद्ध करण्याचें योजिलें असून, उत्तर हिंदुस्थानांतील पहिली सफर नुकतीच प्रसिद्ध केली आहे.

या सफरी करण्यांत ज्ञानार्जन करणें हाच प्रधान हेतू होता, असें त्यांनीं आत्मनिवेदनांत म्हटलें आहे व या सफरीचे वृत्तांत पुरे झाल्या-वर, या दृष्टीनें ते आढावाहि घेणार आहेत. प्रस्तुतच्या पुस्तकांत फक्त प्रवासवर्णनात्मक वृत्तांतच देण्यांत आला आहे. वस्तुस्थितिनिदर्शक वर्णन करण्यांत इतर लोकांना प्रवास करतांना त्याचा उपयोग व्हावा, हाच त्यांचा उद्देश आहे. सदर पुस्तक वाचीत असतां, तो सफल झाला आहे असें म्हणण्यास कांहींही हरकत नाहीं. श्रीमंत बाबासाहेब हे या प्रवासाच्या वेळीं युवराज असल्यानें, जरी खुद्द संस्थानिकांना जेवढ्या इतमामानें वागणें जरूर असतें तितक्या काटेकोरपणानें त्यांना जरी वागणें लागलें नसलें, तरी पण त्यांच्या दर्जाप्रमाणेंच त्यांना वागणें भाग पडल्यामुळें खालच्या वर्गातील लोकांना प्रवासामध्यें काय काय गैरसोयी असतात याची कल्पना व साधारण मनुष्याच्या जीवनाचा अनुभव त्यांना इच्छा असतांना देखील घेतां आला नाहीं; तरी पण सर्वसाधारण मनुष्याला ज्या कांहीं गोष्टी पाहावयास मिळत नाहींत त्या त्यांना पाहावयास मिळाल्यानेंच त्यांचें वर्णन या ग्रंथांत आल्यानें, इतर प्रवासवर्णनांच्या मानानें या ग्रंथांत तें वैशिष्ट्य राहतेंच.

श्रीमंत बाबासाहेब यांनीं प्रवास-वर्णनाचा आरंभ बडोद्याहून केला असून तेथील बागबगीचे व राजवाडे यांचीं वर्णनें वाचून बडोदें सरकारच्या

वैभवाची साक्ष पटते. बडोद्याहून अबूचा पहाड, तेथील देवालयें, अजमीर व जयपूर या शहरांतील प्रेक्षणीय स्थळें अवलोकन करीत, ते आग्र्यास जाऊन पोंचले. आग्र्यांतील प्रेक्षणीय स्थळांची माहिती नवीन जाणाऱ्याला उपयुक्त दिली आहे. आग्र्याहून मथुरा-वृंदावनला जाऊन सिमल्याला ते गेले. तेथील सृष्टिशोभेचें वर्णनहि यथातथ्य रेखाटलें आहे. सिमल्याहून बनारस व अयोध्या हीं शहरें पाहून श्रीमंत बाबासाहेब भोरास परत आले. त्यांनीं भेटी दिलेल्या सर्व शहरांतील प्रेक्षणीय स्थळांची साधार माहिती घेऊन दिलेली आहे व मधूनमधून फोटो घातल्यानें पुस्तकाच्या आकर्षकतेंत भर पडली आहे. पण, या पुस्तकांतील मुख्य ढोबळ दोष म्हणजे त्यांतील प्रवासवर्णन पंचवीस वर्षांपूर्वीचें आहे. पंचवीस वर्षां-पूर्वीं बडोदें स्टेशनवर उतरल्यावर दिसणारें दृश्य आज खास दिसणार नाहीं. बडोदें शहराचे गलिच्छ वस्तीसंबंधांतील वर्णनहि आज अस्थानीं होईल. तोच प्रकार सिमल्याचा होतो. पंचवीस वर्षांपूर्वीं व्हाइसरीगल लॉजमध्यें कौन्सिल बैठक भरत असे, पण आतां स्वतंत्र कौन्सिल चेंबर बांधण्यांत आल्यामुळें, तें वर्णन तितकेंसें लागू पडत नाहीं. त्याचप्रमाणें सिमल्याचा बाजार वगैरे ठिकाणांतहि आतां बदल झाला आहे. दुसरा एक दोष म्हणजे, हें वर्णन दर तारखेचें टिपण देऊन केलेलें नसतांहि कित्येक ठिकाणीं मधून मधून " आज पाऊस पडत होता " अशीं वाक्यें आलीं आहेत, तीं असंबद्ध वाटतात. त्या वेळच्या डायरींतील टिपण जसेंच्या तसेंच उद्धृत केल्यामुळें हा दोष राहून गेला असावा. पुढील प्रवास-वर्णनाच्या वृत्तांतांत हा दोष टाळतां आल्यास बरें होईल.

श्री. रा. रा. **नरसिंह चिंतामण केळकर**, B.A., LL.B.,
संपादक व संचालक केसरी, पुणें

**केसरी** तारीख २५।२।३६

राजा रघुनाथराव शंकरराव पंडित, पंतसचिव, संस्थानाधिपति, भोर, यांनीं सन १९०९ सालीं उत्तर हिंदुस्थानांत कांहीं थोडा प्रवास केला. त्यांत त्यांनीं बडोदें, अहमदाबाद, अबू, अजमीर, जयपूर, भरतपूर, आग्रा, मथुरा, सिमला, बनारस व अयोध्या इत्यादि प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. त्या प्रवासाचें सुमारें १२५ पानांचें वृत्त व वर्णन हल्लीं त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. पुस्तकाचें बाह्यांग व आंतील छाया-चित्रांचें अलंकरण हें किती चांगलें झालें असेल, हें सांगण्याचें कारण नाहीं. कारण, स्वतः राजानें लिहिलेलें पुस्तक छापलें. त्याला मूर्तिमंत राजाश्रयच लाभलेला आहे. परंतु, या पुस्तकाचा गुण केवळ बाह्यांग हा नसून, त्यांतील प्रेक्षणीय स्थळांची व क्षेत्रांची उपयुक्त माहिती ही होय. आत्मनिवेदनांत ग्रंथकर्त्यानें योग्य तो विनय दाखविला आहे. तथापि संस्थानिकांकडून निर्माण होणाऱ्या ग्रंथाकडे वाचकहि जाणत्या दृष्टीनेंच पाहतात. म्हणजे, त्यांत सराईत साहित्यकांचा कलाविलास न दिसला तरी लेखनकलेविषयीं आदर व प्रेम दिसून येतें तें ग्राह्य मानून तितक्यापुरतें तरी ते लेखकाचें अभिनंदन करतातच.

अशा प्रवासवर्णनांतून येणारी हकीगत बहुधा तीच असली, तरी तिला नेहमीं नव्या लेखकाप्रमाणें नवे वाचकहि मिळतात. शिवाय प्रवासाची दृष्टी स्थलवर्णनासंबंधानें थोडीबहुत वेगळी असतेच. या-मुळेंहि त्याच स्थळांच्या वर्णनाचे नवे ग्रंथ मनोरंजक होऊं शकतात. असो. सदर ग्रंथाला 'सफर पहिली' हें नांव ग्रंथकर्त्यानें दिलें आहे, तें

अर्थातच सहेतुक दिसतें. कारण, श्रीमंत बाबासाहेब यांनीं १९०९ नंतर खुद्द विलायतेचाहि प्रवास केलेला आहे. यामुळें यानंतरच्या सफरींचा वृत्तांतहि तें असाच लिहून छापून काढतील असें वाटतें. तसें झाल्यास चांगलेंच होईल. प्रस्तुतचें वर्णन वाचतांना स्वतः ग्रंथकर्त्या-बरोबरच आपण प्रवास करून प्रेक्षणसौख्य भोगीत आहों कीं काय असें वाटतें, इतकें तें वर्णन साधें व सुबोध आहे.

---

श्रीमंत सरदार **माधवराव किबे**, M.A., मेंबर, कौन्सिल, इंदोर स्टेट

श्री

सरस्वतीनिकेतन,

इंदोर, ता. २१।७।३६

श्रीमंत राजे रघुनाथराव शंकरराव उर्फ बाबासाहेब पंडित पंतसचिव स्वामींचे सेवेसी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष.

आपलें १४ जुलैचें पत्र व आपल्या " हिंदुस्थानांतील ठिक-ठिकाणच्या सफरी–सफर पहिली " या पुस्तकाची आपण कृपा करून पाठविलेली प्रत पावली. त्याबद्दल मी फार आभारी आहें.

हें पुस्तक प्रसिद्ध झाल्याचें वर्तमानपत्रांत वाचलें होतें व त्याविषयींचा अनुकूल अभिप्रायहि वाचण्यांत आला होता; व तेव्हांपासून तें वाचण्यास मिळावें अशी इच्छाहि होती. ती आपल्या कृपेनें पूर्ण झाली म्हणून अधिक आनंद होत आहे.

श्रीमंतांनीं पुस्तकाच्या प्रस्तावनेंत त्याच्या चांगुलपणाविषयीं शंका प्रदर्शित केली होती, ती बरोबर नाहीं असें हें पुस्तक वाचून माझें

ठाम मत झालें. या पुस्तकांत ज्या ज्या शहरांचीं वर्णनें आलीं आहेत, तीं सर्व शहरें मीं पाहिलीं असल्यामुळें आपल्या मार्मिक निरीक्षणाचा व विषय-वर्णनाचा मनावर मोठा परिणाम झाला आहे, व इतरांसहि तसें वाटेल यांत संशय नाहीं.

पुस्तक उपयुक्त व सर्वांगसुंदर झाल्यानें त्यानें मराठी वाङ्मयांत एका चांगल्या ग्रंथाची भर घातली आहे, हें निःसंशय आहे. त्याच्या वाचनानें इतर सफरींचीं वर्णनेंहि लवकर हातीं येवोत अशी उत्सुकता वाढत आहे.

पुन्हां एकदां अगत्यपूर्वक हें पुस्तक पाठविल्याबद्दल मनःपूर्वक आभार मानतों. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

---

श्री. रा. रा. **दत्तो वामन पोतदार**, बी.ए.,
प्रोफेसर, सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें

श्री

फाल्गुन शुद्ध १।७
पुणें, २२-२-३६

श्रीमंत राजा रघुनाथराव बाबासाहेब पंतसचिव, संस्थान भोर, स्वामींचे सेवेसी,

पोष्य दत्तो वामन पोतदार, मुक्काम पुणें, याचा कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विशेष.

प्रवास–सफर पहिली–हें पुस्तक भेट पाठविलें, तें पावलें. सर्व वाचून टाकलें. पुस्तकाच्या प्रस्तावनेंत त्याच्या मर्यादा श्रीमंतांनीं स्पष्ट केल्या आहेत, तेव्हां त्यांतील उणीवा ध्येयदृष्टीनें सांगण्यास कारणच उरलें नाहीं. जें पाहिलें, तें श्रीमंतांनीं लागलेंच नोंदून ठेवून आज ती

माहिती ग्रंथनिविष्ट केली, हें श्रीमंतांस भूषणावह आहे. श्रीमंतांची धार्मिक वृत्ति आणि गतवैभवाविषयींचा अभिमान व खेद हीं दोन्ही या ग्रंथांत स्पष्ट दिसतात. उगाच पाल्हाळही नाहीं. या ग्रंथाचा घराण्यास उपयोग विशेष होतो. तें सचित्र आहे व छपाई चांगली झाली आहे, यामुळें ग्रंथ दिसण्यास नयनमनोहर झाला आहे. अनुभवाचा भाग मी महत्त्वाचा समजतों. परंतु, तो पुरेंच आहे. सबब, त्याबद्दल इतक्यांत कांहीं लिहितां येत नाहीं.

ग्रंथांत चुका विशेष कोठें आढळल्या नाहींत. थोड्या आढळल्या, पण त्या विशेष महत्त्वाच्या नाहींत. उदाहरणार्थ, ' हतिमदौला '-बद्दल ' इतिमाउद्दौला ' असें पाहिजे ( आग्रावर्णन ). जोधाबाई एकदां अकबर-पत्नी व एकदां जहांगीर-पत्नी असें पडलें आहे. परंतु, हा घोटाळा इतर ग्रंथांतहि आहे. एक दोन जागीं वाक्याचा नीट अर्थ होत नाहीं. कांकरिया तलाव हा ३०-३५ बाजूंनीं वेष्टित आहे, म्हणजे काय ? एक जागीं ' आम्ही ' हा शब्द दुबार पडला आहे. 'महमूद बघेदा' (रा: असें म्हणणें अधिक युक्त आहे. ' सारखेज ' कीं ' सरखेज ' ? असे कांहीं प्रश्न आहेत, पण ते सारे किरकोळ आहेत.

श्रीमंतांनीं हें काम हातीं घेतल्याबद्दल मी श्रीमंतांचें अभिनंदन करितों, आणि मजला एक प्रत नजर केल्याबद्दल फार आभार प्रगट करितों. हो, आठवलें. श्री. नरसोपंत केळकरांचे विधानांत " काळा भात " म्हटलें आहे, तेथें " खिचडी " पाहिजे असें मला वाटतें.

कळावें, सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

---

**The Mahratta**

*A Raja Writes About His Travels*

**A Finely Illustrated Volume**

It is rarely that a ruling Raja takes delight in joining the ranks of authors of books. The Raja-sahib of Bhor is however an exception. The book, which he has written in Marathi, shows that he wields an effective and impressive pen. The books of travel describing various cities fail many a time to rouse any interest; but the Rajesahib, although he lays no claims to any special gifts, has made this book an interesting one. He has a wide range of vision and an appreciation of works of art. The chapters on Baroda, Abu, Agra make an interesting reading. Ample human touches that show his mind and heart are also not wanting. His description of Ayodhya and Mathura and Benares are instances in point. The photo-blocks given in the book are treasures by themselves.

The book is a fine specimen of superb printing. It will be widely read and appreciated in Maharashtra and will whet the expectation for further volumes which are to follow this. We congratulate the Raja-sahib for bringing out this splendid book.

D. V. G.

---

**The Annals of the Bhandarkar Oriental Research Institute, Poona**

Travel undertaken for travel's sake has a charm of its own, especially when such travel is properly planned out by men of means and enjoyed with an appetising relish and care-free mind. The volume under review is a record of such travel carried out by Shrimant Rajesaheb of Bhor between 20th February and 18th April 1909 and is well-illustrated, containing not less than 20 beautiful pictures of important and historical places and architectural buildings visited during the travel. The book is mainly descriptive and as such would prove useful to educated persons feeling any zest for long-distance travel. For those, however, who cannot afford to undertake such a travel the book can provide much entertaining reading matter if they bring some imagination to bear on their reading of the book and put themselves in the position of the author-traveller.

It is difficult to find in modern travel books that free criticism of men and things characteristic of the travel-books written by old travellers like Marco Polo or Manuci, because it results from a natural self-abandon and complete identity of the observer and the observed, we mean the panorama of life through which he is dragged by the insatiable zest for travel.

In the case of persons of rank the difficulty is greater still as admitted by Raje Saheb in his introductory remarks.

Every attempt has been made to make the present volume as neat and attractive as possible in point of printing and get-up. As an earnest of the future volumes in the series promised by Raje Saheb the present volume is an admirable token of the cultured taste of the author. We would, however, like to make one suggestion with regard to the illustrations to be included in the future volumes in the proposed series, Reproductions from standardised pictures if included in a book of travel divest it of novelty and charm which generally attend a picture produced for the first time. Such reproductions, howsoever beautiful in themselves take away from a publication that touch of individuality which is rightly considered to be the very soul of an artistic publication. Even the beauty of the present volume would have been much heightened by a few out-of-the-way snaps of the varied life met with by the author during the course of his travel. We await with eagerness the publication of the future volumes in the Series as early as possible.

P. K. Gode.

**United India and Indian States**

*21-3-36*

The Raja Saheb of Bhor has presented to the Marathi-knowing public, an interesting account of his first tour in India, in course of which he visited Baroda, Ahmedabad, Abu, Ajmer, Jaipur, Bharatpur, Agra, Mathura, Simla, Benares and Ayodhya. The tour was undertaken more than twenty-five years back for its educational value, and notes of it had been then kept both as aid to the memory and with the object of sharing with the general public the impressions of visits to places recalling India's religious and historical glory. Though twenty-five years have intervened between the tour and the publication of this book, the reader rarely is conscious of that fact, because importance of most of the places visited had not been affected by the passage of time. The Raja Sahib has, moreover, before writing this book refreshed his memory by referring to recent accounts of travels, guide-books, etc. What lends special charm to the book is the appreciative spirit shown by the Raja Sahib, whether the appreciation is for the progressive spirit of H. H. the Maharaja of Baroda, for India's art and architecture, for her glorious past and religious heritage or for that spirit which created monuments like the Taj. The illustrations add to the value of the book. We are sure the Marathi-reading public will eagerly look forward to accounts of the Raja Sahib's subsequent tours, which also he intends to publish.

**His Highness Maharaja Sadashivrao Khase Saheb Powar**

Maharaja of Dewas (Junior)

"………It is indeed very kind of you to have sent me the beautiful book so well got up and so well written……………Attempts like this by members of the Princely order fascinate and interest me immensely…………It would really be a great day for our class when a larger number would interest itself in pursuits like this."

---

**G. V. Bevoor,** Esqr., M.A., C.I.E., I.C.S.,

Director General of Post & Telegraph

"………The book is written in simple language and goes straight to the heart. There is none of the artificiality which one notices in most travel books."

---

**J. R. Dhurandar,** Esqr., B.A., LL.B.,

Deputy Legal Remembrancer,
Legal Department, Bombay.

"………It is a pretty little gem in Marathi literature…………It is remarkable that the description given by you during your visit of 1909 is accurate and correct almost to a detail."

---

**Sir M. V. Joshi,** Kt., K.C.I.E.

Ex-Home Member, C. P. Govt., Amaroti

".........I have read the book with interest and although you disclaim your ability to write well I find the language engaging and dignified.........as statement of beauties of travels it is excellent."

---

**G. C. Bhate,** Esqr., M. A.,

Ex-Principal, Willingdon College, Sangli

".........Yours is a fine publication...."

---

**Shrimant Narayanrao Babasaheb Ghorpade,**

Chief of Ichalkaranji

".........It is laudable that efforts are being made to bring out in a very nice book-form, Your Highness' impressions and doings in these your extensive and instructive tours in some of which, I hope you remember, we met."

---

**Shrimant Raja Major Malojrao Nanasaheb Naik-Nimbalkar**

Raja Saheb of Phaltan

"......I made a mention in my speech at Your Highness' Durbar in Bhor that literary talents was a hereditary gift in your family and Your Highness' present volume fully bears out that remark........... Your modesty adds grace to your writing. I am sure your example will be followed by all.

........There may have been books of travel in this country but there is hardly any of this type coming from a princely pen."

---

**Sir R. V. Sabnis,** Kt., C. I. E.
Ex-Divan, Kolhapur State

"The book is very nicely got up in a princely style and I am proud to keep it in my library as a souvenir of Your Highness' kind and friendly regards .........The account of the various historical and religious places visited by Your Highness being written in a simple style adds greatly to its usefulness. I read it with great pleasure and interest as it recalled to my mind happy memories of my trips in northern India in the eighties of the last century."

---

**M. R. Jaykar,** Esqr., M.A., LL.B.,
Bar-at-Law, Bombay

"There are certain things which can never become old and a good literary production is amongst such."

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| आत्म. ३ | १७ | न. चिं. केळकर | श्री. रा. रा. न. चिं. केळकर |
| ३३ | ४ | शिवाय | प्रमाणें |
| ५२ | ६ | भौगोलिक ज्ञानाची | खगोलशास्त्रासंबंधीं |
| ,, | ७ | भूगोलज्ञांचें | खगोलशास्त्रज्ञांचें |
| ,, | ८ | भूगोलज्ञ | खगोलज्ञ |
| ५८ | १७ | भौगोलिक | खगोल |
| ५९ | ३ | हिंदूंचें | आर्यांचें |



श्रीमंत राजेसाहेब, भोर

## —आत्मनिवेदन—

बऱ्याच दिवसांपासून आमच्या मनांत, परदेशांतील नसेना कां पण आपल्या हिंदुस्थानांतील प्रेक्षणीय स्थळें पाहावीं, असा हेतु होता. कारण प्रवास हें एक करमणुकीचें साधन आहे असें आम्ही म्हणतोंच, पण त्यापेक्षांहि प्रवास केल्यानें मनुष्य चतुरस्र होऊन त्याचे मनास व्यापकत्व प्राप्त होतें. ठिकठिकाणचे लोक, त्यांच्या चालीरीति, निरनिराळे प्रदेश व त्यांतील सुंदर वस्तु या पाहण्यानें कलाविकास होऊन आपल्या व परदेशस्थ लोकांचा तौलनिक दृष्टीनें अभ्यास करितां येतो. कूपमंडूकवृत्ति जाण्यास प्रवास हाच एक मार्ग आहे. वरचेवर एकच गोष्ट व दर दिवशीं तेच तेच व्यवसाय यायोगानें मनुष्याची बुद्धि काय किंवा जगाकडे पाहण्याची दृष्टि काय संकुचित होऊन व्यापकता येणें शक्य नसतें. प्रवास केल्यानें आपल्यांतील हा दोष जाऊन मनास प्रगल्भता व आपल्या आवडीनिवडीला निराळें वळण लागतें, अशी आमची प्रामाणिक समजूत आहे. ज्याप्रमाणें ज्ञानार्जनास विद्याभ्यास हें एक साधन,

त्याप्रमाणें प्रवास हेंहि एक साधन आहे. पाश्चात्य देशांत तर, विद्याभ्यासाचे शेवटीं प्रवास झाला नसल्यास त्याची पूर्तिच होत नाहीं. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची परिपूर्ति व परिपक्वता होण्यास प्रवास फारच आवश्यक गोष्ट आहे. आम्ही यापूर्वी युवराजावस्थेंत आमच्या वडिलांबरोबर तीन चार वेळां प्रवास केला होता; पण ज्ञानार्जनाच्या दृष्टीनें स्वतंत्रपणें केलेला हाच आमचा प्रथम प्रवास होय. ज्ञानार्जन हाच त्यांतील प्रधान हेतु होता.

निरनिराळ्या देशांतील लोकांची परिस्थिति, त्यांचे आचारविचार, त्या त्या देशांतील संस्था वगैरे अवलोकनांत येऊन, त्यांचें संपूर्ण ज्ञान व्हावें व त्यायोगें आपल्या इकडील लोकांची सुधारणा करावी, हा दुसरा उद्देश या प्रवासांत होता.

प्रवास करण्याची आमची इच्छा आमचे वडील ती. श्रीमंत सरकार व पोलिटिकल एजंट, मि. जी. कारमायकेल यांस कळवून ठेविली होती व श्रीमंत सरकार यांनीं आम्हांस प्रवासाकरितां १०००० रुपये देण्याचें ठरविलें होतें.

वरीलप्रमाणें मनाचा संकल्प करून आम्ही प्रवासास निघण्याचें ठरविलें; व साधल्यास या प्रवासापासून झालेलें ज्ञानार्जन व मिळविलेले अनुभव बहुजनसमाजापुढें यावे व आमच्या प्रवासाचें कांहीं तरी स्मृतिचिन्ह राहावें, अशा दुहेरी हेतूनें प्रवासांत असतांना आम्हीं पाहिलेल्या प्रेक्षणीय स्थळांच्या वर्णनाचीं व तदनुषंगिक माहितीचीं त्रोटक टिपणें करून ठेविलीं होतीं, त्यांचाच उपयोग करून आमचा प्रवासवर्णनात्मक प्रथम वृत्तान्त लोकांपुढें ठेवीत आहों.

## आत्मनिवेदन

या आमच्या लिखाणाचा उद्देश मुख्यतः संस्थानच्या दृष्टीनें कांहीं-तरी नोंद असावी, असा असल्यानें बहुजनसमाजास हें कितपत मनो-रंजक होईल याची शंकाच वाटते. तथापि, आम्ही जें कांहीं पाहिलें त्याचें दिग्दर्शन (Proper representation of facts and details) आमच्या अल्प मतीस पटेल तितकेंच देण्याचा प्रयत्न केला आहे. व आम्हांस उपलब्ध झालेल्या माहितीचा कांहीं थोड्या अंशीं प्रवासेच्छु माणसास उपयोग व्हावा, या उद्देशानें आम्हीं हा उपक्रम करण्याचें धाडस केलें आहे. तेव्हां जर आम्हीं लिहिलेलें हें वर्णन लोकांना उद्‌बोधक व मनोरंजक वाटलें तर आम्हीं केलेल्या प्रयत्नाचें थोड्या प्रमाणांत कां असेना सार्थक झालें असें आम्ही समजतों.

आजपर्यंत अनेक विद्वान् लोकांनीं प्रवास-वर्णनें लिहून लोकांपुढें ठेविलीं आहेत व त्या दृष्टीनें आमचें पुस्तक एक तर वैयक्तिक दृष्टि व नुसतेंच वस्तुस्थितिदर्शक असल्यामुळें रसाविष्करणाच्या दृष्टीनें लोकांच्या रुचिवैचित्र्यास पटणार नाहीं असें वाटतें. कारण प्रवासवर्णनासारख्या वृत्तांतामध्यें देखील अनेक रसांचा परिपोष करून वाचकांना त्याच्याशीं समरस करून टाकणाऱ्या लेखन-शैलीचा आमच्यांत अभाव आहे, याची आम्हांस पूर्ण जाणीव आहे. तेव्हां न. चिं. केळकर, प्रिन्सिपॉल भाटे व इतर अनेक कसलेल्या लेखकांप्रमाणें जरी त्यांत विद्वत्तेची चमक व इतर उपांगें नसलीं तरी वस्तुस्थितिनिदर्शन ( Proper representation ) या दृष्टीनें आमच्या या लिखाणाचा प्रवास करणाऱ्या माणसास खास उपयोग होईल, असा आम्हांस आत्मविश्वास

वाटतो. उत्तम कलापूर्ण वाङ्मयनिर्मिति हा उद्देशच नसल्यामुळें याचा इतकाच उपयोग झाला तरी आम्हांस आनंद वाटेल.

१९०९ सालीं आम्ही प्रथमतःच प्रवास करण्याच्या उद्देशानें बाहेर पडलों; व त्यानंतर जवळ जवळ वीस वर्षांच्या कालावधीनंतर हें पुस्तक बाहेर पडतें, याचें आम्हांस देखील आश्चर्य वाटतें. आमच्या राजकीय उपाधि व उलाढालीमुळें संकल्पसिद्धीच्या मार्गांत आम्हांस अशा कार्याला लागणारी निवांत मानसिक शांति न मिळाल्यामुळें हा एवढा अवधि लागला. पण या अडचणींतूनहि गेल्या वर्षी पुढील विजयादशमीच्या सुमुहूर्तावर आम्हीं हें आमचें प्रथम लिखाण छापवून बाहेर काढण्याचा निश्चय केला; व त्याप्रमाणें सर्व कांहीं सुरळीतपणें होऊन मनोदित संकल्पाप्रमाणें आज आम्हांस त्याच्या सिद्धीचा आनंद चाखावयास मिळत आहे, हा त्या प्रभु रामचंद्राचाच प्रसाद असें आम्ही समजतों.

हें पुस्तक लिहितांना आमच्यापुढें अनेक अडचणी उपस्थित झाल्या. आमचीं टिपणें एकतर अपूर्ण व फारच जुनीं व त्रोटक वाटलीं. यामुळें व शिवाय त्या वेळची आमची स्मृति ताजीतवानी करण्याकरितां आम्ही त्या त्या शहराचीं उपलब्ध असलेलीं दिग्दर्शक पुस्तकें ( Tourists' Guides ) व कांहीं प्रवासात्मक पुस्तकें यांचा उपयोग केलेला आहे. त्यांत प्रिन्सिपॉल भाटयांचा 'उत्तर हिंदुस्थानचा प्रवास', Lt.-Col. H. A. Newell चीं कांहीं पुस्तकें, फडके यांची 'माझी तीर्थयात्रा' वगैरेंचा प्रामुख्यानें उल्लेख करावयास हवा व याबद्दल आम्ही त्या त्या ग्रंथकर्त्यांचे त्यांपरोक्ष मनःपूर्वक आभार मानतों.

त्याचप्रमाणें पुस्तकास सजावट व स्थलदिग्दर्शन या दृष्टीनें आम्हीं कांहीं फोटो घातले आहेत, त्यांपैकीं कांहीं ठिकाणचे स्वतः काढले

आहेत, व कांहीं त्या ठिकाणीं विकत मिळतात त्यांचे ब्लॉक तयार करवून घेतले आहेत. आम्ही विकत घेतलेल्या फोटोवर फोटोग्राफरचें नांव नसल्यामुळें तसा निर्देश करतां आला नाहीं.

हिंदुस्थानांतील प्रवासाचे आमचे चार पांच कार्यक्रम आहेत व ते सर्व याप्रमाणेंच छापविण्याचा आमचा आजचा संकल्प आहे व आमच्या मनांतील ही प्रेरणा परमेश्वरकृपेनें व जनताजनार्दनाच्या उत्तेजनानें सिद्धीस जाईल अशी उमेद आहे.

आणखी एका गोष्टीचा निर्देश करण्यास पाहिजे. या कार्यांत आम्हांस आमचे प्रायव्हेट सेक्रेटरी रा. रा. **भालचंद्र हणमंत देशपांडे**, बी.ए., एल्एल्.बी. यांची विशेष मदत झाली आहे. हें लिखाण चालू असतांना आम्हांस वेळोवेळीं सूचना करून आमच्याकडून मन:संकल्पा-प्रमाणें वेळेवर पुरें करवून घेण्याचें कांहीं अंशीं श्रेय त्यांना आहे. याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोंत.

त्याचप्रमाणें आमचीं हस्तलिखितें शुद्धलेखनाच्या दृष्टीनें तपासण्याचें कार्य भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचे श्री. **ग. ह. खरे** यांनीं केलें आहे, याबद्दल त्यांचे व पुस्तकांतील शोभिवंत ब्लॉक्स वेळेवर तयार करून दिल्याबद्दल 'महाराष्ट्र फोटो झिंको'चे मालक मि. **भिडे** व मोहक छपाई व सुंदर बांधणीबद्दल 'समर्थ भारत प्रेस'चे श्री. **सरदेसाई** यांचेही आभार मानणें जरूर आहे.

शेवटीं ज्या जगन्नियंत्याच्या कृपाप्रेरणेनें हा प्रयत्न पूर्णत्वास गेला त्या प्रभूला वंदन करून हें निवेदन पुरें करतो.

पुणें. **लेखक**

## हिंदुस्थानांतील आमच्या सफरी

# सफर पहिली

अ. क्र. ५७२

# प्रवासाच्या वाटेवर

प्रवासाची सर्व प्राथमिक तयारी करवून आम्ही व कै. श्री. सौ. राणीसाहेब आणखी १०।१२ मंडळीसह भोराहून तारीख २० फेब्रुआरी १९०९ रोजीं पुण्यास येण्यास निघालों. आमच्याबरोबर दादासाहेब कुमठेकर, नरहरपंत आंबेकर, वे. शा. सं. श्रीधरशास्त्री, भिडेमास्तर, महादेव दीक्षित, पांडुरंग पागे, चिंतू जोशी वगैरे मंडळी होती. शिवाय हुजरे वगैरे निराळे. आम्ही स्वतंत्र मोटारीनें पुण्यास सकाळीं १० वाजण्याचे सुमारास येऊन पोहोंचलों. तेथें पो. ए. व कलेक्टरसाहेब, द्रवीड, पुराणिक व सातभाई वगैरे मंडळींच्या भेटी घेऊन रात्रौ ११-५० चे गाडीनें मुंबईस जाण्याकरितां पुणें सोडलें. आम्ही स्वत: व कै. श्री. सौ. राणीसाहेब यांचेकरितां फर्स्ट क्लासमध्यें २ जागा व बाकी चार सेकंड क्लासमध्यें रिझर्व केल्या होत्या. मुंबईस आल्यावर नेहमींप्रमाणें सरदारगृहामध्यें आमची उतरण्याची व्यवस्था झाली होती. मुंबईस आम्ही दोन तीन दिवस राहण्याचें ठरविलें होतें. सरदार

भाऊसाहेब विंचूरकर मुंबईस आले आहेत, असें कळल्यावरून त्यांना भेटावयास गेलों होतों, पण त्यांची भेट झाली नाहीं. रात्रीं श्री. विंचूरकर, डॉ. देव, पुराणिक वगैरे मंडळी भेटून गेली. तारीख २२ रोजीं सकाळीं डॉ. चौबे वगैरे डॉक्टर स्नेही तेथें वैद्यकीय कॉंग्रेसकरितां आलेले होते, तेही भेटून गेले. बऱ्याच दिवसांचा प्रवास करणार असल्यानें मुंबईस कांहीं स्नेही मंडळीस भेटून पुढें जावें असें वाटून त्याप्रमाणें श्री. सरदार बाळासाहेब पानसे, त्यांचे चिरंजीव, मि. एस. सी. लोगन, प्रो. ओ. व्ही. मुल्लर व शेट पुरुषोत्तम मावजी या स्नेही मंडळींना भेटून आम्ही वरील दिवशीं रात्रीं ९–३०च्या मेलनें बडोद्यास जाण्याकरितां मुंबई सोडली. मुंबईस असतांना शेट खेमराज आमच्याकडे पानसुपारीस आले होते. ग्रँटरोड स्टेशनवर बडोद्याकडे जाणाऱ्या गाडींत आम्ही बसलों. मुंबईपर्यंत आमच्या प्रवासाची प्रस्तावनाच चालली होती. पुणें ते मुंबई प्रवासांत पुढील प्रवासाच्या विचारांत आम्ही गर्क झालों होतों. प्रवासास लागणाऱ्या सर्व गोष्टी व पुढील बेत मुक्रर करण्यांत सर्व काल गेला. पण आतां आमच्या प्रवासाची खरी सुरुवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आम्ही व कै. श्री. सौ. राणीसाहेब यांचेकरितां एक स्वतंत्र फर्स्ट-क्लासचा डबा रिझर्व केला होता व बाकीच्या लोकांकरितां जागा सेकंड क्लासमध्यें ठेवल्या होत्या. त्यामुळें सर्वसाधारण प्रवासामध्यें होणाऱ्या अडचणींची आम्हांला मुळींच कल्पना आली नाहीं. प्रवास करावयाचा तो एका दृष्टीनें बहुजनसमाजामध्यें करणेंच श्रेयस्कर, कारण त्यामुळें खालील वर्गाच्या प्रवासामध्यें काय काय त्रास व गैरसोयी असतात याची कल्पना येते व त्याबरोबरच लोकांचें स्वावलंबन, अडचणी सोसण्याची सहन-

शक्ति वगैरेंची जाणीव होऊन साधारण मनुष्याच्या जीवनाचें दृश्य दृष्टीस पडतें. पण इच्छा असतांना देखील " यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाच-रणीयं नाकरणीयम् " अशी स्थिति होते. कारण समाजांतील आमचा दर्जा कायम ठेवावा लागतो आणि लोकापवादाचे दृष्टीनें तसें न करणें आमच्यासारख्या माणसास योग्य नसतें. 'To keep up appearances' हें समाजांतील साधारण दर्जाच्या माणसासहि साधावें लागतें. मग आम्ही तसें वागलों नाहीं तरच नवल ! शिवाय आमची प्रकृति सुदृढ नसल्यानें आमच्यानें खालच्या वर्गांतून प्रवासहि झाला नसता ! असो. बडोदें स्टेशनवर आमची गाडी बरोबर सकाळीं पांच वाजून सात मिनिटांनीं पोहोंचली. आम्ही येण्याचें अगाऊ कळविल्यावरून आम्हांस नेण्याकरितां आमचे श्वशुर श्री. शंकर विष्णु पुराणिक, साने वकील, आचार्य वकील वगैरे मंडळी आलेली होती. आमच्या प्रवासांत जर काय न्यून आम्हांस वाटलें असेल तर हें एकच कीं, स्टेशन म्हणा अगर कोणत्याहि थांबण्याच्या ठिकाणीं म्हणा आमची अगोदरच तजवीज झाली असल्याकारणानें स्वतःच सर्व सोयी करून घेणें व मग त्यांत रमणें यांत जी एक प्रकारची मजा व आनंद असतो त्याचा अभाव. पण त्यास नाइलाज असल्यानें निव्वळ प्रवास व निरनिराळ्या देशांतील पाहण्यासारखीं स्थळें यांपासून जेवढें ज्ञान प्राप्त होईल तेवढ्यावरच आम्हांस भागवून घेणें प्राप्त होतें.

---

# बडोदा

बडोदा स्टेशनवर उतरतांच श्री. गायकवाड यांच्या राजधानीस न शोभण्यासारखें तें लहानसें स्टेशन व स्टेशनाबाहेरील तो बकाल प्रदेश पाहून आमची निराशा झाली.

स्टेशन ते मांडवी

पण नंतर मात्र Things are not what they seem अर्थात् बाह्यांगावरून कुठल्याहि गोष्टीच्या अंतरंगाची कल्पना करितां येत नाहीं हेंच खरें असें वाटूं लागलें. स्टेशनमधून बाहेर पडतांच तो पाणी मारून स्वच्छ केलेला विशाल रस्ता, त्याचप्रमाणें स्टेशनच्या बाहेरील आवारांत वाहनें उभीं करण्याची केलेली सोय, व पंचरत्नांप्रमाणें पांच दिव्यांचा इलेक्ट्रिक खांब पाहून बडोद्यांत पाहण्यासारख्या बऱ्याच गोष्टी असणार यांत कांहीं शंका नाहीं, असें वाटूं लागलें. येथील मुख्य वाहन म्हणजे एक घोड्याचा सुंदर टांगा. येथील टांगे आमच्या इकडील टांग्यांहून निराळे आहेत. घोडे अत्यंत उमदे व टांगा प्रशस्त चौकोनी असून चारी बाजूंस शोभिवंत कापडाचे


पडदे लावून सुंदर केलेला असतो. यांत चार उतारू व शिवाय एक टांगेवाला अशीं पांच माणसें बसण्याची सोय असते. सुंदर अभ्रे घातलेल्या गाद्या बसण्यास असतात. आमची कल्पना अशी आहे कीं, जर चार ऐवजीं दोन माणसें बसलीं तर पुण्यांतील टांग्यांपेक्षां येथील टांगे जास्त सुखकर होतील. आमच्याकरितां स्वतंत्र वाहनाची सोय असल्यामुळें मला त्यांची व्यक्तिशः कल्पना नाहीं, पण निव्वळ कुतूहल या दृष्टीनें आम्ही सर्व गोष्टींचें बारकाईनें निरीक्षण करीत होतों. बडोद्यास आम्ही करमालीशेट यांचे बंगल्यांत उतरलों. आम्ही आलों हें कळतांच श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या पदरीं असलेले इकडील रंगोपंत कोठावळे आम्हांस भेटावयास आले व आम्ही महाराजांचे पाहुणे म्हणून नजरबाग वाड्यांत राहावें अशी श्री. महाराजांची आग्रहपूर्वक इच्छा आहे असें सांगूं लागले. पण आम्ही तेथें राहावयाचें विनयपूर्वक नाकारलें.

बडोद्यास आल्यानंतर तेथील पाहण्यासारखीं स्थळें व इमारती पाहण्यापूर्वी एकवार सबंध शहरांतून साधारण कल्पना यावी म्हणून एक चक्कर मारण्याचें ठरविलें. बडोद्यास आम्हीं ४।५ दिवस राहण्याचें ठरविलें होतें व त्या मुदतींत काय काय गोष्टी पाहतां येतील यांची साधारण आंखणी करून ठेविली; त्यांत आम्हांस राजवाडे व सार्वजनिक इमारतींचीं बांधकामें पाहण्यासारखीं आहेत असें समजलें. स्टेशन सोडलें कीं, एक मोठा विशाल रस्ता असून दोन्ही बाजूंस सावलीकरितां मोठमोठीं झाडें व इलेक्ट्रिक दिव्यांचे विशिष्ट पद्धतीनें दिसतील असे खांब दृष्टीस पडतात. आपण स्टेशनवरून थेट

निघालों म्हणजे बडोद्याची मुख्य व्यापारपेठ वसली आहे तेथपर्यंत सरळ सडक आहे. स्टेशन तें मांडवीपर्यंत जात असतांना आम्हांस बडोदा कॉलेज, हायस्कूल, हॉस्पिटल, विश्वामित्री नदी, पुढें सूर सागर तलाव, त्याच्याच पुढें मिडलस्कूल, भव्य न्यायमंदिर वगैरे सुंदर व प्रशस्त इमारती दुतर्फा पाहण्यास मिळाल्या. सर्वसाधारण कल्पना यावी एवढ्याचकरितां व नंतर सर्व इमारती पृथक् पृथक् पाहावयाच्या असल्यामुळें आम्ही वाहनांतून जात असतां ज़ेवढी कल्पना आली, तेवढ्यावरून हें लिहीत आहों. महाराजांचे वाडे व संस्थानी इमारती सोडल्या तर इतर बडोदा शहर आम्हांस तर बकालच वाटलें. जर कांहीं विशिष्ट मार्ग सोडले तर बडोद्यांत कांहीं पाहण्यासारखें असावें कीं काय अशी शंकाच येते. अद्याप देखील कांहीं ठिकाणीं जुनीं पडकीं घरें अस्तित्वांत असून जुने बोळ वगैरे आहेत असें आम्हांला कळलें. बाकी एकंदरींत चहूंबाजूंनीं कोट असलेलें भुईकोट किल्ल्यासारखें शहर, मधून मधून असलेली दाट वृक्षांची गर्दी, मोठ-मोठ्या रुंद सडका, मधून मधून केलेल्या कृत्रिम बागा, जुन्या इमारती व वैभवशाली राजवाडे पाहून आम्हांला श्री. गायकवाड सरकारच्या राजधानीची कल्पना आली.

नजरबाग वाडा

आतां पूर्वी ठरविल्याप्रमाणें बडोद्यांतील प्रेक्षणीय स्थळें एकामागून एक अशीं पृथकपणें पाहूं लागलों. बडोदें शहरीं पाहण्यासारखीं स्थळें म्हणजे श्रीमंत महाराजसाहेब यांचे वाडे आणि सरकारी व इतर इमारती. त्यांतल्या त्यांत मकरपुरा, नजरबाग, राजमहाल वगैरे राजवाडे अत्यंत भव्य असून बांधकामाच्या



नजरबाग राजवाडा, बडोदें

[ पान ६

दृष्टीनें नमुनेदार आहेत. श्रीमंत सयाजीराव महाराज यांनीं यांत बरेच पैसे खर्च करून आजतागायत सर्व इमारती सौंदर्याचे दृष्टीनें प्राचीन व अर्वाचीन, पाश्चिमात्य व पौर्वात्य कलेनें पूर्ण व शोभिवंत केलेल्या आहेत. आम्ही प्रथम त्यांचा शहरांतील नजरबाग राजवाडा पाहिला. हा राजवाडा कै. श्री. मल्हारराव महाराज यांचे कारकीर्दींत बांधला गेला. जरी राजवाडा बऱ्याच वर्षांपूर्वी बांधला असला तरी सध्यांच्या महाराजांनीं त्यांत पुष्कळ सुधारणा करून त्यास आधुनिक स्वरूप दिलें आहे. श्रीमंत सयाजीराव महाराज यांचे कारकीर्दींत या वाड्यास राजपाहुण्यांस उतरण्याकरितां स्वतंत्र भाग जोडण्यांत आल्याचें कळलें. वाड्याच्या दरवाजांतून आंत शिरतांच हल्लींच्या पद्धतीवर जिकडे तिकडे हिरवेंगार गवत व्यवस्थित वाढवून त्याचीं सुंदर मैदानें तयार करण्यांत आल्यामुळें व सर्व रस्ते पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडांनीं बांधून काढविल्यामुळें आंत शिरतांच आम्हाला प्रसन्नता वाटूं लागली. राजवाडा जरी गजबजलेल्या व गलिच्छ वस्तींत असला तरी चहूंबाजूंनीं मोठा आकार, आंतील बागेची मोठी मांडणी व टापटीप पाहून एका स्वतंत्र विभागांतच आहों असें आम्हांस वाटलें. या वाड्यांत दरबार हॉल, पाहुण्यांना राहण्याकरितां, बसण्याउठण्याच्या व निजण्याच्या स्वतंत्र खोल्या असून त्या सर्व उंची सामानानें शृंगारलेल्या आहेत. दरबार हॉलमध्यें सातवे एडवर्ड यांचा एक सुंदर अर्धपुतळा ठेवण्यांत आला आहे. दिवाणखान्यांतील खुर्च्या भरजरी किनखापानें मढविलेल्या असून ठिकठिकाणीं सुंदर गालिचे व कोच ठेवलेले आहेत. कांहीं ठिकाणीं तर रौप्य कोच ठेविले आहेत. एका हॉलमध्यें श्री. कै. मल्हारराव महाराज व

श्री. सयाजीराव महाराज यांचीं तैलचित्रें प्रामुख्यानें दिसतील अशीं लाविलीं आहेत. हा राजवाडा पांच मजली आहे. पांचव्या मजल्यावर सुंदर पांढरा शुभ्र असा सौधतल असून त्यावरून सर्व शहराचा सुंदर देखावा ( Bird's-eye-view ) दिसतो.

जवाहिरखाना

नजरबाग वाड्यांत श्रीमंतांचा जवाहिरखाना आहे. त्यावर आमच्या श्वशुरांचे चुलते श्री. शंकरराव पुराणिक यांची नेमणूक झालेली होती. त्यांनीं आम्हांस सर्व जडजवाहीर दाखविण्याची व्यवस्था केली. गायकवाड सरकारच्या जवाहिरखान्याप्रमाणें मौल्यवान् संग्रह हिंदुस्थानांत कोणत्याहि संस्थानिकाजवळ नाहीं अशी ख्याती आहे. संस्थानचे समारंभप्रसंगीं श्रीमंतांनीं वापरण्याच्या चीजा फारच अमोलिक आहेत. विशेषत: जवळजवळ पांचशें हिऱ्यांची कॉलर, कै. श्री. खंडेराव महाराजांनीं मक्केस पाठविण्याकरितां तयार केलेले मोत्यांचे दोन सुंदर गालीचे, पाचूची नथ, कंठे मौल्यवान व प्रेक्षणीय आहेत. महाराजसरकार यांनीं घालण्याच्या मोत्याच्या कंठ्यांतील एक एक मोती अत्यंत पाणीदार व गोल असून त्याचा आकार करवंदाएवढा आहे. त्याची किंमत अदमासें पन्नास लाख आहे असें समजतें. त्याचप्रमाणें मोत्यांचे गालीचे एकजात मोत्यांनीं विणलेले असल्यानें बहुमोल आहेत. त्यांचीहि किंमत अदमासें तीस लाख रुपये आहे. बाकी हें सर्व रत्नभांडार राजवैभवदर्शनार्थच ठेविलें आहे यांत शंका नाहीं. एवढें मोठें वैभव ज्या देशांतील एक एका राजाचें आहे त्या देशास एके काळीं सुवर्णभूमि म्हणत असत यांत नवल तें काय ?

यानंतर आम्ही गायकवाड सरकारचा तोफखाना पाहण्यास गेलों.

सोन्याचांदीच्या तोफा

या तोफखान्यांत दोन सोन्याच्या व दोन चांदीच्या तोफा ठेविल्या आहेत. चांदीच्या तोफा श्री. कै. खंडेराव महाराज व सोन्याच्या तोफा श्री. कै. मल्हारराव महाराज यांनीं ओतविल्याचें आम्हांस समजलें. या तोफा ठेवण्याकरितां मोठमोठे गाडे असून ते बैलांकडून ओढवितात. चांदीच्या तोफांना पितळेनें मढविलेली गाडी व सोन्याच्या तोफांना रुप्यानें मढविलेली गाडी आहे. येथें बैलांना घालण्याच्या झुली व अलंकार ठेविले आहेत.

तोफखाना पाहून आम्ही श्रीमंत सयाजीराव महाराज यांना भेटण्यास त्यांच्या राहण्याच्या श्रीलक्ष्मीविलास प्रासादाकडे गेलों. आम्ही भेटावयास आलों आहों असें कळतांच श्रीमंतांनीं आमची सादर भेट घेऊन कुशल प्रश्न वगैरे विचारिले व आम्ही त्यांचे पाहुणे म्हणून राहावें असा अत्यंत आग्रह केला. आम्हीहि स्वतः महाराजांनीं आग्रह केल्यामुळें दोन दिवस मुक्काम वाढवून राहण्याचें कबूल केलें. थोडा वेळ कुशलवृत्त झाल्यानंतर आम्ही श्रीमंतांचा निरोप घेऊन 'सार्वजनिक बाग' पाहण्यासाठीं बाहेर पडलों.

हा विस्तृत व शोभायमान बगीचा श्री. सयाजीराव महाराज यांनीं

सार्वजनिक बाग

करविला आहे. याचें क्षेत्रफळ सुमारें ५।६ मैल असावें. या उपवनाची रचना विश्वामित्री नदीचे कांठीं करण्यांत आल्यामुळें त्यास विशेष शोभा व रमणीयत्व प्राप्त झालें आहे. सार्वजनिक बागेची मांडणी करून श्रीमंतांनीं आपल्या प्रजेवर अत्यंत उपकार करून ठेविले आहेत. मोठमोठे लांबच

लांब रस्ते, दुतर्फा गगनचुंबी वृक्ष, नयनमनोहर व्यवस्थित ठेविलेल्या वेली व हिरवळी, मधून मधून श्रांत पान्थाकरितां इंग्रजी पद्धतीनें आतपरक्षणार्थ ठेवलेले भरगच्च लतामंडप (Summer Houses), कांहीं कांहीं जागीं ठेवलेले पुतळे वगैरे पाहून बागेच्या विस्तीर्णपणाची कल्पना येते. मनोरंजनार्थ कृत्रिम उपकरणांच्या सोयी, विशेषतः वर झोके घेत असलेला झुलता पूल, पशुसंग्रहालय वगैरे गोष्टींची भर पडल्यामुळें या बागेस विविधता आली आहे. नुसतेंच मनोरंजन हा उद्देश न ठेवतां कांहीं तरी ज्ञानार्जन व्हावें अशा हेतूनें बागेंत एका प्रशस्त व सुंदर इमारतीमध्यें अजबखाना व चित्रसंग्रहालयांची योजना केलेली आहे. जगांतील, विशेषतः आपल्या देशांतील, कलाकुसरीचे सुंदर, अमोलिक नमुने, ऐतिहासिक दृष्टीनें महत्त्वाचे असे प्राचीन वस्तूंचे व चित्रांचे नमुने येथें पाहावयास मिळतात. या सर्व गोष्टी पाहून आम्हांला श्री. सयाजीराव महाराज यांच्या बुद्धिवैभवाची व दीर्घोद्योगाची कल्पना येऊन त्यांच्याबद्दल सादर कौतुक वाटूं लागलें.

हे सर्व कार्यक्रम आटोपण्यास आम्हांला बराच अवधि लागला; यामुळें आम्ही आपल्या निवासस्थानाकडे परत फिरलों.

रात्रीं तेथील श्री. शंकरराव कृष्ण काठेवाड दिवाण आम्हांस भेटावयास आले होते.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही प्रथम श्रीमंत महाराजसाहेब यांचा

मकरपुरा राजवाडा

मकरपुरा राजवाडा पाहण्याचें ठरवून तिकडे जाण्यास निघालों. मकरपुरा हा गांवापासून सुमारें ४।५ मैल लांब आहे. जातांना वाटेंत बडोदा इन्फंट्री व रेल्वे वगैरेंच्या जागा दृष्टीस

पडतात. मकरपुऱ्याकडे जाणारा रस्ता चांगला असून दुतर्फा लहानमोठीं झाडें आहेत. बडोद्यांत जर कांहीं विशेष असेल तर तें म्हणजे सरळ व लांबवर दिसणाऱ्या सडका.

हा वाडा श्री. कै. खंडेराव महाराज यांनीं आपल्या कारकीर्दींत शिकारीचे सोईसाठीं बांधविला होता. पण त्यांचे पश्चात् श्री. कै. मल्हारराव महाराज यांनीं त्यांतील बराचसा भाग विध्वंस करून टाकल्याचें आम्हांस कळलें. वाडा सुंदर तांबडया विटांचा असून इटालियन रेनेसान्स पद्धतीवर आहे. सध्यांचे श्री. सयाजीराव महाराज यांनीं अवशिष्ट राहिलेल्या भागास जोडून आधुनिक पद्धतीवर नवीन भाग बांधविलेला आहे. त्यामुळें या दोन भागांमध्यें एक गच्चीवजा रस्ता आहे. वाडया-भोंवतीं मोठें विस्तीर्ण उद्यान असून त्याची जोपासना व स्वच्छता ठेवण्याची विशेष खबरदारी घेतली आहे. कारण बागेंत एकाहि ठिकाणीं आम्हांस पालापाचोळा दिसून आला नाहीं. बागेमध्यें राजवाडयासमोर एक मोठा सुंदर कारंजा असून त्याच्या सभोंवार कांहीं ठिकाणीं संगम-रवरी अर्धपुतळे, तर कांहीं ठिकाणीं पूर्णाकृती पुतळे ठेविल्यानें राजवाडयाचा दर्शनी भाग विशेष शोभिवंत व उठावदार झाला आहे. बागेमधून ठिकठिकाणीं सुंदर वेलींच्या ताटव्यांनीं व रंगीबेरंगी फुलझाडांनीं श्रृंगारलेल्या लहानलहान हिरवळी असल्यामुळें राजवाड्याभोंवतीं फिरतांना मनास फारच प्रसन्नता वाटते. कांहीं ठिकाणीं संगमरवरी दगडांचीं कृत्रिम तळीं असून त्यांच्या कांठावर बसण्याकरितां जागा केलेल्या आहेत. विद्युत्-प्रकाशांनीं युक्त असा हा राजवाडा सायंकाळचे वेळेस प्रकाशांत अत्यंत रमणीय दिसत असेल यांत शंका नाहीं. आम्ही जाण्यापूर्वी

या वाड्यांत श्री. सयाजीराव महाराज, श्री. सौ. राणीसाहेब यांच्यासह राहत असत असें कळलें. या राजवाड्यांत बसण्याउठण्याचे, वाचण्याचे, खेळण्याचे असे ५१६ दिवाणखाने, त्यांच्या रंगाला साजेल अशाच तऱ्हेचें सुंदर सामान, गालिचे, पडदे वगैरे उपकरणांनीं सजविलेले आहेत. येथील स्नानागारेंहि पाहण्यासारखीं आहेत. प्रत्येक ठिकाणीं मोठमोठीं चांदीचीं भांडीं स्नानास असून त्यांची पाश्चात्य पद्धतीवर योजना झाली आहे. महाराजांचें शयनागार व तेथील चांदीसोन्याचे निरनिराळे पलंग, बसावयास नाना प्रकारचीं कोचें व खुर्च्या पाहून आम्हांला श्री. गायकवाड यांच्या वैभवाबद्दल कौतुक वाटलें. वैभव तर खरेंच, पण त्याची योजना योग्य योजकांकडून व्हावयास पाहिजे हें तत्त्व बरोबर पटलें. महाराजांनीं स्वतःकरितां तर सर्व सुखसोयी केल्या, पण त्यांचे सेक्रेटरी व ए. डी. सी. यांच्यासाठीं राखून ठेवलेलीं दालनें त्या त्या माणसांच्या दर्जास शोभेशीं अशींच दिसलीं. याशिवाय दारांस शोभेकरितां लाविलेले, भरगच्च कलाबतूंनीं मढविलेले किनखापी पडदे, अप्रतिम चित्रें, सुंदर देखाव्यांच्या प्रतिमा, अनेक तऱ्हांचीं कांचेचीं चित्रें, विविध विषयांवर लिहिलेल्या पुस्तकांचीं सुन्दर कपाटें व उत्तम उत्तम कारागिरीचे उत्कृष्ट नमुने व्यवस्थेशीर रीतीनें मांडून ठेवलेले होते. राजवाड्यांतून चोहींकडे फिरून झाल्यावर आम्ही बागेंत फेरफटका करून आलों. बागेमध्यें ओबडधोबड दगडांची टेकडी, त्याच्याच शेजारीं एक कृत्रिम गुहा व जलाशय हीं पाहण्यासारखीं आहेत. कृत्रिमपणामध्यें देखील स्वाभाविक दिसेल अशी बांधणी केल्यामुळें त्याला रमणीयत्व प्राप्त झालें आहे. उन्हाळ्यांत थंडाव्याची जागा म्हणून त्याचा खास उपयोग होत असेल

असें आम्हांस वाटलें. त्याचप्रमाणें बागेमध्यें कृत्रिम नदी करून ठिक-ठिकाणीं खऱ्या नदीप्रमाणें पूल वगैरे बांधवून काढलेले आहेत. एकंदरींत राजवाड्यास शोभेल अशीच बाग वगैरे भोंवतालची योजना झाल्या-कारणानें सर्व देखावा सुंदर व मनोरम झाला आहे यांत शंका नाहीं. हें सर्व पाहण्यास आम्हांस २।३ तास मोडावे लागल्यामुळें सकाळचा सर्व वेळ तिकडेच पाहण्यांत गेला. नंतर महाराजसाहेब यांनीं विनंति केल्याप्रमाणें आम्हांस नजरबाग राजवाड्यांत राजपाहुणे म्हणून राहावयास जावयाचें असल्यामुळें परत फिरलों. घरीं येऊन आम्ही सर्व मंडळीसह सुमारें बारा वाजण्याचे सुमारास नजरबागमध्यें राहावयास आलों.

भोजनोत्तर विश्रांति घेऊन आम्हीं पुनः बाहेर पडण्याचें ठरविलें. तत्पूर्वीं कै. श्री. सौ. राणीसाहेब, श्री. सौ. चिमणाबाई महाराणीसाहेब यांना भेटावयास गेल्या होत्या. त्या परत आल्यावर आम्ही पुनः एकवार सार्वजनिक उद्यानांतील अजबखाना पाहण्याकरितां जाऊन आलों. त्याचें सर्वसाधारण वर्णन पूर्वीच आलें आहे, तेव्हां आतां द्विरुक्तीची जरूरी नाहीं, असें आम्हांस वाटतें. तेथें बराच वेळ झाल्यामुळें ट्राममधून एक फेरफटका मारून घरीं परतलों. मध्यंतरीं श्री. रा. रा. चिंतामणराव मुजुमदार आम्हांस भेटावयास आले होते. त्यांना महाराजसाहेबांनीं आमच्या व्यवस्थेकरितां दिलें होतें. याप्रमाणें दोन दिवस आम्हीं बडोद्यांत काढले.

तिसरे दिवशीं सकाळीं आम्ही रा. रा. कुमठेकर व श्री. आंबेकर यांच्यासह बडोद्यापासून सुमारें बारा मैलांवर असलेला 'आजवा' तलाव पाहण्यासाठीं मोटारींतून गेलों. हा तलाव बांधण्यापूर्वी बडोद्यास पाण्याचें दुर्भिक्ष होतें, असें सांगतात.

आजवा तलाव

हा श्री. सयाजीरावमहाराज यांनीं आपल्या कारकीर्दीत बांधला आहे. यास सुमारें ४० लाख रुपये खर्च झाले आहेत, असें आम्हांस कळलें. आजवा व बडोदा यांच्या दरम्यान निमेटा नांवाचें एक गांव आहे. तेथें आजव्याहून बडोद्याकरितां आणलेलें पाणी फिल्टर करण्याची योजना केली आहे. तलावावर थोडेंफार फिरून व श्री. महाराजसाहेब यांचे बंगल्यावर अल्पोपहार घेतल्यानंतर थोडासा नौकाविहार करून परत फिरलों. भोजनोत्तर विश्रांति घेऊन पुन: पाहण्यासाठीं जावयाचें असें ठरविलें.

आजच्या दोनप्रहरच्या कार्यक्रमांत लक्ष्मीविलास राजवाडा पाहण्याचें ठरविलें होतें, पण तत्पूर्वी आम्ही गायकवाड सरकारच्या सोन्याचांदींनीं मढविलेल्या गाड्या, अंबाऱ्या वगैरे पाहून घेतल्या. गायकवाडांच्या राजवैभवाला साजेशा अशा त्या गाड्या पाहून आह्मांला आमच्या पूर्वजांच्या वैभवाबद्दल सानंद अभिमान वाटला. गायकवाड सरकारचें नशीब थोर ह्मणूनच हें वैभव कायम टिकूं शकलें; पण कित्येक रजवाड्यांची पूर्वीची परिस्थिति " सा रम्या नगरी महान्स नृपति: सामन्तचक्रं च तत् " अशी असतांना " सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नम: " अशी झालेली पाहून अत्यंत खेदहि झाला. उत्तम उत्तम वैभवयुक्त अलौकिक वस्तु दृष्टीस पडत असतांना माणसांचे मनांत उलट स्थितीबद्दल खेदयुक्त विचार यावेत यांत नवल नसून मानसशास्त्राचा तो एक नियमच असावा असें आम्हांस वाटतें. अशा मानसिक आंदोलनांतच आम्ही तेथून बाहेर पडलों व मुलींची शाळा पाहण्याकरितां गेलों. शाळेच्या मुख्याध्यापिका मिस भोर यांनीं आह्मांस सर्व वर्गांतून हिंडून शाळेतील व्यवस्था दाखविली.

शाळेंतील एकंदर टापटीप, स्वच्छता, मुलींच्या वैयक्तिक शिक्षणाबद्दल घेतली जात असलेली आस्था पाहून आम्हांस फारच समाधान झालें. आम्ही तेथील मुलींना खाऊसाठीं २५ रुपये देऊन मिस भोर यांचा निरोप घेतला.

**लक्ष्मीविलास ऊर्फ राजमहाल राजवाडा**

यानंतर आम्ही गायकवाड यांच्या सर्व राजवाड्यांत अग्रेसरत्व पटकाविलें आहे असा, राजवाड्यांचा मुकुटमणी व बडोदनगरीची अप्रतिम, अदृष्टपूर्व अशी कलाकृति म्हणून गाजलेला महाराजांचा लक्ष्मीविलास राजवाडा पाहण्याकरितां गेलों. हा वाडा ह्मणजे श्री. सयाजीराव महाराजांच्या कलाविलास व सौंदर्यासक्तीचें प्रतीकच आहे, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. अलीकडील कालांत एवढी मोठी अलौलिक इमारत हिंदुस्थानांत कोठेंहि नाहीं. इतकेंच काय, पण पाश्चिमात्य देशांतील कांहीं थोड्या अत्यंत सुंदर इमारतींत तिची गणना करण्यांत येत आहे.

राजवाड्याची लांबी सुमारें ५०० फूट असून रुंदी २०० फूट आहे. या राजवाड्यांत एक उंच मनोरा असून त्याची उंची सुमारें २०० फूट आहे. राजवाड्याचे मुख्य भाग चार आहेत. राजदरबाराकरितां एक भाग राखून ठेविला असून त्यांत सुमारें १००० माणसें मावतील असा एक दिवाणखाना आहे. महाराजांस राहण्याकरितां एक भाग व राणीसाहेबांसाठीं एक, असे दोन भाग राखून ठेविले आहेत. महाराजांचा भाग दुचौकी असून दुमजली आहे. त्यास स्वतंत्र द्वार व संगमरवरी जिना असून त्यावर सुंदर नक्षी काढल्यामुळें हस्तिदंतीच असावा, असा भास होतो. महाराजांच्या भागाजवळच उजव्या बाजूस

कामकाजांचीं दालनें असून डाव्या बाजूस ए. डी. सी. ची खोली आहे. पॅलेस ऑफिसकरितां वगैरे स्वतंत्र दालनें आहेत. वरच्या मजल्यावर महाराजांचें ग्रंथसंग्रहालय आहे. या ग्रंथसंग्रहालयाकरितां मुद्दाम लाख दीड लाखांचें सामान फ्रान्सहून आणविलें आहे, असें आम्हांस तेथील व्यवस्थापकानें सांगितलें. तेथेंच भोजनस्थान व दिवसा बसण्यासाठीं निरनिराळे हॉल सुंदर व उंची सामानानें सजविलेले आहेत. वरील दुसऱ्या मजल्यावर श्रीमंतांचें शयनागार आहे. तेथें चांदीसोन्याचे पलंग रुजाम्याच्या गाद्यागिरद्यांनीं युक्त असे आहेत. राजपाहुण्यांकरितां दालनें याच मजल्यावर आहेत.

दरबारहॉलमधील भिंती संगमरवरी दगडाच्या असून छताचें काम अत्यंत सुबक झालेलें आहे. प्रत्येक खोलींतील रंगकाम व त्यांवर काढिलेल्या वेलपत्त्या इतक्या सुंदर व कलापूर्ण आहेत कीं, प्रेक्षकाला त्या खरोखरीच अस्तित्वांत आहेत असें वाटतें. प्रत्येक चौकांत निरनिराळ्या तऱ्हांचीं कारंजीं व त्यांवर बसविलेले सुंदर संगमरवरी पुतळे पाहून आनंद होतो. या राजवाड्यांत एक सुंदर आरसेमहाल आहे. राजवाड्याच्या मनोऱ्याभोंवतीं खालून वर जाण्याकरितां रुंद जिना ठेविला आहे. राजवाड्यांतच दवाखाना, जामदारखाना, गार्दीमहाल वगैरे स्वतंत्र विभाग आहेत. या राजवाड्याचें बाह्यांग दगडी असून अग्रभाग कलाकुसरीनें शृंगारलेला आहे. बांधणी उत्तर हिंदुस्थानांतील शिल्पशालाच्या धर्तीवर असून इतकी सर्वोत्कृष्ट झाली आहे कीं, शिल्पकारांनीं पाहून तोंडांत बोटेंच घालावीं. राजवाड्यासभोंवार सुंदर विस्तीर्ण व पाश्चिमात्य पद्धतीवर केलेला बाग असून तो ठिकठिकाणीं

इलेक्ट्रिक दिव्यांचे खांब, शोभिवंत संगमरवरी पुतळे, संगमरवरी कृत्रिम तळीं, अंतराअंतरावर कारंजीं वगैरे असल्यामुळें जास्तच रमणीय दिसतो. अशी ही अद्वितीय कलाकृति पाहून क्षणभर आपण इंद्रभुवनांतच आहों कीं काय, अशी भ्रांति झाल्यावांचून राहत नाहीं. या राजवाड्यास लक्ष्मीविलास हें नांव सार्थच आहे, यांत शंका नाहीं.

राजमहाल राजवाडा श्रीमंतांनीं मुद्दाम स्वतःला राहण्यासाठीं बांधविलेला आहे. सर्व बांधकाम व आंतील रचना पाश्चिमात्य पद्धतीवर केल्यामुळें आपण एखाद्या पाश्चात्य शहरांतील इमारतींतच आहों असें वाटतें. आधुनिक सुखसोयींनीं सुसज्जित असा हा वाडा पाहून क्षणभर असें वाटतें कीं, गायकवाड सरकारच्या अलौकिक वैभवाची साक्ष पटण्यास हा एकच वाडा पुरेसा आहे. प्रत्येक दालन अत्यंत कौशल्यानें सजविल्यामुळें एकाहून एक जास्त मनोरम झालें आहे. या इमारतीसाठीं श्रीमंतांना बराच पैसा म्हणजे सुमारें पन्नास लाख रुपये लागले, असें कळतें.

लक्ष्मीविलास राजवाडा शिल्पकलेच्या अगर आंतील रचनेच्या दृष्टीनें पाहावयाचा म्हणजे जवळ जवळ ४।६ दिवस तरी मोडावे लागतील, असें आम्हांस वाटतें. कारण प्रत्येक दालन, प्रत्येक फर्निचर वगैरे सामान अत्यंत नमुनेदार असल्यामुळें आपण जितकी निरीक्षणशक्ति खर्च करावी तितकी अपुरीच पडेल, यांत संदेह नाहीं. शक्य तितक्या बारकाईनें सर्व पाहून घेण्यास आम्हांस ३।४ तास लागले. सायंकाळ झाल्याकारणानें आम्ही घाईघाईनें जवळच श्रीमंत महाराजसाहेब यांच्या सोन्याचांदीच्या बगीगाड्या ठेविल्या होत्या तो बगीखाना पाहून परत

फिरलों. घरीं येऊन आम्ही पुन: तेथील दिवाण मेहेरबान खानबहादूर दादाचानजी लवकर सेवानिवृत्त होणार असल्यानें त्यांच्या सन्मानार्थ दिलेल्या पार्टीस निमंत्रणावरून गेलों. त्या वेळीं बडोद्यांतील कांहीं प्रमुख व्यक्तींची व आमची ओळख झाली. विशेषत: रावसाहेब शारंगपाणी जज्ज, रा. ब. भांडारकर, चीफ ज्युडिशियल ऑफिसर, व मे. टेकचंद, सेटलमेंट ऑफिसर, वगैरे सद्गृहस्थ त्यांमध्यें होते. पार्टी झाल्यानंतर परत नजरबागेंत आलों व थोडा वेळ गप्पा मारून झोपेची आराधना करण्याचा विचार केला.

त्यानंतर दुसरे दिवशीं आम्ही सकाळीं मुलांची शाळा, कॉलेज व सरकारी तुरुंग पाहावयाचें ठरवून प्रथम मुलांच्या शाळेंत गेलों. मुलांची शाळा म्हणजे चवथीपासून मॅट्रिकपर्यंत पुढील वर्ग. शाळेभोंवतीं मोठें आवार असून इमारत चांगली हवाशीर आहे. ही स्टेशनाच्या अलीकडे विश्वामित्री नदीचे कांठीं आहे. शाळा पाहून झाल्यावर आम्ही लागलीच जवळच असलेल्या कॉलेजमध्यें गेलों. ही इमारत सर टी. माधवराव यांचे कारकीर्दींत बांधविली आहे, असें आम्हांस कळलें. कॉलेजच्या इमारतीला एक मोठा मशिदीच्या आकाराचा घुमट असून, सभागृह, रसायनशास्त्राच्या वर्गांकरितां प्रशस्त खोल्या व प्रयोगालयें आणि इतर शिक्षणाकरितां मोठमोठे हॉल आहेत. कॉलेजमध्यें बी. ए. व बी. एससी. पर्यंत संपूर्ण शिक्षण देण्याची व्यवस्था असून मि. क्लार्क या एका युरोपियनाची मुख्य अध्यापक म्हणून योजना झाली आहे. क्लार्कसाहेब यांनीं आम्हांस सर्व वर्ग हिंडून दाखविले. जवळच विद्यार्थ्यांकरितां वसतिगृह बांधलें आहे. शिक्षण जवळ जवळ मोफतच

फिरलों. घरीं येऊन आम्ही पुनः तेथील दिवाण मेहेरबान खानबहादूर दादाचानजी लवकर सेवानिवृत्त होणार असल्यानें त्यांच्या सन्मानार्थ दिलेल्या पार्टीस निमंत्रणावरून गेलों. त्या वेळीं बडोद्यांतील कांहीं प्रमुख व्यक्तींची व आमची ओळख झाली. विशेषतः रावसाहेब शारंगपाणी जज्ज, रा. ब. भांडारकर, चीफ ज्युडिशियल ऑफिसर, व मे. टेकचंद, सेटलमेंट ऑफिसर, वगैरे सद्गृहस्थ त्यांमध्यें होते. पार्टी झाल्यानंतर परत नजरबागेंत आलों व थोडा वेळ गप्पा मारून झोपेची आराधना करण्याचा विचार केला.

त्यानंतर दुसरे दिवशीं आम्ही सकाळीं मुलांची शाळा, कॉलेज व सरकारी तुरुंग पाहावयाचें ठरवून प्रथम मुलांच्या शाळेंत गेलों. मुलांची शाळा म्हणजे चवथीपासून मॅट्रिकपर्यंत पुढील वर्ग. शाळेभोंवतीं मोठें आवार असून इमारत चांगली हवाशीर आहे. ही स्टेशनाच्या अलीकडे विश्वामित्री नदीचे कांठीं आहे. शाळा पाहून झाल्यावर आम्ही लागलीच जवळच असलेल्या कॉलेजमध्यें गेलों. ही इमारत सर टी. माधवराव यांचे कारकीर्दींत बांधविली आहे, असें आम्हांस कळलें. कॉलेजच्या इमारतीला एक मोठा मशिदीच्या आकाराचा घुमट असून, सभागृह, रसायनशास्त्राच्या वर्गांकरितां प्रशस्त खोल्या व प्रयोगालयें आणि इतर शिक्षणाकरितां मोठमोठे हॉल आहेत. कॉलेजमध्यें बी. ए. व बी. एससी. पर्यंत संपूर्ण शिक्षण देण्याची व्यवस्था असून मि. क्लार्क या एका युरोपियनाची मुख्य अध्यापक म्हणून योजना झाली आहे. क्लार्कसाहेब यांनीं आम्हांस सर्व वर्ग हिंडून दाखविले. जवळच विद्यार्थ्यांकरितां वसतिगृह बांधलें आहे. शिक्षण जवळ जवळ मोफतच

द्यावयाची व्यवस्था केली आहे, असें म्हटल्यास फारसें वावगें होणार नाहीं. या इमारतीसभोंवार एक विस्तृत बाग असून एकंदर इमारत मजबूत व सुरेख आहे.

यानंतर आम्ही तेथील मध्यवर्ती तुरुंग पाहण्यास गेलों. तुरुंगाची व्यवस्था अत्यंत समाधानकारक असून नवीनच पद्धतीवर कैदी सुधारण्याचे दृष्टीनें ज्याच्या त्याच्या अपराधाचे मानानें शासनपद्धतीची योजना केली होती. या कारागृहाची रचना वर्तुलाकृती असून मधोमध रक्षकाकरितां उंच मनोरा बांधण्यांत आला आहे. तुरुंगाबाहेरील तट चतुष्कोनी असून चारी कोपऱ्यांवर व मध्यभागीं पाहरेकऱ्यांकरितां मनोरे बांधण्यांत आले आहेत. तटाचे आंतील बाजूस कैदी लोकांकरितां रुग्णालय, धंदेशिक्षण देण्याचा वर्ग व कार्यालय वगैरे आधुनिक सोयी करण्यांत आल्या आहेत. तुरुंगांतील एकंदर टापटीप, स्वच्छता व सर्व कामंधाम पाहून आमचें फारच समाधान झालें. कारागृह पाहण्यास जवळजवळ तास दीडतास खर्च करावा लागला. हें सर्व आटपेपर्यंत सुमारें बारा वाजण्याची वेळ झाली म्हणून शक्य तितक्या घाईनें पाहून स्वस्थानीं परत फिरलों.

मध्यवर्ती तुरुंग Central Prison

दोन प्रहरीं सुमारें ३-३॥ चे सुमारास आम्ही पूर्वी एके काळीं भोरचे प्रजाजन असलेले बडोद्याचे काठेवाडी दिवाण यांचेकडे पानसुपारीस गेलों होतों. दिवाणसाहेब यांचेकडे आमचा चांगल्या प्रकारें सत्कार झाला. तेथील समारंभ आटोपण्यास चार वाजले. त्यामुळें आम्ही पूर्वी ठरविल्या-प्रमाणें लागलीच तेथील रेसिडेन्ट सी. व्ही. बोझांकेट, ओ. व्ही., यांना भेटावयास रेसिडेन्सींत गेलों. त्यानंतर तेथील हत्तीखाना पाहिला.

हत्तीखान्यांत सुमारें ३०।४० हत्ती असून त्यांना निरनिराळे खेळ शिकविण्याकरितां स्वतंत्र मनुष्याची योजना केली आहे. हत्तींची कसरत दाखविण्याची व्यवस्था करण्यांत येते. आमच्याकरितां मुद्दाम हत्तींची कसरत, साठमारी वैगेरे दाखविण्याची व्यवस्था केली होती. एकंदरींत ते खेळ पाहून आमची बरीच करमणूक झाली. साठमारी वैगेरे खेळ पाहून झाल्यानंतर पुन: एकवार सोन्याचांदीच्या अंबाऱ्या, हौदे वैगेरे पाहून तेथील रा.. रा त्रिंबकराव आचार्य यांचे घरीं पानसुपारीस गेलों.

आतां यापुढें आम्हीं बडोद्यास आणखी एक दिवस काढून पुढें अहमदाबादेस जाण्याचें ठरविलें होतें, त्यामुळें तो दिवस कांहीं स्नेही-मंडळी व तेथील सद्‌गृहस्थ यांच्या भेटीगाठींत जाणें स्वाभाविकच होतें. अगदीं सकाळींच आमचे उपरोक्त आप्त राजेश्री शंकरराव पुराणिक यांनीं आम्हांस आग्रहपूर्वक आमंत्रण दिल्यावरून त्यांच्या घरीं जेवणास जाव-याचें ठरविलें. पण तत्पूर्वीं आम्ही व आमची पार्टी या सर्वांचा एक ग्रुप फोटो मि. चिपळूणकर यांनीं घेतला. दोन प्रहरीं पुराणिक यांचे घरीं भोजन आटोपल्यानंतर दि. ब. वासुदेवराव समर्थ, रा. साने व रावसाहेब वणीकर सुभेसाहेब यांचेकडे आम्हांस पानसुपाऱ्या वैगेरे झाल्या. रा. नरहरपंत आंबेकर परीक्षा असल्यामुळें परत गेले. घरीं येऊन थोडीशी विश्रांति घेतों न घेतों तोंच श्रीमंत महाराजसाहेब यांचें निरोप देण्या-साठीं बोलावणें आल्यावरून आम्ही तिकडे गेलों. त्या वेळीं महाराजसाहेब यांनीं आम्हांस, श्री. कै. सौ. राणीसाहेबांस व आमच्या बरोबरील सर्व मंडळींस आहेर वैगेरे देऊन प्रेमपूर्वक निरोप दिला.



आमचा ग्रुप फोटो

[ पान २०

अशा रीतीनें तो दिवस बडोद्यांतील नव्या जुन्या ओळखीच्या स्नेह्यांना भेटण्यांतच गेला. एकंदरींत आम्ही जवळ जवळ एक आठवडा बडोद्यांतील महाराजसाहेब व इतर स्नेही मंडळी यांच्या आदरातिथ्यांत व मोठ्या आनंदांत घालविला आणि प्रवासास निघण्यापूर्वींची उदासीनता थोडीफार कमी झाली.

एकंदरींत बडोदा येथील हवा आमच्या दृष्टीनें खराब म्हणण्यास हरकत नाहीं. पण गांवाबाहेर एखादा बंगला घेऊन राहणाऱ्यास गांवांतील गलिच्छ वस्तीचा संपर्क न होतां चांगल्या रीतीनें राहतां येईल असें वाटतें. अद्याप गांवांत थोडीफार गलिच्छ वस्ती दृष्टीस पडतेच. परंतु सध्यांच्या महाराजसाहेबांनीं शक्य तितक्या व्यवस्था वगैरे करून पाणी, स्वच्छता व टापटीप या दृष्टीनें सुधारणा करण्याची योजना केली आहे.

बडोदा हें संस्थान गुजराथेंत जरी असलें तरी महाराजसाहेब जातीनें मराठे असून पूर्वींचे दक्षिणेकडील असल्यामुळें बरीचशी दक्षिणी लोकांची वस्ती येथें आहे. भाषा गुजराथी व मराठी प्रचारांत आहेत. पण मुख्यतः सर्व लोक गुजराथीच जास्त बोलतात. एकंदरींत लोक गलिच्छ व अस्वच्छ. एकतर आजपर्यंत पाण्याचें दुर्भिक्ष्य असल्यामुळें आम्हाला वाटतें इकडील लोक आठ आठ दिवसांत स्नान करीत नसावेत व तीच संवय झाल्यामुळें आज जरी महाराजसाहेबांच्या कृपेनें पाण्याची सुबत्ता झाली तरी त्यांच्यांतील अस्वच्छ राहणी अद्याप गेली नाहीं. यामुळें बडोद्यांत आजारीपणा व रोगराई यांचें प्रस्थ फार असतें, असें येथील डॉक्टर लोक सांगतात. नवीन मनुष्य ४।८ दिवस राहिल्यानंतर हटकून आजारी पडावयाचाच अशी येथील प्रथा, पण आम्ही

पूर्वीपासूनच विशेष काळजी घेत असल्यामुळें आमच्या कँपांतील कोणालाहि बडोदें बाधलें नाहीं. येथील लोक आदरातिथ्य वगैरेला चांगले आहेत व स्वभावानें सात्त्विक विचाराचेच जास्त, असा आम्हांस अनुभव आला. असो! अशा रीतीनें त्या आठवड्यांत आम्हांला जितकें पाहावयास मिळालें तेवढें पाहून घेतलें व त्या अल्प काळांत जें जें पाहिलें याचें वर्णन यथामति येथें केलें. दुसरे दिवशीं सकाळीं आम्हीं बडोदें सोडण्याचें ठरविलें होतें व त्याप्रमाणें तारीख १ मार्च रोजीं सकाळीं बडोद्याहून निघालों. स्टेशनवर आम्हांस बरीच मंडळी निरोप देण्यास आली होती.

# अहमदाबाद

बडोद्याहून आम्ही सकाळीं ७॥ वाजतां निघालों ते अहमदाबादेस बरोबर १०॥ वाजतां पोहोंचलों. अहमदाबादेस आम्ही मगनभाईचे वाडींत राहावयाची व्यवस्था केली. येथें निदान तीनचार दिवस तरी काढावेत, असा आम्हीं विचार केला होता. आम्ही स्टेशनवरून आमच्या निवासस्थानास येतांच मुखमार्जन, स्नान वगैरे आटोपून पोटपूजेची व्यवस्था करावयास सांगितलें. भोजनोत्तर चांगली विश्रांति घेऊन मग प्रथमतः सर्व गांवांत चक्कर मारून यावें, असा विचार केला. त्याप्रमाणें दोनप्रहरीं आम्ही सर्वजण गांवांतून फिरावयास निघालों. आम्ही अहमदाबादेंत शिरतांच आमच्या प्राचीन धार्मिक भावनांची कल्पना आली. कारण सर्व गांवांत चोहोंकडे देवळें व मंदिरें यांचीं शिखरेंच शिखरें दिसूं लागतात. बहुतेक सर्व गांवांत हिंदुमुसलमानांचीं दीडशें दोनशें देवळें आहेत. नुसत्या जैन लोकांचीं शंभर सवाशें देवळें आहेत. कोठेंहि गेलें असतां देऊळ नाहीं असा एकहि रस्ता नाहीं.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ........
ग्रंथ ...... ...... (प्रत)

ठिकठिकाणीं देवळें, मशीदी, कबरी व हिंदुमुसलमानांचीं धर्मस्थानें दृष्टिपथांत येतात.

अहमदाबाद शहर अत्यंत विस्तृत असलें तरी या आळींतून त्या आळींत, लहान लहान बोळांतूनच जावें लागतें. रस्ते फारच अरुंद असून थोडेफार गलिच्छच आहेत. अहमदाबाद जरी सर्व मुंबई इलाख्यांत प्रसिद्ध आहे तरी या शहराइतकें अव्यवस्थित शहर आम्हीं तरी कोठेंहि पाहिलें नाहीं.

शहरांत चोहोंकडे घाण व धुरळयाचें साम्राज्य पसरलेलें दिसतें. परंतु ह्या धुरळ्यांतच ज्याप्रमाणें एखादें रत्न चमकावें त्याप्रमाणें ठिकठिकाणीं सुंदर इमारती कलाकुसरीनें परिपूर्ण अशा मन वेधून घेतात. प्रत्येक बोळांतून सुंदर कलापूर्ण इमारती व देवळें दृष्टीस पडतात. त्यांवरून अहमदाबाद शहराची संपन्नता कळून येते. कलेच्या दृष्टीनें अहमदाबाद हें गुजराथेंतील अत्यंत प्रसिद्ध शहर आहे. सर्व मुंबई इलाख्यांत अहमदाबादेसारखें सुंदर शहर क्वचितच दृष्टीस पडतें.

शहरांतून जात असतांना आम्हांला उत्तम उत्तम व सुंदर अशा कलापूर्ण इमारती पाहावयास मिळाल्या. त्यांत विशेषत: जगद्विख्यात जुम्मा मशीद, राणी शिप्रीची मशीद वगैरे नमुनेदार, सुंदर व पाहण्यासारख्या आहेत. त्याचप्रमाणें शहराबाहेर हरिरची विहीर, शाहआलम, शाहीबाग वगैरे स्थानें बांधणीच्या दृष्टीनें प्रेक्षणीय आहेत. या सर्व इमारती व स्थळें आम्हीं शांतपणें दोनतीन दिवसांच्या मुक्कामांत पाहण्याचें ठरविलें होतें. हत्तीसिंगाची कबर व इतर जैन देवळें पाहून पूर्वीं येथें धार्मिक भावना असलेल्या लोकांचें प्राबल्य असावें, असें आम्हांला वाटलें.

परत फिरतांना आम्ही थोडा वेळ साबरमती नदी व म्युनिसिपल बागेंतून हिंडून आलों.

हत्तीसिंग देऊळ

दुसरे दिवशीं सकाळीं मुखमार्जन, चहा वगैरे आटोपून आम्ही अहमदाबाद वॉटरवर्क्स पाहण्याच्या उद्देशानें तिकडे निघालों. पिण्याचें पाणी ठिकठिकाणीं नदीचे पात्रांत विहीरी काढून फिल्टर केलेलें आहे व नळानें गांवांत आणण्याची व्यवस्था केलेली आहे. वॉटरवर्क्स पाहण्याची आम्हांस विशेष उत्सुकता नसल्यामुळें वरवरच पाहून आम्हीं 'हत्तीसिंग' देवळाकडे वळलों. हें देऊळ दिल्लीगेटाच्या उत्तरेस आहे. हें सर्व संगमरवरी दगडाचें असून वरच्या बाजूस त्रेपन्न घुमटांनीं वेष्टित असें बांधलें आहे. देऊळ व जवळच असलेलें धर्मशाळावजा राहण्याचें ठिकाण १८४७ चे सुमारास बांधलें आहे. यास दहा लाख रुपये खर्च झाला, असें सांगण्यांत आलें. याचा विस्तार बराच मोठा असून तें जैनपद्धतीवर बांधलेलें आहे. प्राचीन हिंदु देवालयांवर जरी पूर्वीं बरेचसे घाले आले तरी हें देवालय आजतागायत आहे त्याच सुस्थितींत असल्यामुळें याच्या मजबूत बांधणीची कल्पना येते. देवळाचें खोदीव काम फारच मनोरम असून त्यावर जैन तीर्थंकारांच्या वगैरे प्रतिमा असल्यानें अस्सल जैनधर्माची त्यावर छाप पडली आहे. देवळांत येण्यास मोठें प्रांगण असून वर येण्यास तेथचे लोंकरीचे बूट घालून जावें लागतें. पायांतील बूट, वहाणा येथेंच काढावयाचीं असतात. लोकरीचे बूट तेथेंच मिळतात. देवळास बाहेर एक चौक असून आंत गाभारा आहे. दोन्हीहि ठिकाणीं संगमरवरी दगडाची तक्तपोशी आहे. आंतील

गाभाऱ्यांत ' धर्मनाथ ' या नांवाची एक मूर्ति असून तिचे डोळयाच्या ठिकाणीं इमिटेशन हिरे बसविलेले आहेत. जसजसे आम्ही आंत जाऊं लागलों तसतसें एकप्रकारचें गंभीर वातावरण वाटूं लागलें. देवळाची भव्यता वाढूं लागते. विविध प्रकारची रचना पाहून आम्हांस फारच आनंद झाला.

शाहीबाग

हें देऊळ पाहून झाल्यावर आम्ही जवळच असलेला ' शाहीबाग ' पाहण्यास गेलों. शिल्पकलेच्या दृष्टीनें विशेष असें यांत कांहीं नाहीं. शाहीबाग हें एक खासगी राहण्याचें स्थान असून चांगलें बंगलेवजा आहे. तेथें पूर्वी राजघराण्यांतील झनाना होता, असें आम्हांस सांगण्यांत आलें. सध्यां मात्र येथें डि. सु. ऑफ पोलीस राहतात. हा झाला 'छोटा शाहीबाग.' यापुढें रेल्वेलाइनच्या नंतर 'शाहीबाग' नांवाचें एक उद्यान आहे. छोटा शाहीबाग व शाहीबाग एका रस्त्यानें जोडलेले आहेत. शाहीबागची इमारत शाहजान बादशाहनें सन १६६२ मध्यें बांधविली आहे. साबरमती नदीवर रेल्वेलाइनच्या पुलानजीकच शाहीबाग आहे. शाहीबागेवरून साबरमती नदी अत्यंत मनोवेधक दिसते. इतकें पाहून झाल्यानंतर बराच वेळ झाल्यानें आम्ही आमच्या निवासस्थानाकडे परत फिरलों. घरीं येऊन भोजनोत्तर थोडीशी विश्रांति घेऊन आम्ही अहमदाबाद येथील कमिशनर मि. आर. पी. बरो यांचे भेटीस गेलों.

शाहआलमची कबर
कँकेरीया तलाव

भेटीहून परत आल्यावर दोनप्रहरीं आम्ही शाहआलमची कबर व प्रख्यात कँकेरीया तलाव पाहण्याचें ठरवून तिकडे निघालों. प्रथम आम्ही ' बाटवा ' येथील ' शाह-आलमची कबर ' पाहण्यास गेलों. कबरस्थानांत जाण्यापूर्वी दोन द्वारें लागतात व लागलीच पुढें एक नगारखाना असून आंतील

बाजूस मोठेंच मोठें अंगण आहे. अंगणांत एका बाजूस एक मशीद असून तिजवर सात मजली दोन मनोरे आहेत. मनोऱ्यांवरील खोदकाम अप्रतिम असून मनोवेधक आहे. मशीदीच्या पूर्व बाजूस शाहआलमचें कबरस्थान असून त्यावर रक्षणाकरितां एका धातूचें आस्तरण केलेलें आहे. कबरस्थानाची तक्तपोशी काळ्यापांढ्र्या संगमरवरी दगडाच्या मिश्रणानें बनविलेली आहे. त्याचे दरवाजे चांगले कोरीव काम केलेले पितळी आहेत. एकंदरींत हें कबरस्थान शिल्पकलेच्या दृष्टीनें प्रेक्षणीय आहे, यांत शंका नाहीं. कबरस्थान पाहून झाल्यावर आम्ही 'कंकेरीया तलावा'कडे वळलों. इकडील भागांत हा तलाव सर्वांत मोठा आहे. हा तलाव जवळ जवळ ३०।३५ बाजूंनीं वेष्टित असून त्याचा सबंध परिघ एक मैल असावा, असें वाटतें. तलाव १४५१ मध्यें कुतुबुद्दीननें बांधविला असें आम्हांस समजलें. तलावाचे मध्यभागीं एक लहानसें बेट असून त्यांत ' नगिना ' नांवाचें सुंदर उद्यान व ' घंटामंडळ ' म्हणून घाट आहे. या बेटामुळें तलावास जास्तच शोभा आलेली आहे. तलावांत थोडासा नौकाविहार करून आम्ही तेथील मि. पाटील वकील यांचेसह परत फिरलों. पाटील यांनीं आमच्या अहमदाबादेंतील मुक्कामांत बरीचशी तसदी घेऊन तेथील सर्व प्रेक्षणीय स्थळें दाखविलीं.

सारखेज

दुसरे दिवशीं सकाळीं आम्हीं तेथून सुमारें ७ मैलांवर असलेल्या ' सारखेज ' नांवाच्या ठिकाणीं जावयाचें ठरविलें. येथें अहमदाबाद येथील अत्यंत सुंदर व प्राचीन कलेचे नमुने पाहावयास मिळतात. हल्लीं तें पूर्वीचें वैभव जरी अवनत झालें असलें तरी तेथील कांहीं कांहीं शिल्पकलेचे

नमुने पाहून मनुष्याचें मन अत्यंत आनंदित होऊन जातें. आम्ही सकाळीं ७॥ वाजतां तिकडे जाण्यास निघालों. जाण्याकरितां दोन दोन माणसें बसतील अशा गाड्या मिळतात. शिवाय मोटारीहि मिळतात. आम्हीं स्पेशल मोटारीनेंच गेलों होतों. जावयास सुमारें १५।२० मिनिटें लागतात. सारखेजकडे जातांना मध्यंतरीं साबरमती ओलांडावी लागते. 'इलिझ ब्रिज' नांवाचा एक मोठा पूल बांधून तीवरून रहदारीची सोय केली आहे. साबरमती नदीच्या डाव्या तीरावर 'व्हिक्टोरिया गार्डन्' या नांवाचें एक मोठें उपवन असून त्यांत व्हिक्टोरिया राणीचा एक मोठा पुतळा आहे. सारखेजकडे जातांनाच सुमारें ३ मैलांवर रस्त्याचे डाव्या बाजूस एक मोठी विटांनीं बांधलेली इमारत दिसते. सारखेजची रचना करणारे प्रख्यात अझम व मुअझ्झम या दोन भावांची ती कबर आहे.

सारखेजच्या मुख्य भागीं जाण्यास मोठा रस्ता असून वाटेंत दोन कमानी लागतात. कमानींतून गेल्यानंतर लागलीच आपण एका विस्तीर्ण पटांगणांत शिरतों व हेंच मुख्य भागाबाहेरील पटांगण. दर्शनीभागाचे डाव्या बाजूस 'महमूद बेघरा' याची एक सुंदर कबर आहे. सारखेज येथें हिंदी शिल्पकलेचे अत्युकृष्ट नमुने पाहावयास सांपडतात. मुसलमान लोकांचीं सुंदर व नक्षीकाम केलेलीं थडगीं पाहण्यासारखीं आहेत. सारखेज येथील इमारती अहमदाबादच काय, पण सबंध गुजराथमध्यें प्रसिद्ध आहेत. रचनाकौशल्याचे दृष्टीनें त्या अत्यंत उत्तम असून संपूर्ण हिंदु पद्धतीवर आहेत. सारखेज येथें मोठमोठे दगडी तलाव आहेत. सध्यां हे तलाव पाण्याविना असल्यामुळें ओसाड वाटतात.

सारखेजपासून सुमारें ३०० यार्डांवर दोन विटांचे सुंदर मनोरे आहेत. त्यांची उंची सुमारें ३०।३५ फूट असावी, असें वाटतें. या मनोऱ्यांचा पाया अशा रीतीनें बांधला आहे व एकमेकांस जोडिलेला आहे कीं, आपण जर एक मनोरा हातानें हालविला तर दुसराहि हालतो. यामुळें यांस 'झुलता मनोरा' असें म्हणतात व त्याच नांवानें ते प्रसिद्ध आहेत. येथें आमचा बराच वेळ मोडला. आमच्या बरोबर पूर्वीं उल्लेखिलेले पाटील वकील आले होते. त्यांचेसह आम्ही त्यांच्या बंगल्याकडे परत फिरलों व तेथें चहा, उपहार वगैरे झाल्यानंतर परत निवासस्थानाकडे आलों.

झुलते मनोरे

यानंतर दुसरे दिवशीं आम्हीं रात्रीं अबू पहाडाकडे जावयाचें ठरविलें होतें, त्यामुळें त्या दिवशीं आमचा सर्व वेळ तेथील ओळखीच्या स्नेही मंडळींना भेटण्यांतच गेला, असें म्हटलें तरी चालेल. सकाळीं आम्हांस अहमदाबादचे शेट दसरीभाई हत्तीसिंग व भोर येथील आमच्या बरोबर असलेले पांडुरंग पागे यांचे मामा रा. अनंतराव कवडे जुन्नरकर यांचेकडे पानसुपाऱ्या झाल्या. पाग्यांच्या मामांकडे जलतरंगवादन व फोटो वगैरे कार्यक्रम झाले.

सायंकाळीं पाटील वकील यांचेकडे आमच्या आगमनाप्रीत्यर्थ एक चहापार्टी देण्यांत आली. त्या वेळीं अहमदाबाद येथील कांहीं मंडळींच्या ओळखी करून दिल्या. तेथील कार्यक्रम आटोपतांच आम्ही घरीं परत येऊन लागलीच बांधाबांध करण्यास सांगितलें व स्टेशनवर जाण्याच्या तयारीस लागलों. रात्रौ ९ वाजतां अबूरोडकडे जाणाऱ्या गाडीनें आम्ही निघालों.

एकंदरींत अहमदाबाद शहर जरी सांपत्तिक व मोठमोठ्या इमारती वगैरे दृष्टीनें प्रसिद्ध असलें तरी आम्हांला फारच गलिच्छ वाटलें. लोकहि फारच घाणेरडे. व्यापार मात्र फारच मोठा असून गिरण्याहि बऱ्याच आहेत. तेथील मुख्य व्यापार कापडाचा. येथील गालिचे तर फारच प्रसिद्ध आहेत. अहमदाबादच्या आसपास प्रसिद्ध स्थळांचे अवशेष पाहण्यास सांपडतात. हस्तकलेच्या दृष्टीनें अहमदाबाद हें कारागिरांचें शहर आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. उत्तम उत्तम सोनारांचीं व जवाहिऱ्यांचीं प्रसिद्ध दुकानें येथें आहेत. तसेंच तांब्यापितळेचीं नक्षीकामें येथें सुंदर होतात. अहमदाबाद हें कसल्याहि नक्षीकामाबद्दल प्रसिद्ध आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

जामी मशीद, राणी शिप्रीची मशीद, दस्तुरखानची मशीद, तीन दरवाजा, बाई हरीरची विहीर वगैरे बांधकामाच्या दृष्टीनें पाहण्यासारखीं स्थळें आहेत. शक्य तर अबूवर जास्त काळ काढावा अशा विचारानें आम्ही अहमदाबाद येथें मुक्काम कमी केला.

---

# अबूचा पहाड

आम्ही अबूकडे जाण्यास रात्रौ ९ वाजतां निघालों तों अबूरोडवर पहांटे ३॥ वाजतां पोहोंचलों. अबूरोड स्टेशनपासून अबूचा पहाड १८।१९ मैल लांब आहे. सकाळीं सूर्योदय झाल्याशिवाय मोटार मिळत नसल्यामुळें आम्हांला स्टेशनवर बराच वेळ काढावा लागला. स्टेशनपासून पहाडावर जाण्यास मोटारी मिळतात व त्याचा मक्ता गव्हर्नमेन्टकडून तेथील एका व्यापाऱ्यास दिलेला आहे. माणसीं दर ठराविक आहेत. त्यांत देखील फर्स्ट क्लास, सेकंड क्लास सीटस् असा भेद आहे व त्यावरच भाडयाची आकारणी केली जाते. आम्हीं सर्व मंडळीकरितां एक मोटार ठरविली. भाडें रुपये ३५ आम्हांला मोटारवाल्यास द्यावें लागलें.

अबूवर जाण्याकरितां १५ दिवस अगोदर कळवावयास पाहिजे, असें आम्हांस पुण्यास मि. कारमायकेल म्हणाले होते. आम्हांस १० दिवस राहण्याची स्पेशल परवानगी मिळाली होती. अबूवर जाण्याकरितां आम्ही ८॥ वाजतां मोटारींत बसलों. सुमारें १० वाजतां अबूवर

आलों. आमच्या ओळखीचे मि. शंकर बळवंत केळकर या नांवाचे एक गृहस्थ तेथें पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटमध्यें होते. त्यांना भेटून त्यांच्या ओळखीनें ' होर्मिझ हॉल ' नांवाचा एक बंगला आम्हीं दहा दिवसांच्या करारानें पूर्वीच ठरविला होता. भाडें शंभर रुपये ठरविलें होतें. मोटार थेट होर्मिझ हॉलपर्यंत जात नसल्यामुळें आम्ही मध्यंतरीं डाकबंगल्यावर उतरलों व तेथून सुमारें १॥ मैल रिक्षांमधून बंगल्याकडे गेलों.

अबूचा पहाड हिंदुस्थानांतील अत्यंत सुंदर व रमणीय स्थानांपैकीं एक व हवेचें ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. याशिवाय पहाडावर बरींचशीं प्रेक्षणीय स्थळें असून निसर्गदत्त वनश्रीमुळें त्यास रमणीयत्व प्राप्त झालें आहे. प्रत्येक प्रवासी माणसानें निदान एकदां तरी अबू पाहावा, असें पूर्वीपासून वाटत असल्यामुळें मोटारींतून जातांना आमची उत्सुकता एकसारखी वाढत होती. शिवाय अहमदाबाद येथील थोडयाफार गलिच्छ व उष्ण वातावरणांतून आम्ही निघाल्यामुळें अबूवर येतांच तेथील थंडगार हवा, प्रेक्षणीय वनश्री, एकसारख्या एकीपाठीमागून एक अशा वर जाणाऱ्या टेकडया व त्यांमधील विस्तीर्ण दऱ्या पाहून आमचें मन फारच प्रसन्न झालें. एकंदरींत अबूबद्दल आमची कल्पना होती तींत तीळमात्रहि उणेपणा नव्हता. सर्वच वातावरण आल्हादकारक असल्या-मुळें आम्ही जरी रात्रभर प्रवासाच्या जाग्रणानें त्रासलों होतों तरी वर येतांच एक प्रकारची हुषारी वाटून मन प्रसन्न झालें. अर्थात् अशा थंड हवेंत उपयुक्त वाटणारें व प्रवासाचा शीण घालविण्यासाठीं आमचें प्रात:कालचें मुख्य आन्हिक चहा वगैरे त्याच्या आराधनेंत गुंतलों. अबुवर सुमारें एक आठवडा तरी निदान काढावा, असें आम्हीं

ठरविलें होतें व त्याच उद्देशानें दहा दिवसांच्या करारानें आम्हीं बंगला घेतला होता.

अबू म्हणजे अरवली पर्वताच्या रांगांपैकीं एक पहाड. हिमालया-शिवाय जर हिंदुस्थानांत दुसरें उंच ठिकाण असेल तर तें अबूच. अबूचा बराचसा भाग समुद्रसपाटीपासून सुमारें ४५०० फूट उंच आहे व त्यांतील मुख्य गुरुशिखर सुमारें ५६०० फूट उंच आहे. अरवली पर्वतावर येतांच आम्हांस मेवाडच्या महान् प्रतापी प्रतापसिंहाची आठवण झाली. पूर्वी इतिहास वाचतांना राणा प्रतापसिंह हा मुसलमानांस हार न जातां याच अरवली पर्वताचे एका रांगेंत वर्षानुवर्षें दडून राहिला असल्याचें वाचिलें होतें. पहाडाची रचना अशी आहे कीं, येथील भिल्ल लोक जरी जवळच कपारींत पडून राहिले तरी सहज लक्षांत येणें कठीण. अबूवरील पठार सुमारें १२ मैल लांब असून २।३ मैल रुंद आहे. राजपुतान्यांतील संस्थानिकांचे बंगले व सरकारी इमारती येथें बऱ्याच आहेत. तिकडील श्रीमंत लोकांचें उन्हाळ्याचें हवा खाण्याचें हें ठिकाण असल्यामुळें येथें वस्ती बरीच आहे. शिवाय वर प्रख्यात जैन दिलवारा नांवाचीं देवळें, वसिष्ठाश्रम, गोमूख वगैरे पवित्र स्थानें असल्यामुळें अबूस धार्मिक दृष्ट्या महत्त्व आलें आहे.

अबू पर्वताची शोभा फारच अवर्णनीय व रोमांचकारी असून घनदाट वृक्षराजींनीं युक्त आहे. निरनिराळ्या प्रकारचे वृक्ष व तऱ्हतऱ्हेच्या रंगांच्या फुलांचीं झाडें मनुष्याचें मन वेधून टाकतात. कितीहि चाललें तरी थकवा म्हणून येत नाहीं. कारण ठिकठिकाणीं पाणी व छाया हीं देवदूताप्रमाणें तयार असल्यामुळें सर्व श्रमांचा परिहार होऊन जातो.

जिकडे पाहावें तिकडे हिरवेगार वृक्ष व झुडपें. आम्हांस वाटलें कीं पाव-साळ्यांत व त्यानंतर लागलीच राहून येथील निसर्गशोभा निरीक्षण करणें म्हणजे खरोखर एक औरच मजा असेल. त्या वेळीं येथें अत्यंत रमणीय दृश्य दृष्टीस पडतें, असें आम्हास कळलें. यापूर्वीं आम्हीं अशा प्रकारचें ठिकाण म्हणून इकडील प्रसिद्ध असलेलें महाबळेश्वर फक्त पाहिलें असल्यामुळें आम्हांस अबू व महाबळेश्वर यांमधील फरक कळून आला. तुलनाच करावयाची झाल्यास सृष्टिसौंदर्य व हवा यांमध्यें अबूपेक्षां महाबळेश्वरच जास्त सरस व वरचढ म्हणण्यास हरकत नाहीं.

अबू पहाड हा शिरोही संस्थानचे हद्दींत आहे. परंतु तेथील फौज-दारी व दिवाणी अधिकार शिरोहीचे महाराजांचे संमतीनें ब्रिटिश सरकारकडे दिले आहेत.

अबू हें नांव प्राचीन अर्बुदपासून आलें आहे व याबद्दल ब-याच पौराणिक आख्यायिका आहेत. पैकीं एक आख्यायिका अशी कीं, मुनि वसिष्ठ यांनीं शिवाराधना करून आपल्या तपःसामर्थ्यानें श्रीशिवास प्रसन्न करून घेतलें व हिमालयापैकीं कांहीं भाग त्या ठिकाणीं आणावा असा वर मागितला. त्याप्रमाणें श्रीशंकरांनीं तो वर पूर्ण केला. यामुळें सध्यांचा अबू पहाड हा कांहीं अंशीं हिमालयाचा भाग असावा, असें म्हणतात. पण त्यांत कांहीं तथ्य नाहीं.

अबूवर भरपूर सृष्टिशोभा व प्राचीन धार्मिक स्थानें पाहण्यासारखीं असल्यामुळें सर्व पाहण्यास सुमारें १५।२० दिवस तरी काढावे लागतात. आम्हीं मात्र निदान एक आठवडाभर राहून शक्य तितकीं महत्त्वाचीं स्थळें पाहण्याचें ठरविलें.

आदले दिवशीं रात्रीं बराच त्रास झाल्यामुळें आम्ही भोजनोत्तर चांगली विश्रांती घेऊन त्या दिवशीं फक्त तेथील सृष्टिसौंदर्य पाहण्याचे उद्देशानें बाहेर पडलों. आपल्याकडील महाबळेश्वराप्रमाणेंच अबूवर देखील कांहीं पॉइंटस् पाहण्यासारखे आहेत. त्यांपैकीं आम्ही 'सन्सेट पॉइंट' पाहण्यासाठीं तिकडे गेलों. तेथून सूर्यास्ताचा सुंदर देखावा दृष्टीस पडतो. हा पॉइंट म्हणजे पर्वताचें पुढें गेलेलें एक टोंक. सायंकाळचे संधीस सहस्त्ररश्मी अस्तास जात असतांना क्षितिजाखालीं चाललेल्या तेजोगोलाचे किरण चहूंकडे फांकल्यामुळें निरनिराळ्या रंगांनीं पश्चिम दिशा अत्यंत शोभिवंत दिसते. त्या अपूर्व देखाव्याचें वर्णन करावयास आमची लेखणी असमर्थ आहे. एकंदरींत हा देखावा अवर्णनीय व अपूर्व यांत संदेह नाहीं. या टोंकावरून खालीं पसरलेली विस्तीर्ण भूमि व तिजवर सूर्यनारायणाचीं किरणें प्रतिबिंबित झाल्यामुळें सगळा प्रदेश इतका रमणीय व मनोवेधक दिसतो कीं, बराच कालपर्यंत तेथून हालूंच नये असें वाटतें. एकसारखें एका ठिकाणीं बसून राहिलें तरी मनाचें पूर्ण समाधान होत नाहीं. इतकेंच नव्हे, तर जरी आपण तेथून परत फिरलों तरी कांहीं कालपर्यंत आपल्या मनश्चक्षूपुढें आलेलें तें मनोहर दृश्य विसरणेंच अशक्य. आम्ही जरी तेथें बराच वेळ काढला—जवळ जवळ सर्व सायंकाळ तेथेंच काढली—तरी आमच्या मनाची तृप्ति झाली नाहीं. पण पुढें सूर्य पूर्ण अस्तंगत झाल्यावर काळोखांत तेथें राहणें धोक्याचें वाटल्यावरून घरीं परत फिरलों.

सनसेट पॉइंट


दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही अबूवरील जगद्‌विख्यात् जैन तीर्थं-

दिलवाडा देवळें -

करांचें प्राचीन धर्मस्थान 'दिलवाडा देवळें' पाहण्याचें ठरविलें. देवळापर्यंत जाण्यास मोटारीचा रस्ता असून थेटपर्यंत मोटार जाते.

दिलवारा अगर देलवाडा देऊळ हें जैन लोकांचें एक धार्मिक स्थान आहे, हें वर सांगितलेंच आहे. याशिवाय येथें बाराहि महिने जैनलोक यात्रेकरितां व दर्शनाकरितां येत असतात. पण याचें धार्मिक महत्त्व सोडून दिलें तरी आमच्यासारख्या परधर्मीयांना देखील हीं देवळें, बांधकाम, नक्षी-काम व प्राचीन कलेचे नमुने म्हणून प्रेक्षणीय आहेत. अत्यंत सूक्ष्म कला व नक्षीकाम या दृष्टीनें हीं देवळें अखिल हिंदुस्थानांतच नव्हे तर जगांत-देखील प्रसिद्ध आहेत. कर्नल टॉड या नांवाच्या एका आंग्ल ग्रंथकारानें असें म्हटलें आहे कीं, हीं देवळें हिंदुस्थानांतील सर्व देवळांत अप्रतिम तर आहेतच पण, ताजमहालाव्यतिरिक्त या देवळांइतक्या सुंदर, कलापूर्ण इमारती दुसऱ्या नाहींतच. या देवळांचें संपूर्ण काम संगमरवरी असून त्यावर अत्यंत सुंदर नक्षीकाम केलें आहे. हीं देवळें एकंदर पांच आहेत. त्यांपैकीं दोन फारच महत्त्वाचीं आहेत. पैकीं एक देऊळ 'आदिनाथा'चें असून तें सुमारें इ. स. १०३२ मध्यें बांधविलें आहे. या देवळांत आदिनाथाची सुंदर पितळी मूर्ति असून तिचे डोळ्यांत हिरेमाणिक बसविले आहेत. गळ्यांत देखील एक सुंदर रत्नहार आहे. मूर्तीवरील मुकुट, हिरे व माणिकांनीं जडित आहे.

दुसरें देऊळ 'वस्तुपाल आणि तेजपाल' यांनीं बांधविलेलें असून 'नेमिनाथ' या तीर्थंकराचें नांव आहे. या देवळांत एक मोठी



दिलवाडा देवळाचें अंतरंग, अबूचा पहाड

काळ्या संगमरवरी दगडाची बनविलेली सुंदर मूर्ति आहे. हीं दोन्ही देवळें संपूर्ण पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडांचीं बांधलेलीं असून त्यांवर अत्यंत सुबक कलाकुसरीचें नक्षीकाम केलेलें आहे.

या दोन्ही देवळांत मूर्तीसमोर एक मोठा भव्य मंडप असून आंतील बाजूस कोरलेलें नक्षीकाम आहे.

आदिनाथाचे देवळांत ज्याच्यामुळें हें देऊळ अस्तित्वांत आलें त्या विमलशहाचा दरवाज्याजवळच एक मोठा पुतळा आहे. एका बाजूच्या खोलींत संगमरवरी दगडावर विमलशहा व त्याच्या कुटुंबांतील मंडळी देवळाकडे जात आहेत असा देखावा कोरलेला आहे.

हीं देवळें बाहेरून इतकीं साधीं दिसतात कीं, आंतील बाजूच्या अपूर्व वैभवाची व सुंदर नक्षीकामांची मुळींच कल्पना येत नाहीं. यांशिवाय बाकीचीं तीन देवळें बच्चाशहा, शांतिनाथ व चौमुखी पारषनाथ अशीं आहेत. पूर्वींच्या दोन देवळांप्रमाणें तीं तितकीं सुंदर नाहींत. देवळांची सर्व व्यवस्था प्रमुख जैन लोकांच्या समितीकडे सोंपविली आहे. या देवळांच्या बांधकामाला सुमारें २० कोटी रुपये खर्च आला असून याशिवाय आणखी २६ लाख रुपये जमीन सारखी करण्याकरितां खर्च झाले आहेत, असें समजलें. देवळाहून परत फिरतांना आम्ही 'नन्-रॉक्' या नांवानें एक प्रसिद्ध असा मोठा दगड आहे तो पाहिला. या दगडाचा आकार एकाद्या ध्यानस्थ जोगिणीसारखा असल्यानें यास नन्-रॉक असें म्हणतात. आजचा सकाळचा सर्व वेळ देवळें पाहण्यांतच गेल्यामुळें आम्ही लागलीच घरीं परत आलों.

भोजनोत्तर विश्रांति घेऊन चहा वगैरे झाल्यावर सायंकाळीं अबूवर ‘ नखी तलाव ’ म्हणून प्रसिद्ध सरोवर आहे तें पाहण्यास गेलों. हें सरोवर फारच सुंदर असून

नखीतलाव

६०००० ऋषींच्या नखांनीं खणिलेलें असल्यामुळें यास ‘नखी सरोवर’ असें नांव पडलें, अशी आख्यायिका आहे. याची लांबी सुमारें अर्धा मैल असून रुंदी पाव मैल आहे. चहूं बाजूंनीं मोठमोठ्या टेंकड्या असून त्यांचीं टोकें आंतील बाजूस आलीं आहेत. चहूं बाजूंनीं हिरव्यागार टेंकड्यांनीं वेष्टित असें हें सरोवराचें दृश्य फारच हृदयंगम दिसतें. त्यामुळें कितीहि पाहिलें तरी मनाचें समाधान होत नाहीं. तलावाच्या सभोंवार एक पायरस्ता असल्यामुळें सायंकाळचा फेरफटका फारच सौख्यदायी असतो. रात्रीच्या शीतल चंद्रिकेंत तलावाचें रुपेरी सुंदर दृश्य पाहण्यास फारच मजेदार दिसतें. तलावांत फिरण्यास नावा भाड्यानें मिळतात. आम्हींहि एक नाव ठरवून थोडा वेळ नौकाविहार केला. या तलावास यात्रेकरी लोकांचे दृष्टीनें धार्मिक महत्त्व असून यांत स्नान करणें फार पवित्र समजतात. तलावाभोंवतालची चित्ताकर्षक सृष्टिशोभा पाहून व तिचा भरपूर आस्वाद घेऊन आम्ही परत होरमझ हॉलकडे आलों. रात्रीच्या प्रशांत समयीं चांदण्यांत दूरवर दिसणाऱ्या डोंगराचे उंच उंच पॉइंटस् व घनदाट वनवृक्ष पाहून मनास एक प्रकारचा भीतियुक्त आनंद वाटतो.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही पायींच पहाडावरून इतस्तत: लांबचलांब फिरून आलों. पायीं जाण्यानें जरी शारीरिक त्रास होतो व संवय नसल्यामुळें प्रथमत: पाय दुखूं लागले तरी वाटेंत ठिकठिकाणीं दिसणारी रम्य वनश्री पाहून आम्हांला मुळींच थकवा वाटेनासा झाला.

उलट पायींच फिरण्यांत मौज वाटूं लागली. कारण अबूसारख्या पहाडावर एखाद्या नियमित व अपेक्षित ठिकाणीं वाहनानें जाणें निरस म्हटल्यास अतिशयोक्ति नाहीं. त्यामुळें पहाडावरील निसर्गशोभा तर दिसत नाहींच, पण तेथील हवापाणी थंडगार असल्यामुळें शारीरिक श्रमाशिवाय पचनक्रिया सरळ होणें कठीण. यापुढें शक्य तर आम्हीं सर्व पायींच चालून पाहण्याचें ठरविलें होतें.

गोमूख व वसिष्ठाश्रम

भोजनोत्तर विश्रांति भरपूर घेतल्यानें आम्ही पुनः ताजेतवाने झालों होतों. तेव्हां येथून जरा दूरवर असलेलें ' गोमुख ' व ' वसिष्ठ ऋषीं'चा आश्रम पाहण्यास जावयाचें ठरवून आम्ही पायींच निघालों. आश्रमास जाण्याची वाट थोडीफार कठीणच व चढउताराची आहे. आश्रमाचा मार्ग सुरू होण्याचे आरंभीं श्रीहनुमानजीचें देवालय लागतें. हें देवालय म्हणजे आश्रमाकडे जाण्याच्या मार्गांतील पहिला टप्पा. पूर्वीं येथें देऊळ नव्हतें, असें आम्हांस कळलें. फक्त श्रीमारुतीरायाची एक सुंदर मूर्ती होती. अलिकडे श्रीमान् शेट रणछोडलाल अहमदाबादकर यांनीं हें देऊळ बांधिवलें व प्रवाशांच्या श्रमपरिहारार्थ एक प्रकारें सोय केली असें म्हणावयास हरकत नाहीं. देवालयानजीक एक जुनें कुंड व धर्मशाळा आहे. याच ठिकाणीं गोमुखाकडे जाण्याचा कठीण मार्ग सुरू होतो. हनुमानदेवळापासून आपण जरासे वर चढलों म्हणजे एक अरुंदशा रस्त्यावर येतों. टेकडीवरून खालील ' चंडेला ' तलावाचा चित्तवेधक देखावा व मोठमोठीं मैदानें पाहून मनास फारच आनंद होतो. येथून गोमुखाकडे जाण्यास सुमारें ७०० पायऱ्या उतरून खालीं यावें लागतें. या पायऱ्या उतरण्यास अवघड व अव्यवस्थित

असल्यामुळें फारच त्रास होतो, पण वाटेंत चांगली दाट आंबराई व मधुर सुवासाचीं फुलझाडें असल्यानें आम्हांस मुळींच थकवा अगर त्रास वाटला नाहीं आणि जरी थोडाफार दम लागला तरी खालीं येतांच दगडानें बांधविलेला सुंदर तडाग, पांढऱ्या शुभ्र संगमरवरी गोमुखांतून अविरत वाहणारें दुधासारखें धवल जल वगैरे पाहून, आमच्या श्रमांचा परिहार झाल्यासारखें वाटलें. याशिवाय केतकी-मोगऱ्यासारख्या सुमधुर सुवासिक फुलांच्या सुगंधानें दरवळलेलें वातावरण जणूं काय अतिथि-सत्कारार्थच उभें आहे असें वाटून श्रम झाले असले तरी तेथें पाऊल टाकतांच आम्ही श्रमाचा सर्व शारीरिक त्रास विसरून ताजेतवाने झालों. तेथील पवित्र व प्रसन्न वातावरणांत अशी जादू असली पाहिजे कीं, थोडा वेळ तरी आपण जागतिक व्यवहाराच्या गोष्टी विसरून परमेश्वरी आध्यात्मिक चिंतनांत निमग्न होऊन जातों, असें आम्हांस वाटलें.

जडवाद व आध्यात्मिक वाद यांचा झगडा सारखा मनुष्याच्या मनांत चालला असणें स्वाभाविकच आहे. पण, या गोमूख व आश्रमाभोंवतालीं इतकें नितांत रमणीय वातावरण आहे कीं, आम्हांस तरी असें वाटूं लागलें कीं, सर्व भौतिक जगापासून उत्पन्न होणाऱ्या सुखांचा त्याग करून व दिवसभर चालणाऱ्या व्यावहारिक गोष्टींपासून अलिप्त राहून एकांतिक परमार्थचिंतनाकडे आपल्या प्रवृत्ती स्वाभाविक वळूं लागतात. पण या गोष्टी क्षणिकच, यांत शंका नाहीं. कारण कांहीं झालें तरी जन्मजात संस्कार जाणें कठीण, व ते विसरणेंहि तितकेंच अस्वाभाविक म्हणून तें एक प्रकारचें स्मशानवैराग्यच खरें !

गोमुखाचे वरील बाजूस एक दगडी व्हरांडा असून तेथें कोटेश्वराचीं दोन लहान देवळें आहेत.

वसिष्ठ ऋषींचा आश्रम तडागाभिमुख आहे व येथें एक मोठा दगडी चौक असून मधोमध वसिष्ठ ऋषींचें देऊळ आहे. बाजूस श्रीराम व लक्ष्मण यांचीं देवळें आहेत. अरुंधति देवीचीहि मूर्ति येथें पाहण्यास सांपडते. देवळापुढें कामधेनु-नंदिनीची मूर्ति आहे. देवळांत एक धर्मशाळाहि आहे. एकंदरींत सर्वच वातावरण पवित्र असल्यामुळें माणसाचें मन फारच प्रसन्न होतें. आश्रम पाहून झाल्यावर आम्ही तेथील गोमुखावर थोडासा उपहार करून परत फिरलों. आमच्या निवासस्थानापासून आश्रम सुमारें आठ मैल होता व सर्व फेरफटका पायींच केल्यानें केव्हां एकदां भोजन आटोपून आम्ही जमिनीस पाठ लावतों, असें झालें. शारीरिक श्रम व मानसिक प्रसन्नता यांचें सुंदर संमिश्रण झालें असल्यामुळें त्या रात्रीसारखी सुखकर झोंप बरेच दिवसांत लागली नसावी असें वाटलें.

अनाद्रा पॉइंट

आदले दिवशीं बरेच श्रम झाल्यामुळें आम्ही सकाळीं कोठेंहि बाहेर पडलों नाहीं व सायंकाळीं देखील रिक्षामधून ‘ अनाद्रा पॉइंट ’ पाहावयास गेलों. जवळच्या अनाद्रा नांवाच्या खेडेगांवांतून वर चढून येण्यास एक उंच मार्ग असल्यामुळें याला अनाद्रा पॉइंट म्हणतात. येथूनच पहाडावर जाण्याकरितां शिरोहीकडून येणारा पूर्वींचा रस्ता होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंस दरवाज्याप्रमाणें दिसणारे मोठमोठे दगड आहेत म्हणून यास ‘ अबू गेट ’ असें म्हणतात. येथील देखावा फारच मजेचा आहे. तेथून आम्ही लागलीच घरीं परत फिरलों.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही बाहेर पडलों नाहीं. सायंकाळीं मात्र

अर्बूदा देवी

पार्यींच, जिच्यामुळें या पहाडास अबू हें नांव पडलें असावें अशी आख्यायिका ऐकिली त्या अर्बूदा देवीचे दर्शनार्थ गेलों होतों. या देवीस तेथील लोक अधर देवी या नांवानेंहि संबोधितात. अबूवरील मुख्य ग्रामदैवत म्हणून ती प्रसिद्ध आह. हें देऊळ गांवाच्या पश्चिम बाजूस एका टेकडीवर आहे. देवळाकडे जाण्यास चांगल्या दगडी पायऱ्या असून त्या अद्याप सुव्यवस्थित आहेत. देवळाकडे जाण्यास नखीसरोवराकडून येणारा आणखी एक मार्ग आहे. टेकडीच्या पायथ्याशींच देवळाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूस एक लहानशी विहीर आहे व तिचें पाणी दुग्धमिश्रित पांढरें दिसतें म्हणून तीस दुधबावडी असें नांव पडलें आहे. टेकडीवर देवळानजीक उभें राहिलें असतां वरून गांवाचा व भोंवतालच्या बंगल्यांचा सुंदर देखावा दिसतो. देवीच्या मूर्तीची स्थापना एका गुहेंत केली असून आंत जाण्यास एक लहानसें तोंड आहे. याव्यतिरिक्त उजेड येण्यास अन्य मार्ग नसल्यानें आंत नेहमीं दिव्याचा उजेड असतो. बाकी यास देऊळ म्हणतां येईल कीं नाहीं ही शंकाच आहे. पण वरील बाजूस एक देवळासारखें बांधकाम असून तें रंगविलेलें आहे, म्हणूनच यास फार तर देऊळ म्हणावें. देवळानजीक एक धर्मशाळा आहे. येथून नखीसरोवराकडे जाण्यास जमिनीचे पोटांतून खोदलेला असा गुहेप्रमाणें एक दुसरा मार्ग आहे असें समजतें.

अबू पर्वतावर प्रेक्षणीय स्थळें भरपूर, रम्य वनश्री व सृष्टिसौंदर्य मुबलक असल्यामुळें जितकें राहावें तितकें अपुरेंच वाटणार यांत शंका

नाहीं. पण वेळेच्या अभावीं या सौंदर्याचा रसास्वाद चाखणें आम्हांस शक्य नव्हतें म्हणून आम्ही दुसरे दिवशीं तेथून परत फिरण्याचें ठरविलें होतें. व त्याप्रमाणें आम्ही ठरलेल्या वेळीं खराडी स्टेशनकडे जाण्यास पहाड सोडला. स्टेशनवर आम्ही सुमारें संध्याकाळीं ६ वाजतां येऊन पोहोंचलों. 'खराडी' वरच आम्हीं आमचीं भोजनें उरकून रात्रौ १०॥ चे गाडीनें अजमीरकडे जाण्यास निघालों. आमच्या अबूच्या मुक्कामांत मि. शंकर बळवंत केळकर यांनीं आमच्याकरितां श्रम घेतले. त्यांना आम्हीं २५ रुपये देणगी म्हणून दिले.

---

दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही बाहेर पडलों नाहीं. सायंकाळीं मात्र

अर्बूदा देवी

पायींच, जिच्यामुळें या पहाडास अबू हें नांव पडलें असावें अशी आख्यायिका ऐकिली त्या अर्बूदा देवीचे दर्शनार्थ गेलों होतों. या देवीस तेथील लोक अधर देवी या नांवानेंहि संबोधितात. अबूवरील मुख्य ग्रामदैवत म्हणून ती प्रसिद्ध आह. हें देऊळ गांवाच्या पश्चिम बाजूस एका टेकडीवर आहे. देवळाकडे जाण्यास चांगल्या दगडी पायऱ्या असून त्या अद्याप सुव्यवस्थित आहेत. देवळाकडे जाण्यास नखीसरोवराकडून येणारा आणखी एक मार्ग आहे. टेकडीच्या पायथ्याशींच देवळाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूस एक लहानशी विहीर आहे व तिचें पाणी दुग्धमिश्रित पांढरें दिसतें म्हणून तीस दुधबावडी असें नांव पडलें आहे. टेकडीवर देवळानजीक उभें राहिलें असतां वरून गांवाचा व भोंवतालच्या बंगल्यांचा सुंदर देखावा दिसतो. देवीच्या मूर्तीची स्थापना एका गुहेंत केली असून आंत जाण्यास एक लहानसें तोंड आहे. याव्यतिरिक्त उजेड येण्यास अन्य मार्ग नसल्यानें आंत नेहमीं दिव्याचा उजेड असतो. बाकी यास देऊळ म्हणतां येईल कीं नाहीं ही शंकाच आहे. पण वरील बाजूस एक देवळासारखें बांधकाम असून तें रंगविलेलें आहे, म्हणूनच यास फार तर देऊळ म्हणावें. देवळानजीक एक धर्मशाळा आहे. येथून नखीसरोवराकडे जाण्यास जमिनीचे पोटांतून खोदलेला असा गुहेप्रमाणें एक दुसरा मार्ग आहे असें समजतें.

अबू पर्वतावर प्रेक्षणीय स्थळें भरपूर, रम्य वनश्री व सृष्टिसौंदर्य मुबलक असल्यामुळें जितकें राहावें तितकें अपुरेंच वाटणार यांत शंका

नाहीं. पण वेळेच्या अभावीं या सौंदर्याचा रसास्वाद चाखणें आम्हांस शक्य नव्हतें म्हणून आम्ही दुसरे दिवशीं तेथून परत फिरण्याचें ठरविलें होतें. व त्याप्रमाणें आम्ही ठरलेल्या वेळीं खराडी स्टेशनकडे जाण्यास पहाड सोडला. स्टेशनवर आम्ही सुमारें संध्याकाळीं ६ वाजतां येऊन पोहोंचलों. 'खराडी' वरच आम्हीं आमचीं भोजनें उरकून रात्रौ १०॥ चे गाडीनें अजमीरकडे जाण्यास निघालों. आमच्या अबूच्या मुक्कामांत मि. शंकर बळवंत केळकर यांनीं आमच्याकरितां श्रम घेतले. त्यांना आम्हीं २५ रुपये देणगी म्हणून दिले.

---

# अजमीर

बुधवार ता. १० मार्च १९०९ रोजीं रात्रौ आम्ही अजमीरास जाण्याकरितां खराडी (अबूरोड) स्टेशन सोडलें तों दुसरे दिवशीं सकाळीं ७॥ चे सुमारास अजमीरास पोहोंचलों. स्टेशनवर आम्हांस उतरून घेण्याकरितां बरेच लोक आले होते. अबूवरील रा. केळकर यांचे श्वशुर रा. रघुनाथ भिकाजी फाटक, गणपतराव खांडेकर व पुणें हायस्कूलमध्यें इंग्रजी चवथीपासून मॅट्रिकपर्यंत आमचे सहाध्यायी असलेले प्रो. गोडबोले वगैरे मंडळी आली होती. आमच्या राहण्याची व्यवस्था रा. खांडेकर यांचेकडे झाली होती.

घरीं आल्यावर आम्हीं मुखमार्जन, स्नान वगैरे कार्यक्रम उरकून घेऊन येथील प्रेक्षणीय स्थळांची चौकशी केली. साधारण मानानें अजमीर पाहण्यासाठीं ३।४ दिवस काढावे लागतील, असें ठरलें. नंतर आमचे पूर्वीच्या ठराविक कार्यक्रमाप्रमाणें शहरांतून एकवार फेरफटका करून यावयाच्या उद्देशानें बाहेर पडलों.

बाहेर फिरतांना आमची जी कल्पना झाली तिजवरून असें वाटलें कीं, अजमीर हें फार प्राचीन काळचें शहर असून चहूं बाजूंनीं वेष्टित अशा टेकड्यांच्या दरींत तें वसलें आहे. शहर जुनाट असून लहान व अरुंद वळणें घेतलेले बरेचसे रस्ते व बोळ त्यांत आहेत. पण या गलिच्छ रस्त्यांतच सुंदर व प्राचीन घरें दृश्यमान होत होतीं. उत्तम नक्षीकाम केलेले खांब व त्यांवरील गच्चीवजा गॅलरी असलेलीं घरें खरोखर आकर्षक दिसतात.

शहराच्या बाहेरील पश्चिम बाजूस कृत्रिम पण अत्यंत विस्तीर्ण व सुंदर ' अनासागर ' तलाव असल्यामुळें शहराच्या शोभेंत फारच भर पडली आहे. तलावाचे कांठीं बांधलेले पांढरे शुभ्र संगमरवरी दगडाचे घाट, व त्यांचीं प्रतिबिंबें पडल्यामुळें चकाकणारें स्वच्छ नीळसर पाणी, जलपृष्ठावर स्वच्छंदपणें फिरणारे पक्षी, तलावापलीकडे दिसणाऱ्या उत्तुंग टेंकड्या, तलावाच्या कांठावरील हिरवींगार व चटकदार उपवनें, ह्यांमुळें तलावाच्या कृत्रिम सौंदर्यांत अधिकच रमणीयता आलेली आहे. येथील प्रभातसमयींचा देखावा फारच बहारीचा व मनोहर वाटतो.

अजमीर हें धार्मिकदृष्ट्या देखील महत्त्वाचें आहे. कारण येथें बरेचसे जैन लोक यात्रेकरितां येतात. याशिवाय हिंदुमुसलमान या उभयतां जातींनीं पूज्य मानिलेल्या एका मुसलमान चिस्ती साधूची कबर अद्याप येथें अस्तित्वांत आहे. सार्वजनिक बाग, संस्थानिकांकरितां मेयो कॉलेज वगैरे येथील ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. एक चक्कर मारून आम्ही घरीं परत येऊन भोजन वगैरेच्या उद्योगास लागलों.


दोनप्रहरीं भोजनोत्तर घेतलेल्या झोंपेमुळें आम्ही चांगले ताजेतवाने झालों व पायींपायींच अनासागर पाहण्याकरितां बाहेर पडलों. अनासागर तलाव आपल्याकडील अतिसुंदर तलावांपैकीं एक आहे. हा अनाजी नांवाच्या राजानें इ.स. ११३५ते ११४५ चे दरम्यान बांधविला असावा, असें आम्हांस कळलें. दोन टेकड्यांना जोडणारा एक भरभक्कम बंधारा बांधून पाणी सांठविण्याची योजना येथें केली आहे. भोंवतालीं 'नागपहाड' या नांवाची एक टेकडी असल्यामुळें व सभोंवार संगमरवरी घाट बांधलेला असल्यामुळें याच्या सौंदर्यांत भर पडली आहे. अनासागर पाहून आज आम्हांला जवळ जवळ २५ वर्षें झालीं तरी देखील त्या हृदयंगम देखाव्याची आठवण आमच्या स्मृतींत ताजी असल्यासारखी वाटते. इतकें मनोवेधक दृश्य आम्हीं क्वचितच पाहिलें होतें.

अनासागर तलाव

अनासागराच्या कांठीं संगमरवरी घाट व बगीचे असून एका उंचवट्यावर रेसिडेंट साहेब यांचा बंगला आहे. जहांगीर बादशहानें सौंदर्यनिरीक्षणार्थ व हवा खाण्यासाठीं ठिकठिकाणीं तलावाचे कांठीं संगमरवरी बारेदऱ्या अगर महाल बांधविल्यामुळें या तलावास विशेषच शोभा आलेली आहे. वरील घाट व बारेदऱ्या बादशहानें इ. स. १६३७ मध्यें बांधविल्या असें समजतें. अनासागर तलावावर थोडा वेळ फिरून आम्ही घरीं परत आलों. रात्रौ प्रो. गोडबोले आम्हांस भेटावयास आले होते.

दुसरे दिवशीं आम्हीं अजमीरपासून सुमारें ७ मैल लांब असलेलें 'पुष्करतीर्थ' पाहावयास जाण्याचें ठरविलें होतें. त्याप्रमाणें सकाळीं ८ वाजतां तिकडे जाण्यास निघालों. पुष्करला जाण्यास जरी सडक झाली आहे तरी ती

पुष्करतीर्थ



अनासागर तलाव, अजमीर

[ पान ४६

५०२

संध्याकाळीं परत अजमीरास आल्यावर तेथील रा. रघुनाथ भिमाजी पाठक यांच्या निमंत्रणावरून त्यांचे घरीं भोजनास गेलों.

मेयो कॉलेज

दुसरे दिवशीं सुमारें ११ वाजतां आम्ही तेथील राजकुमारांचे शिक्षणार्थ असलेलें मेयो कॉलेज पाहावयास गेलों. कॉलेजची इमारत व राजकुमारांच्या राहण्याच्या इमारती, त्यांच्या इभ्रतीस साजेलशाच होत्या. त्या वेळीं मि. वॉडिंग्टन् या नांवाचे गृहस्थ मुख्याध्यापक होते. त्यांनीं आम्हांस सर्व कॉलेज व वर्ग हिंडून दाखविले. कॉलेजचें शिक्षण म्हणजे इतर हायस्कुलांमध्यें मॅट्रिकपर्यंत ज्या धर्तीवर शिक्षण दिलें जातें त्याच धर्तीवर येथील अभ्यासक्रमाची योजना आहे. त्यानंतर तीन वर्षांचा एक डिप्लोमा कोर्स आहे तो जवळजवळ आपल्या इकडील इंटरमीजिएट कोर्सप्रमाणेंच आहे. कॉलेजभोंवतालीं राजकुमार व त्यांचा परिवार राहणेकरितां निरनिराळे बंगले बांधण्यांत आले आहेत. कॉलेज पाहून झाल्यावर आम्ही घरीं परत आलों व नंतर भोजन वगैरे आटपून थोडीशी विश्रांति घेतली.

ख्वाजापीर अगर साधु चिस्ती याची कबर

संध्याकाळीं आम्ही तेथील मुसलमान साधु चिस्ती याची कबर पाहण्यास गेलों. यास 'ख्वाजापीर' असेंहि म्हणतात. हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या पवित्र धर्मस्थानांपैकीं हें एक स्थान असून अत्यंत प्रसिद्ध आहे. मुसलमान लोक या कबरीस मक्केप्रमाणें मान देतात. पूर्वीं येथें कांहींहि नव्हतें, पण इ. स. १४६४ सालीं ज्या ठिकाणीं या साधूस पुरलें त्या ठिकाणीं सुलतान महमूद खिलजीचा मुलगा घियासुद्दीन यानें एक पक्की कबर बांधली. पुढें इ. स. १५०० सालीं अकबर बादशहानें

तेथेंच एक मशीद बांधवून बादशहा दरसाल खैरात वांटण्यास येऊं लागला. कबरीवर एक भव्य घुमट असून जवळच पांढ्या संगमरवरी दगडांची मशीद व नगारखाना आहे. तो शहाजहान बादशहानें बांधविला आहे. एकंदरींत शिल्पकलेच्या दृष्टीनें ही इमारत फारच प्रेक्षणीय आहे.

अढाई दिनका झोंपडा

कबर पाहिल्यानंतर तेथें नजीकच असलेल्या 'अढाई दिनका झोंपडा' या नांवानें संबोधित असलेल्या मंदिराकडे वळलों. प्राचीन काळीं हें जैन लोकांनीं बांधलेलें देऊळ असून त्यांचें धर्मस्थान होतें. पण यानंतर मुसलमानी सत्ता झाल्यावर याचें मशिदींत रूपांतर झालें. हें अजमीरांतील प्रसिद्ध व प्राचीन इमारतींपैकीं असून ऐतिहासिक व बांधकामाच्या दृष्टीनेंहि फारच प्रसिद्ध आहे. सध्यां असलेलें मशिदीचें रूपांतर पूर्वींचें देऊळ पाडून अडीच दिवसांत झालें म्हणून यास वरील नांव दिलें गेलें, असें कोणी म्हणतात. पण ह्यांत सत्याचा अंश असावा, असें वाटत नाहीं. या इमारतीमधील नक्षीकाम, सुबक खोदीव काम व सक्ष्म शिल्पकलेचे मासले फारच सुंदर असून चित्तवेधक वाटतात व आपल्याकडील शिल्पशास्त्राच्या प्रगतीबद्दल सानंद अभिमान वाटल्यावांचून राहत नाहीं. या इमारतीच्या एकंदर दृश्यावरून ही पूर्वी पाठशाळा असावी, असें वाटतें. कारण त्याच धर्तीवर सर्व योजना झाली आहे. मुसलमानी सत्ता अमलांत येण्यापूर्वी म्हणजे या इमारतीचें मशिदींत रूपांतर होण्यापूर्वीं म्हणजे सुमारें ८०० वर्षांपूर्वी ही इमारत बांधिली असावी, असा अंदाज आहे.

यानंतर आम्ही राहत असलेल्या घराच्या मालकाच्या मूळचंद नेमिचंद नांवाच्या पूर्वजांनीं बांधलेलें एक जैन मंदिर पाहिलें. त्या मंदिराचें

नक्षीकाम फारच अपूर्व वाटलें. तेथें असलेलीं घोड्यांचीं सुंदर चित्रें, कैलासपर्वताचा अद्भुत रम्य देखावा, गोकुळ, अस्तनापूर व आकाशस्थ तार्‍यांचीं खोदून कोरलेलीं चित्रें पाहून आम्ही तर थक्कच झालों. अशा प्रकारची इमारत व सर्वांगसुंदर दृश्यें आम्हीं पूर्वीं कधींच पाहिलीं नव्हतीं. हें सर्व पाहून झाल्यावर आम्ही परत घरीं आलों व रा. रा. गणपतराव खांडेकर यांचेकडे भोजनास गेलों.

उदईक सकाळीं लवकरच आम्हीं अजमीराहून निघण्याचा विचार केला होता. अजमीर शहराच्या रचनेंत व आमच्या इकडील आम्हांस परिचित असलेल्या साताऱ्याच्या रचनेंत बरेंच साम्य आहे, असें वाटतें. कारण साताऱ्याप्रमाणेंच अजमीरास चहूं बाजूंनीं डोंगर असून ज्याप्रमाणें साताऱ्यास ‘ अजिमतारा ’ किल्ला आहे त्याचप्रमाणें अजमीरास देखील ‘ तारागड ’ नांवाचा एक किल्ला आहे.

साताऱ्याप्रमाणेंच येथील हवा उन्हाळ्यांत डोंगर तापल्यामुळें थोडीशी उष्ण भासली तरी समशीतोष्णच आहे. अजमीरास ठिकठिकाणीं तलाव असल्यानें व डोंगरावर बरीच वनश्री असल्यामुळें शहराच्या शोभेंत भर पडली आहे. पावसाळ्यांत चारी बाजूंस हिरवळयुक्त डोंगर व सर्व तलाव तुडुंब भरलेले असतात, त्या वेळीं येथील शोभा फारच अवर्णनीय असते. शिवाय त्या वेळीं तेथील चमेलीला बहर येऊन सर्व वातावरणास चमेलीच्या सुगंधानें फारच प्रसन्नता येते. पण आम्हांस याचा आस्वाद घेतां येणें शक्य नसल्यामुळें नुसत्या वर्णनावरच तहान भागवून घ्यावी लागली. अजमीरचा आमचा मुक्काम बराच आनंदांत गेला.

---

स्था. क्र. ५७२

# जयपूर

दुसरे दिवशीं सकाळीं म्हणजे रविवार ता. १४ मार्च १९०९ रोजीं ७॥ वाजतां आम्हीं जयपूरकडे जाण्यास अजमीर सोडलें. स्टेशनवर आम्हांस निरोप देण्याकरितां बरीच मंडळी आली होती. जयपुरास आम्ही सुमारें १२ वाजतां पोंचलों. तेथें आम्हीं मुनसी धन्नालाल फौजदार यांचे घरीं उतरण्याचें ठरविलें होतें, त्याप्रमाणें तिकडे गेलों.

येथें आल्यावर आम्हांस असें समजलें कीं, येथील रेसिडेंट यांच्या परवानगीशिवाय कांहीं स्थळें पाहण्यास मिळत नाहींत. आम्हीं निघण्यापूर्वी पुण्याचे कलेक्टर व भोरचे पो. एजंट यांना कळवावयास पाहिजे होतें, म्हणजे परभारेंच परवानगी मिळण्याची व्यवस्था झाली असती. ती एक चूकच झाली, असें आम्हांस वाटलें. पण 'पश्चात् बुद्धि!' आतां त्याचा काय उपयोग?

ज्यांच्या घरीं आम्ही उतरलों होतों ते धन्नालाल फौजदार त्या वेळीं हयात नव्हते. त्यांना पूर्णचंद्र व नवीनचंद्र असे दोन मुलगे होते.


आम्ही घरीं आल्यावर भोजन वगैरे आटोपलें व वामकुक्षीची आराधना करून नंतर नेहमींप्रमाणें एकदां गांवांतून चक्कर मारून यावें, असें ठरवून बाहेर पडलों. त्यामुळें आम्हांस सर्व शहराची साकल्यानें कल्पना आली व जातां जातां तेथील माहिती मिळून पुढील कार्यक्रम व्यवस्थितपणें आंखतां आला.

जयपूर म्हटलें कीं, लागलीच आपल्याकडील प्राचीन भौगोलिक ज्ञानाची कल्पना येते. जयपूर हें भूगोलज्ञांचें शहर म्हणून प्रसिद्ध आहे. कारण महाराज सवाई जयसिंग ( दुसरे ) हे फार विख्यात भूगोलज्ञ होते व त्यांनीं येथें त्या शास्त्राचे संशोधनार्थ अखिल हिंदुस्थानांतील प्रसिद्ध वेधशाळा बांधविल्या आहेत.

जयपूर शहराची रचना फारच सुंदर झालेली आहे. जयपूरचें जर कांहीं विशेष असेल तर तें हेंच कीं, अगदीं रेखीव व रुंद सरळ रस्ते, त्याचप्रमाणें शहराची एकजात सारखी बांधणी. महाराजांच्या भूगोल-विषयक व स्थापत्यासंबंधीं ज्ञानाची या ठिकाणीं आपणास पूर्ण कल्पना येते.

मुख्य शहर पूर्वीं अस्तित्वांत असलेल्या पण आतां कालवशात् नि:शेष झालेल्या तलावाच्या भूमीवर वसलेलें आहे. जयपूरच्या भोंवतालीं चांगले उंच डोंगर असून अजमीरप्रमाणेंच एका बाजूस भरभक्कम असा ‘ नहरगड ’ नांवाचा किल्ला आहे. उत्तरेच्या बाजूस पूर्वीची राजधानी ‘अम्बर’ ही असून तिकडे जाण्यास डोंगरांतून रस्ता आहे.

आम्ही सायंकाळीं बाहेर पडल्यामुळें शहरांतून जात असतांना व्यापाराची बरीच घडामोड चाललेली दिसून आली. कारण ते



अंबर येथील आरसेमहालाचे अंतरंग, जयपूर

[ पान ५३

रुंद रुंद रस्ते सर्व जाती व सर्व दर्जांचे लोक यांनीं नुसते फुलून गेलेले दिसले.

महाराज सवाई जयसिंग हे स्वत: हिंदुधर्मीय वैष्णव पंथाचे असल्या-मुळें येथें हिंदुधर्माचें बरेंच प्राबल्य आहे. मुख्य वस्ती हिंदु व त्या-खालोखाल जैन व मुसलमानांची आहे.

जयपूर येथें शिल्पकलेच्या दृष्टीनें महाराजांचे नवे व जुने राजवाडे, वेधशाळा, लायब्ररी वगैरे पुष्कळ सुंदर इमारती प्रेक्षणीय आहेत, असें आम्हांस कळलें. तेव्हां आम्हीं येथें २।४ दिवस राहून व रेसिडेंट यांची परवानगी काढून दुसरे दिवशीं पाहण्याचें ठरवून घरीं परत फिरलों.

महाराजांचा राजवाडा व इतर कांहीं इमारती पाहण्यास परवानगी काढावी लागते. ती काढण्यापूर्वी रामनिवास सार्वजनिक बाग व आल्बर्ट म्यूझियम आज पाहण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें सकाळीं आम्ही तिकडे गेलों.

सार्वजनिक बाग

या बागेचें काम महाराज सवाई रामसिंग यांनीं दुष्काळनिवारणार्थ म्हणून इ. स. १८६८ सालीं प्रथम सुरू केलें व त्याप्रीत्यर्थ यास 'रामनिवास उपवन' असें म्हणतात. आतां हा बाग सार्वजनिक उपयोगाकरितां असून हजारों लोकांचें क्रीडास्थान झालेलें आहे. या उपवनाची बांधणी फारच सुंदर असून शहराच्या दक्षिणेस एका विस्तृत जागीं याची योजना केली आहे. उपवनामध्यें एक प्रशस्त जिमखाना, वन्यपशुपक्षी-संग्रहालय व पुष्कळ खेळण्याच्या जागा आहेत. त्यामुळें शहरांतील लोकांचें हें सायंकालीन करमणुकीचें साधनच झालें आहे. सर्व बाग हिंडून फिरून झाल्यावर आम्ही आल्बर्ट अजबखान्याकडे वळलों.

हा अजबखाना जयपूर शहरांतील खरोखरच अभिमानास्पद स्थान

आल्बर्ट म्यूझियम

आहे. बादशहा सातवे एडवर्ड यांनीं युवराज या नात्यानें जयपूर संस्थानास भेट दिली होती व त्या-प्रीत्यर्थ सवाई रामसिंग यांचे कारकीर्दींत या अजबखान्याचें काम सुरू झालें व त्यांच्याच हस्तें याची कोनशिला बसविण्याचा समारंभ झाला. या अजबखान्याचें बांधकाम सवाई रामसिंग महाराजांनंतरचे महाराज यांच्या कारकीर्दींत पूर्ण होऊन १८८७ सालीं उघडण्याचा समारंभ झाला. याची बांधणी इंडो-सारसेनिक पद्धतीवर आहे व त्या काळीं जयपुरास विद्यमान असलेले इंजिनियर सर स्विंटन जेकब यांनीं त्या वेळच्या पद्धतीस अनुसरून केली आहे.

इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील विस्तीर्ण बाग पाश्चात्य पद्धती-वर कारंजीं व रंगीबेरंगी फुलझाडांनीं सुशोभित केलेली दिसून आली. इमारतीचें बाहेरील बांधकाम दगडी असून कलाकुसरीनें भरलेलें आहे. प्राचीन कलाकुसरीचे नमुनेदार मासले प्रेक्षणीय असून भिंतींचे कांहीं भाग गुळगुळीत विटांचे आहेत.

इमारतीच्या समोरील बाजूस दगडी भव्य कमानी व त्यांवरील खोदलेलें नक्षीकाम यांमुळें प्रथमच आमच्या मनावर अनुकूल परिणाम होऊन बाह्यांगाप्रमाणें आंतील दालनें अधिकच प्रेक्षणीय असलीं पाहिजेत असें वाटूं लागलें.

या अजबखान्यांत औद्योगिक, ऐतिहासिक, शैक्षणिक, अर्थशास्त्रा-संबंधीं असे चार विभाग पाडून त्याप्रमाणें मांडणी केलेली आहे.

म्यूझियमचे आंत शिरतांच पहिल्या खोलींत निरनिराळ्या धातूंचे कलाकुसरीचे नमुने दृष्टीस पडतात. त्यांत विशेषत: शस्त्रास्त्रें व चिलखतें यांचाच भरणा आहे. प्राचीन काळीं यांना रजपूत लोक फारच पवित्र समजत असल्यामुळें यांवरील नक्षीकाम अप्रतिम व भरपूर असें झालेलें आहे.

दुसऱ्या विभागांत राजपुतान्यांतील निरनिराळीं शिरस्त्राणें ठेविलीं आहेत. रजपुतांचीं अनेक प्रकारचीं पागोटींहि येथें पाहावयास मिळतात.

मधील विभागांत जवाहीरखाना असून मूल्यवान् रत्नें वगैरे ठेविलीं आहेत. जगांतील अत्यंत मूल्यवान् रत्नें निर्माण करण्याबद्दल जयपूर प्रसिद्ध आहेच.

यानंतर दुसऱ्या भागांत सुंदर नक्षीकाम केलेलीं निळ्या जांभळ्या रंगीबेरंगी चित्रांनीं शृंगारलेलीं चायना पद्धतीचीं मातीचीं भांडीं मांडून ठेविलीं होतीं. याच ठिकाणीं अजबखान्यांतील अत्युत्कृष्ट व अलौकिक वस्तु म्हणजे महाराजांच्या आर्ट्स्कूलमध्यें तयार केलेलें चिलखत ठेविलें आहे. हें सुवर्ण, चांदी, ब्रांझ व पितळ या धातूंचें ओतविलें असून याचे एकंदर अकरा भाग आहेत व सर्वच काम फार चित्ताकर्षक व मनोवेधक झालेलें आहे. या अकरा भागांची कल्पना महाभारतामधील अश्वमेधयज्ञावरून घेतलेली आहे.

या अजबखान्याचें वैशिष्ट्य आम्हांस एकच वाटलें व तें हें कीं, कितीहि वेळ एकच वस्तु पाहिली तरी पुन्हां पाहावीशी वाटते, व आम्ही पुन: नजर टाकूं लागतांच तीसंबंधीं नवीन नवीन कल्पना येऊन प्राचीन कलेच्या प्रगतीसंबंधीं आमचा आदर वाढतच गेला.

म्यूझियम पाहून झाल्यावर आम्ही लागलींच घरीं परत फिरलों व भोजनोत्तर, तेथील रेसिडेंटसाहेब यांना भेटण्यास जावयाचें ठरविलें होतें. त्याप्रमाणें, सुमारें तीन वाजतां रेसिडेंट कर्नल सी. हर्बर्ट् यांना भेटावयास गेलों, त्यामुळें आम्हांस राजवाडा वगैरे पाहण्याची परवानगी लागलींच मिळाली.

परवानगी मिळतांच आम्ही त्याच दिवशीं सायंकाळीं राजवाडा, दिवाणीआम, जंतरमंतर ऊर्फ वेधशाळा पाहण्याचें ठरवून तिकडे गेलों. प्रथम राजवाडा पाहिला. जयपूर शहराचा जवळ जवळ एक सप्तमांश भाग राजवाड्यानेंच व्यापून टाकलेला आहे. ह्या राजवाड्यास 'चंद्रमहाल' असें म्हणतात व जयपूर शहराच्या अगदीं बरोबर मध्यभागीं हा बांधलेला आहे. राजवाड्याभोंवतालीं असलेली भिंत सवाई जयसिंह यांनीं बांधविली आहे. पण आंतील भाग तितका जुना नसून अलिकडील काळांतच बांधलेला आहे.

राजवाडा

राजवाड्याचें मुख्य द्वार पूर्वाभिमुख असून तें क्वचितच उघडतात. फक्त संस्थानी समारंभांच्या वेळीं तें उघडें असतें. त्यास जाण्याकरितां सात कमानी असून या कमानींमधून सर्व लवाजमा राजवाड्यांत शिरतो व परत फिरतो. या सात कमानींतून जाणें अत्यंत शुभ समजलें जातें. त्यांचीं नांवें अनुक्रमें:—

१ बंदर वाल–का–दरवाजा अगर कपार कोटका. २ दुंदल–कि–पोळ अगर नगारखाने की दरवाजा. ३ उदय पोळ. यानंतर सर्व लवाजमा व माणसें पायीं चालतात, असा प्रघात पडलेला आहे. बाकीच्या

चार कमानींचीं नांवें अनुक्रमें विजयपोळ, जयपोळ, गणेशपोळ व अंबापोळ अशीं आहेत. हें झालें मुख्य द्वार. दुसऱ्या एका द्वारानें राजवाड्यांतील आंतील भागांत गेलें म्हणजे आपण झनानखाना, पागा, मुदपाकखाना आणि कृष्णानंदजीचें देऊळ असलेल्या भागांत येतों. याच्याच उजव्या बाजूस वेधशाळा आहे.

राजवाड्यांत जाण्यास तिसरा एक दरवाजा आहे. त्याचें नांव पूरभय्याकी देवडी. येथून वाहनें जाण्यास बंदी आहे. या दरवाजानें आंत शिरतांच आपण एका पताकांनीं सुशोभित केलेल्या प्रांगणांत जातों. हा दरवाजा देखील संस्थानच्या विशिष्ट समारंभप्रसंगीं उघडतात.

या प्रांगणांत एक सुंदर दुमजली इमारत असून तिच्या प्रवेशद्वारास पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडांची कमान आहे. तीवरील नक्षीकाम फारच सुबक असून तीस कुसरीचीं कामें केलेले ब्रॉंझचे मोठे दरवाजे बसविलेले आहेत. इमारतीच्या उजव्या व डाव्या बाजूंस बर्फवत् संगमरवरी दगडांचे कट्टे असून त्यांवर निरनिराळ्या रंगांचा मुलामा दिलेला दिसतो. मधून मधून ॲगेट, कॉर्नेलियन व जेड्सारख्या रत्नवजा मध्यम प्रतीचे तुकडे बसवून सुबक वेलपत्तीचें नक्षीकाम केलेलें नजरेस पडतें. राजवाड्याचा हा भाग फारच प्रेक्षणीय असून चित्ताकर्षक झालेला आहे.

यानंतर पूर्वेकडील बाजूस एक प्रशस्त पटांगण असून त्याचीं प्रवेशद्वारेंहि ब्रॉंझ धातूचीं बनविलेलीं आहेत. या पटांगणांत एक उंच पिवडीप्रमाणें पीतवर्ण असलेल्या रंगाचा मनोरा असून त्यावर घड्याळ बसविण्याची योजना केलेली आहे. येथेंच 'दिवाणी-आम' नांवाचें सभागृह आहे. दिवाणी-आममध्यें जाण्यास ५।६ पायऱ्या असलेला सुंदर संगम-

रवरी दगडाचा चौथरा आहे व आंतील भाग कलाकुसरीच्या कामानें व इतर शोभिवंत अलंकारिक वस्तूंनीं श्रृंगारलेला असल्यामुळें सर्वच देखावा अत्यंत रमणीय आहे. या सभागृहाचे आंतील बाजूस उठावदार अशा कमानी असून त्यांवर रंगीत नक्षीकाम केलेलें आहे. छताचें काम फारच सुबक असून मधोमध लोलकाचें उत्कृष्ट असें एक झुंबर लावलेलें आहे. हें महाराजांच्या सिंहासनाचे वरील बाजूंस असल्यामुळें याचा छत्रीप्रमाणेंच उपयोग झालेला आहे. सभागृहामध्यें राजस्त्रियांना बसण्याकरितां निराळी व्यवस्था करून ठेविली आहे.

यानंतर आम्हीं जयपूर शहराचें मुख्य अभिमानस्थान म्हणजे ' जंतर-मंतर ' अगर महाराजांची वेधशाळा पाहिली. या वेधशाळेची स्थापना इ. स. १७२८ ते १७३४चे दरम्यान केलेली आहे. राजवाड्याचे एका बाजूस एक मोठें पटांगण असून त्याच्या चारी बाजूंस मोठमोठ्या उंच भिंती बांधवून आंतील बाजूस ही वेधशाळा बांधविलेली आहे.

जंतर-मंतर ऊर्फ वेधशाळा

ही वेधशाळा दुसरे सवाई जयसिंह यांनीं बांधविलेली असून अखिल हिंदुस्थानांत सर्वांत मोठी व सर्व उपकरणांनीं सुसज्जित अशी आहे. भौगोलिक-शास्त्रासंबंधीं संशोधन करण्याचीं मोठमोठीं ओतविलेलीं उपकरणें पाहून आमचें मन थक्कच होऊन गेलें. तत्कालीन पौर्वात्य प्रगतीबद्दल अभिमान वाटण्यासारखीच ही एक अपूर्व गोष्ट आहे, यांत शंका नाहीं. येथील यांत्रिक सामग्री अप्रतिम असून प्रत्येक प्रकार अभिनव व प्रेक्षणीय आहे. विशेषत: सुमारें ९० फूट उंच असलेलें व 'सम्राट्' असें नामाभिधान असलेलें सूर्यवलय, ऋषीवलय वगैरे पाहून आम्हांस

ज्या वैभवशाली पुरुषानें याची स्थापना केली त्याच्या बुद्धिमत्तेबद्दल सादर कौतुक वाटलें. वेधशाळेंत 'क्रांतिवृत्त' म्हणून एक यंत्र आहे. पण तें पूर्णावस्थेंत नाहीं. त्याचप्रमाणें हिंदूंचें उगमस्थान दर्शविणारें आणि आकाशस्थ तारकांचें व ग्रहांचें तसेंच ग्रहमालिका वगैरे दृश्य पाहण्याचें एक मोटें 'यंत्रराज' नांवाचें यंत्र केलेलें आहे. पण आम्ही यांत अज्ञ असल्यानें याच्या फक्त विस्तीर्णत्वाचें व अलौकिकतेचें कौतुक करीत करीत बाहेर पडलों.

यानंतर आम्हीं महाराजांची पागा पाहिली. राजवाड्याच्या पश्चिम बाजूस सुमारें २०० यार्डांचें एक मोठें पटांगण असून रस्त्याकडील बाजूस 'इझरी लाट' नांवाचें अत्युच्च असें द्वारवजा शिखर आहे. दुसरे सवाई जयसिंग यांचे मागून गादीवर बसलेले महाराज इझरीसिंग यांनीं हें बांधविलेलें आहे. या शिखरावरून शहराचा सर्व देखावा दिसतो.

पागेंत रथास जोडण्याचीं व बसण्याचीं पुष्ट घोडीं पाहण्यांत आलीं. पागेबाहेरील बाजूस राहण्याच्या व उतरण्याच्या सोईकरितां मोठमोठ्या जागा बांधविलेल्या आहेत. हें सर्व पाहून होईपर्यंत बरीच रात्र झाल्यामुळें आम्ही घरीं परत आलों. रात्रीं आमच्या कारकुनास हें घर दाखविलेले तेथील विश्वेश्वरशास्त्री द्रवीड आम्हांस भेटावयास आले होते.


**अंबर**

दुसरे दिवशीं सकाळीं आम्हीं जयपूर संस्थानची जुनी राजधानी 'अंबर' पाहण्यास जावयाचें ठरविलें होतें व त्याप्रमाणें मुखमार्जन, चहा वगैरे उरकून सुमारें आठ वाजतां निघालों. 'अंबर' येथें जाण्यास हत्ती मिळतात व आम्ही हत्तीवरूनच तिकडे गेलों. जयपूरहून 'अंबर' सुमारें ६ मैल लांब आहे. सध्यांचे

जयपूर शहरांत व अंबरमध्यें ऐश्वर्याच्या दृष्टीनें जमीन-अस्मानचें अंतर आहे. तरी पण ही प्राचीन राजधानी आजतागायत तेथील राजवाड्यामुळें जगद्विख्यात होऊन बसली आहे. रजपूतसांप्रदायी शिल्पकलेचे सर्वोत्तम नमुने आपणांस येथें पाहावयास मिळतात. यामुळेंच अखिल हिंदुस्थानांत ग्वाल्हेरच्या किल्ल्याखालोखाल याचाच नंबर लागतो. पूर्वकालीन शास्त्राप्रमाणें अंबरीष राजाचे नांवावरून यास अंबर हें नांव पडलें असावें, अशी कित्येकांची कल्पना आहे.

अंबरचा राजवाडा टेकडीच्या पठारावर असल्यानें तो दुरून एखाद्या किल्ल्यासारखाच दिसतो. बाहेरील बाजूस दगडांची भिंत बांधविलेली असल्यामुळें राजवाड्यास किल्लेवजा स्वरूप प्राप्त झालें आहे. राजवाड्याच्या टेकडीखालील बाजूस एका दरींत जुनें अंबर शहर वसलेलें आहे. राजवाड्यापाठीमागील बाजूस टेकडीवजा उंच जागेवर ‘ जयगड ’ नांवाचा एक किल्ला असून भिंत बांधून तो राजवाड्याशीं जोडलेला आहे. जयगड किल्ला व राजवाडा यांस जाण्यायेण्याकरितां चांगल्या पायऱ्या बांधिलेल्या आहेत. जयगड किल्ल्यास ‘दिवा बुरूज’ नांवाचा एक अत्युच्च बुरूज असून त्यावर दिवा लावण्याची सोय केली आहे.

राजवाड्यांत जाण्यापूर्वी बाहेरील दरवाज्यावर आपल्याजवळील पास दाखवावा लागतो व नंतर आंत जाण्यास परवानगी मिळते. राजवाड्यांत प्रवेश करतांच आपणांस शिलादेवीचें मंदिर लागतें. हें या वाड्याचें आराध्यदैवत आहे. राजवाड्यांत अनेक भाग आहेत व ते संगतवार पाहत गेलें म्हणजे त्यांच्या प्रशस्तपणाची, कलाकौशल्याची व एकंदर भव्यपणाची कल्पना येते. आम्हांला जयपूर येथील नवीन



शहराचा सामान्य देखावा, जयपूर

[ पान ६०

वाड्यांपेक्षां येथील वाडा सौंदर्य व कलाकुसरीच्या बाबतींत कांहीं अंशीं सरस असावा असें वाटलें.

प्रथम आम्हीं दिवाणी-आम पाहिला. दिवाणी-आमचे आवारांत शिरतांच तेथील वातावरण एकदम शांत गंभीर वाटतें. बाहेरील बाजूस एक मोठें आवार असून आंत एक मोठा सुंदर हिमवत् संगमरवरी दगडाचा बांधलेला हॉल दिसतो. हा हॉल म्हणजेच दिवाणी-आम अगर पूर्वींचें सभागृह. दिवाणी-आममध्यें करड्या रंगाचे संगमरवरी मोठमोठे खांब असून त्यांवरील अत्यंत सूक्ष्म नक्षीकाम हॉलच्या सौंदर्यांत भर टाकतें. दिवाणी-आमच्या शेजारीं दिवाणी-खास नांवाचा एक हॉल असून तो त्याहीपेक्षां सुंदर आहे.

त्यानंतर तेथें ' गणेशपोळ ' म्हणून दरवाजा असलेली कमान आहे. हीवरील संगमरवरी दगडाचें कलाकुसरीचें काम फारच नमुनेदार आहे. या दरवाजांतून आंत शिरतांच डाव्या बाजूस जयमंदिर लागतें. याच्या भिंतीस व छतास सोन्याचांदीचा मुलामा देऊन ठिकठिकाणीं लहान लहान आरसे बसविल्यामुळें त्यांत शुभ्र दगडावरील कुसरीचीं प्रतिबिंबें पडल्यामुळें फारच मजा वाटते.

जयमंदिराच्या वरच्या बाजूस आम्ही जातांच आम्हांस 'जसमंदिर' या नांवाचीं तीन दालनें दृष्टीस पडतात. यांचें वैशिष्ट्य म्हणजे सर्व तक्तपोशी संगमरवरी असून तीवरील छतास चांदीचा व सोनेरी मुलामा देऊन इंग्लिश पद्धतीच्या ' सायप्रस झाडा 'सारख्या आकृती कोरलेल्या आहेत. या तीन दालनांपैकीं मधील दालन लांबच असून त्यावरून खालील सरोवराचा देखावा दिसतो. जसमंदिर म्हणजे राजस्त्रियांकरितां राखून ठेविलेलीं दालनें होत.

जसमंदिराच्या समोर पटांगणाच्या दुसऱ्या बाजूस 'सुखनिवास' ह्या नांवाचा एक भाग आहे. सुखनिवास हें महाराजांचें उन्हाळ्याकरितां बसण्याचें ठिकाण आहे व त्याप्रमाणें या दालनांत मधून योजना केलेली आहे. मधूनच एक थंडगार पाण्याचा प्रवाह काढून येथील हवा थंड करण्यांत आली आहे. दरवाजे देखील हस्तीदंत व शिंपल्याचें नक्षीकाम केलेले चंदनी लांकडाचे असल्यामुळें एकंदरींत उन्हाळ्याचा ताप निवारणार्थ उपयोगी असावेत असें वाटतें.

सुखनिवासमधील एका खोलींत अलीकडील टांग्याच्या धर्तीवर असलेली जुनी गाडी ठेवण्यांत आलेली आहे. जुन्या वाहनांचा नमुना म्हणून पाहण्यास बरी आहे.

दुसरी एक लंबाकृती खोली असून वृंदावन, बनारस, पाटणा, अयोध्या व उजैनी यांच्या ( Bird's-eye-view ) सुंदर देखाव्यांचीं चित्रें तींत काढलेलीं आहेत. ही खोली भोजनालय म्हणून उपयोगांत आणीत असावेत.

याप्रमाणें अंबर येथील राजवाड्यांत अनेक दालनांचा समावेश झाल्यामुळें राजवाड्याच्या विस्तीर्णत्वांत व शोभेंत बरीच भर पडली आहे. राजवाड्याच्या चहूं बाजूस हिरवळयुक्त डोंगर असून पायथ्याशीं एक सुंदर सरोवर आहे.

राजवाडा पाहून झाल्यानंतर त्याच्याच उत्तरेस असलेलें जैनांचें देऊळ पाहण्यास गेलों. अबूवरील दिलवाडा देवळाइतकें जरी हें सुंदर नसलें तरी त्याच धर्तीवर बांधणी असल्यामुळें यांत व अबूवरील देवळांत बरेंच साम्य आहे असें वाटतें. देवळांत जाण्यास चांगल्या पायऱ्या असून

त्या थेट दरवाज्यापर्यंत आहेत. दरवाज्यांतून आंत प्रवेश करतांच एक मोठा चौक असून चौकांतील खांबावर चारी बाजूंस चांगली बसण्याकरितां गॅलरी आहे. चौकापलीकडेच एक कलाकुसरीनें अलंकृत घुमटवजा शिखर असून त्याचे खालीं एक सुंदर कलाकुसरीनें शृंगारलेला कट्टा आहे. त्यावरील वेदीवर जैन तीर्थंकरांच्या मर्ति आहेत. त्यांचें दर्शन घेऊन आम्ही लागलींच निवासस्थानाकडे परत फिरलों.

सायंकाळीं आम्ही विशेष कोठेंच बाहेर गेलों नव्हतों. फक्त फिरावयास गेलों असतांना तेथील राम व शंकर यांचीं देवळें पाहून घेतलीं.

आम्हीं जयपुरास पाहिलेल्या इमारतींमध्यें तेथील प्रख्यात हवामहाल राजवाड्याचा उल्लेख करणें अत्यंत अवश्य आहे. हा राजवाडा जरी शहरांतच आहे तरी हवा चोहोंकडून खेळण्यासाठीं चहूं बाजूंना मुबलक जागा ठेविली आहे. समोरील भिंतींत लहानमोठ्या कमानीदार खिडक्या ठेवून चहूंकडे हवा खेळविली आहे. मुख्य बाजू फारच प्रेक्षणीय झालेली आहे. कारागिरीचा अत्यंत सुंदर नमुना म्हणून हवामहाल प्रसिद्ध आहे.

येथील राजेमहाराजे यांच्यासाठीं समारंभप्रसंगीं उपयोग करण्याकरितां तयार केलेला हत्तीचा रथहि पाहण्यासारखा आहे.

जयपूर शहराची रचना इतकी सुंदर आहे कीं, येथील अत्यंत सुंदर रुंद रस्ते व बांधकामाचें रचनाकौशल्य मनुष्याचें मन वेधून टाकतात.

जयपुरास आम्हीं आणखी दोन दिवस काढण्याचा विचार केला होता म्हणून आज येथून सुमारें पांच मैलांवर असलेलें 'गल्ता' या नांवाचें अगर गालव्य ऋषीचा आश्रम म्हणून प्रसिद्ध असलेलें स्थान पाहावयास जावयाचें ठरविलें. आम्ही सर्व

गल्ता ऊर्फ गालव्य ऋषीचा आश्रम

जण सकाळींच एक गाडी ठरवून निघालों. हा आश्रम डोंगरानजीकच असल्यामुळें गाडी पायथ्यापर्यंतच जाऊं शकते. यापुढें उंच व अव्यवस्थित असलेला चढ लागतो. पण रस्ता चांगला असल्यामुळें तसा त्रास होत नाहीं. डोंगराच्या दुसऱ्या बाजूस पायथ्याशीं हा आश्रम बांधलेला असल्यामुळें चढाव चढून व उतरून जावें लागतें. गल्ता या नांवानेंच तें स्थान प्रसिद्ध असून अत्यंत प्राचीन कालापासून अस्तित्वांत आहे असें दिसून येतें. याबद्दल पूर्वींच काय पण अद्यापिहि हिंदुलोकांची पूज्य बुद्धि आहे. प्राचीन ऋषिकालीन स्थान म्हणूनहि हें एक जयपूरकडील प्रसिद्ध ठिकाण आहे. आश्रमाच्या चहूं बाजूंनीं भिंतीचा प्राकार आहे. आश्रमाकडे जात असतां प्रथम आपणांस कदंबकुंड या नांवाचा एक तलाव व नंतर लागलींच आश्रमाचे आवारांत ' यागकुंड ' या नांवाचा एक छोटा तलाव दृष्टीस पडतो. पुढें एका अरुंदशा दगडी कमानींतून प्रवेश करतांच आपण 'गल्ता' ऊर्फ आश्रमांत जातों. आश्रमाचे दोन्ही बाजूंस अतिशय उंचच उंच कडा असल्यामुळें आपण एकाद्या बोगद्यांतच आहों असें वाटतें. या ठिकाणीं इतकी शांतता आहे कीं, वाहणाऱ्या पाण्याच्या आवाजाव्यतिरिक्त कांहींच गलबला ऐकूं येत नाहीं. एकंदरींत ठिकठिकाणीं कुंडवजा लहान लहान स्वच्छ पाण्याचे तलाव आणि शांत व गंभीर वातावरण मनुष्याचें मन फारच प्रसन्न करून टाकतात व यज्ञयाग करणाऱ्या ऋषी लोकांकरितांच हें स्थान निर्माण केलें असावें असें वाटूं लागतें. टेकडीवर एक गायमुख असून त्यांतूनच पाण्याचा प्रवाह सतत चाललेला आहे व या पाण्यानें सर्व कुंडें भरून निघतात. एकंदर सात कुंडें आहेत व पाण्याचा भरपूर पुरवठा असल्यानें हीं नेहमीं

दा. क्र. ५५२
... शाळा ... जयपूर

तुडुंब भरलेलीं असतात. आश्रमाच्या जवळच पायथ्याशीं 'गोपाळजी'चें मंदिर व जयपूरच्या महाराजांचें कुलदैवत श्रीरामाचें मंदिर अशीं दोन मंदिरें चांगलीं भव्य असून प्रेक्षणीय आहेत. आम्ही उभयतां देवतांचें दर्शन घेऊन परत फिरलों. परत जातांना दरवाज्यांतून बाहेर पडतांच एक मोठी केळांची व अंजीरांची बाग लागते. या बागेंत रामकुंड या नांवाचें एक पाण्याचें कुंड आहे. घरीं परत येण्यास आम्हांस अकरा वाजले. यानंतर आम्हीं भोजन वगैरे आटोपून दोन प्रहरीं स्कूल ऑफ आर्ट, महाराजा कॉलेज, लायब्ररी वगैरे पाहून घेण्याचें ठरविलें.

स्कूल ऑफ आर्ट

दोन प्रहरीं बाहेर पडल्यानंतर प्रत्यक्ष आम्ही 'स्कूल ऑफ आर्ट' पाहावयास गेलों. ही शाळा कै. महाराज सवाई रामसिंग यांनीं १८६६ सालीं उघडली. जयपूरचें हें कलाभवन कलात्मक शिक्षणाबद्दल प्रसिद्ध असून विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याची सोय त्यांत केलेली आहे. कांहीं विभागांत शास्त्रीय शिक्षणासंबंधीं पाठ देऊन नंतर त्यासंबंधीं प्रयोगात्मक शिक्षण देण्याकरितां स्वतंत्र प्रयोगालयें आहेत. कांहीं बाबतींत विशेषत: पॉलिशच्या पूर्णत्वासंबंधीं जयपूरची कला विख्यात आहे.

शाळेच्या आवारांत शिरतांच प्रथमच संगमरवरी दगडांची पूड करून त्यांत कांहीं द्रव्यें मिसळून तयार केलेलीं व सुंदर सुंदर चित्रें कोरलेलीं अशीं मातीचीं भांडीं दिसतात. हा विभाग जवळजवळ तेवढ्याकरितांच आहे.

पाठीमागील भागांत जातांच एकसारखा लोखंडी घणाचा आवाज ऐकूं येतो. येथें तांब्याचे व पितळाचे पत्रे तयार करून त्यांपासून त्या त्या

धातूंच्या अनेक तऱ्हेच्या वस्तु तयार केलेल्या पाहण्यास मिळतात. यांवर मिनाकाम म्हणून प्रसिद्ध असलेली रंगीत वेलबुटयांची नक्षी काढलेली असते. चांदीच्याहि वस्तु तयार करून ठेविलेल्या आहेत. तिसऱ्या ठिकाणीं पेंटिंग्ज म्हणजे अति सुंदर चित्रें काढण्याकरितां तयार केलेला भाग दिसतो. या सर्व प्रकारच्या वस्तु एका ठिकाणीं पाहावयास मिळाव्यात म्हणून दोनतीन खोल्यांतून स्वतंत्रपणें मांडून ठेविलेल्या आहेत.

यानंतर आम्ही महाराजांची लायब्ररी पाहण्यास गेलों. तेथें ठिकठिकाणीं विभाग पाडून शास्त्रीय, आध्यात्मिक, वाङ्मय वगैरे यांसंबंधीं अनेक मूल्यवान् व क्वचितच दृष्टीस पडणाऱ्या पुस्तकांचा संग्रह केलेला आहे. लायब्ररी पाहून झाल्यावर तेथील स्थानिक भूगोलज्ञासह पुनः एकवार वेधशाळा पाहून घेतली व जातां जातां महाराजा कॉलेज व गणेशमंदिर पाहून घरीं परत फिरलों. कॉलेजचा शिक्षणक्रम सर्वसाधारणतः आपल्याइकडील Intermediate च्या शिक्षणक्रमापर्यंतचाच आहे. तिकडील B. A. डिग्रीपर्यंतचें शिक्षण सर्वसाधारणतः इकडील विद्यापीठाच्या इंटरमीजिएटच्या शिक्षणक्रमाबरोबर आहे.

लायब्ररी व कॉलेज

दुसरे दिवशीं आम्ही जयपूर सोडणार असल्यामुळें एक चांगली चक्कर मारून घरीं परत आलों.

आज म्हणजे ता. १८ मार्चला रात्रीं आम्ही जयपूर सोडणार होतों. म्हणून पुनः एकवार तेथील म्यूझियम काळजीपूर्वक पाहून घेतलें व संध्याकाळीं तेथील वीरेश्वरशास्त्री यांचेकडे पानसुपारीस गेलों. तेथें अल्पोपहार व पानसुपारी झाल्यानंतर आम्ही परत आलों. वीरेश्वरशास्त्री

यांना आम्हीं २५-२६ रुपये किंमतीची शालजोडी देऊन त्यांची संभावना केली. त्यांच्याकडे गेलों असतां 'New India' या पुस्तकाचे भाषांतरकर्ते रा. गणेश नारायणजी सोमणी यांची व आमची भेट झाली.

घरीं परत आल्यावर आम्ही पूर्णचंद्र कासलीवाल यांना देणगीदाखल ५० रुपये दिले व मदतीबद्दल त्यांचे व त्यांचे कनिष्ठ बंधु रा. प्रवीणचंद्र यांचे आभार मानून निरोप घेतला.

---

# भरतपूर

आम्हीं रात्री १० वाजतां जयपूर सोडलें. आमची गाडी भरतपूर येथें बरोबर पहांटे पांच वाजतां पोहोंचली. आम्हीं येथें तारीख १९।२० मार्च असे दोन दिवस काढण्याचें ठरविलें होतें. स्टेशनवर आम्हांस घेण्यास भरतपूरचे दिवाण व रेव्हिन्यू मेंबर रा. ब. गोविंदराव खांडेकर आले होते. भोर येथील बाळकृ ठकार हा रा. ब. खांडेकर यांचे पत्नीचा मातुल होता म्हणूनच खांडेकरांची व आमची ओळख होण्याचा योग जमून आला. आमच्याकरितां त्यांनीं गाडी आणिली होती. तींतून आम्ही बंगल्यावर रवाना झालों.

भरतपूर हें संस्थानचें राजधानीचें शहर व त्या दृष्टीनें तेथील कांहीं इमारती दोन प्रहरीं पाहून घेतल्या; विशेषतः तेथील कोठी, खास राजवाडा, मोती झील नांवाचें अतिथिगृह, चारबाग, 'क्ष' किरणांची नवीन पद्धतीवर सोय केलेलें हॉस्पिटल व शिकार करण्याच्या जागा वगैरे पाहण्यासारखीं स्थळें आहेत. *Duck Shooting* बद्दल भरतपूर फारच प्रसिद्ध आहे.

भरतपूरचे दिवंगत महाराज यांचे चिरंजीव हल्लीं अज्ञान असून त्यांचें शिक्षण इंग्लंडांत चालू आहे. आम्ही इंग्लंडास गेलेवेळीं कॉंटिनेंटवर फिरत असतां पूर्वी पुण्यास कलेक्टर व भोरचे पो. एजंट असलेले मे० टयुडर ओवेनसाहेब आम्हांस स्वित्झरलंड येथें एका स्टेशनवर भेटले होते. तेच हल्लीं भरतपूरच्या राजपुत्रांचे टयुटर (शिक्षक व Guardian) म्हणून आहेत.

दुसरे दिवशीं आम्हांस रा. ब. खांडेकर यांनीं आग्रहपूर्वक भोजनाचें निमंत्रण दिलें होतें, तेव्हां त्यांचे घरीं भोजनास गेलों. त्या वेळीं कौन्सिलर पंडित गिरिधरलाल वझीर, गबीवसिंग व पागाखान्याचे कामगार मि. मुबारक अलीखान यांच्या भेटी व ओळखी झाल्या.

जेवण करून आम्ही घरीं येतों तोंच गाडीची वेळ झाली म्हणून गर्दीतच स्टेशनवर आलों.

---

# आग्रा

शनिवार ता. २० मार्च रोजीं २ वाजून २० मिनिटांनीं आग्र्यास जाण्याकरितां भरतपूर स्टेशन सोडलें. स्टेशनवर निरोप देण्याकरितां बरीच मंडळी आलेली होती. रा. ब. खांडेकर स्टेशनवर हजर होते. आम्ही आग्र्यास ४॥ वाजतां पोहोंचलों. स्टेशनवर तेथील लाला जयकिसनदास आम्हांस घेण्यास उपस्थित झाले होते व रा. ब. खांडेकर यांच्या सांगण्यावरून शेटजींच्या 'बालनिवास' बंगल्यांत आमची उतरण्याची व्यवस्था केली होती. आग्र्यास आमची राहण्याची व्यवस्था रा. ब. खांडेकर यांचेमार्फत चांगली झाली होती. लाला जयकिसनदास हे भरतपूर संस्थानच्या कोठी खास खात्याचे सुपरिंटेन्डेंट असल्यानें आमच्या सुख-सोयींकडे त्यांचें पूर्ण लक्ष होतें. आग्र्यास असल्यावेळीं भरतपूर संस्थानची घोड्याची गाडी आमचे तैनातीस दिलेली होती. त्या दिवशीं संध्याकाळीं आम्ही प्रवास करून आल्यामुळें कोठेंहि बाहेर पडलों नाहीं. लाला जयकिसनदास व त्यांचे लहान बंधु हरकिसनदास यांचे सल्ल्यानें दुसरे

दिवशींचा कार्यक्रम ठरवून विश्रांति घेण्याचें योजिलें. आग्रा येथील किल्ला व कांहीं राजवाडे वगैरे पाहण्यास आगाऊ परवानगी लागते असें कळल्यावरून त्यासंबंधीं आम्हीं सर्व व्यवस्था लालासाहेब यांचेकडे सोंपविली.

नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें एकवार सर्व शहरांतून चक्कर मारून येणें हा आमचा प्रथमचाच कार्यक्रम असे. पण आग्र्यासंबंधीं आम्हांस पूर्वीं-पासून बरीच कल्पना असल्यामुळें व आग्र्यासारख्या इतिहासप्रसिद्ध शहरासंबंधीं पुस्तकरूपानें माहिती उपलब्ध झाल्यामुळें आम्ही तो कार्य-क्रम टाळला. दुसरे दिवशीं सकाळचे कार्यक्रमांत आम्हीं तेथील किल्ला व राजवाडा पाहण्याचें आंखलें होतें. त्यासाठीं पूर्वींच लालासाहेब यांनीं आमच्याकरितां परवानगी काढून ठेविली होती.

आग्रा शहराच्या ऐतिहासिक महत्त्वासंबंधीं आम्हीं लिहिणें खरोखर धाडसाचेंच होणार आहे व या पुस्तकांत त्याचा उल्लेख अस्थानींच होणार आहे, असें वाटल्यावरून आम्हीं त्या भानगडींत न पडणेंच इष्ट. एवढें मात्र खरें कीं, मोंगल बादशहांचे कारकीर्दींत कित्येक वेळां आग्रा शहर राजधानी म्हणून मानिल्यामुळें सौंदर्यसंपन्न व कलापूर्ण इमारतींचें आग्रा हें महास्थानच आहे असें म्हटल्यास नवल नाहीं. विशेषत: अकबर बादशहा व शहाजहान बादशहा या दोन महापुरुषांनीं आग्रा शहराचें ऐतिहासिक महत्त्व वाढवून व भव्य, सुंदर इमारती बांधून आग्रा शहरास त्या काळींच नव्हे किंबहुना आज देखील हिंदुस्थानांतीलच काय पण सर्व जगांतील शहरांत अग्रस्थान मिळवून दिलें आहे, यांत शंका नाहीं.


आग्र्यासंबंधीं इतर लिहावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, आग्रा हें एक विस्तीर्ण शहर असून तेथील हवा कोणत्याहि प्रकृतीस मानवण्यासारखी आहे. यमुना नदीचें तें सुंदर व विस्तृत असें पात्र व त्याच्या दोहों बाजूंस असलेल्या सुंदर इमारती व आनंददायक बागा पाहून आमचें मन फारच उल्हसित झालें. आग्रा शहरांतील इमारतीं-सारख्या सुंदर इमारती दुसरीकडे क्वचितच पाहावयास मिळतात. औरंग-जेबापर्यंतच्या बादशहांचे कारकीर्दींत आग्रा हें राजधानीचें शहर असल्यामुळें तेथें भरपूर इमारती बांधलेल्या आढळतात. त्यामुळें आग्रा हें केवळ सुंदर इमारतींचा अमूल्य ठेवाच असावा, असें वाटतें. अकबराचे वेळींच आग्रा म्हणजे कलेचें माहेरघर बनून राहिलें.

आतां एकच गोष्ट आणि ती म्हणजे जगांतील अद्वितीय सुंदर व कलापूर्ण अशा सर्व बांधकामाचा मासलेवाईक नमुना व सर्व इमारतींमध्यें अग्रेसरत्व प्राप्त झालेला ताजमहाल. पण आग्रा व ताज-महाल यांचे अन्योन्य संबंध इतके व्यापक व निगडित आहेत कीं, आग्रा म्हणतांच ताजमहाल आपल्या मनःचक्षूपुढें नाचूं लागतो. असो !

तारीख २१ मार्च रोजीं सकाळीं आम्ही किल्ला व राजवाडा वगैरे पाहण्यास बाहेर पडलों. श्री. लालासाहेब यांनीं आमचेकरितां आगाऊ परवानगी काढून ठेविली होतीच. प्रथम आम्हीं किल्ला पाहण्याचें ठरविलें.

‘ आग्रा फोर्ट ’

अकबर बादशहानें आग्रा हेंच राजधानीचें शहर ठरविल्यानंतर वास्तव्याकरितां म्हणून हा किल्ला बांधविला असल्या-मुळें यास किल्ल्यापेक्षां भव्य व सुंदर असें राज-प्रासादाचेंच स्वरूप प्राप्त झालें आहे. ह्यास किल्लेवजा राजप्रासादच



दिल्ली दरवाजा किल्ला, आग्रा

[ पान ७२

म्हटल्यास हरकत नाहीं. किल्ला बांधण्यास सन १५६५ मध्यें सुरुवात होऊन सर्व काम पुरें होण्यास सुमारें आठ वर्षांचा अवधि लागला. एका वेळीं एक हजार मजूर एकदम काम करीत असतां सुद्धां ज्याअर्थी एवढा अवधि लागला त्याअर्थी त्या कालीं बांधकाम पूर्णपणें शास्त्रोक्त होऊन अत्यंत टिकाऊ होत असे. याला जवळ जवळ (३०,००,०००) तीस लाख रुपये खर्च आला.

पवित्र यमुना नदीच्या विस्तीर्ण तीरावर या किल्ल्याचा लाल दगड व चंद्रकोरीप्रमाणें आकार यांमुळें नदीतीराला एक प्रकारची शोभा प्राप्त झालेली आहे. एवढा मोठा किल्ला हिंदुस्थानांत तरी कोठेंहि पाहावयास मिळत नाहीं. त्याचें बांधकाम अत्यंत कसोशीनें व काळजीपूर्वक झाल्यामुळें अद्याप देखील हा सुस्थितींत दिसून येत आहे.

अकबरानंतर जहांगीर व शहाजहान बादशहा यांनीं आपआपल्या आवडीनिवडींप्रमाणें यांत सुधारणा केल्यामुळें त्या त्या कालीन व त्या त्या व्यक्तींच्या आवडींचा यावर बराच परिणाम झालेला दिसून येत आहे.

अकबराचे कारकीर्दींत या राजवाड्याचे मुख्य तीन भाग होते. तत्कालीन बांधकामांत मुख्यत: राजवैभवास साजेलशा भव्य कमानी, गॅलरी व मनोरे यांचा समावेश होत असे. पहिल्या दालनांत बादशाही मुख्य पहारा असे. दुसरें दालन म्हणजे अदालत, या ठिकाणीं राजकीय पुरुष व न्यायाधीशमंडळ असे व तिसरें दालन खास बादशाहाच्या जनानखान्यास अगर रंगमहालास राखून ठेविलेलें असे. या महालाभोंवतीं उंच भिंती असून आंतील कांहींहि दिसूं नये, अशी योजना केलेली दिसून येते. या दालनांत खाशांच्या स्त्र्यांच्या राहण्याची व्यवस्था असल्या-

मुळें येथील एकंदर थाट राजवैभवास साजेलसाच होता, हें सांगण्यास नकोच. उत्तम उत्तम गालीचे, जरतार काम केलेले पडदे व किनखापी सामान फारच अप्रतिम होतें. सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीनें बोलवयाचें झाल्यास जगांतील अत्यंत सुंदर व संपन्न वस्तूंचें तेथें एक प्रकारचें प्रदर्शनच मांडून ठेविलें होतें, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

या तीन दालनांनंतर बादशाहाच्या बागेची मांडणी केलेली होती. बागेंत तऱ्हतऱ्हेचे रंगीबेरंगी व सुवासिक फुलांचे ताटवे व मधूनमधून थंडगार पाण्याचे कृत्रिम झरे निर्माण केलेले असल्यामुळें तेथील वातावरण फारच रमणीय व आल्हादकारक झालेलें आहे.

अकबर बादशाहाचे नंतर जहांगीर व शहाजहान व त्यानंतर आतां इंग्रजी सत्ता यांमुळें त्यांत बरेच फेरबदल झालेले आहेत. आम्हीं वरील वर्णन सर्वसाधारण अकबर बादशाहाचे कारकीर्दींतलें दिलेलें आहे व सर्व पाहून तशी वस्तुस्थिति असावी असें वाटतें.

किल्ल्याचे बाहेरील बाजूस एक व आंतील बाजूस एक असे दोन तट असून त्याला मोठेमोठे बुरूज व शिखरें बांधलेलीं आहेत. एकंदरींत हा किल्ला हिंदुस्थानांतील सर्व किल्ल्यांत मोठा असावा, असें आम्हांस वाटतें.

राजप्रासादाचें प्रवेशद्वार आग्रा स्टेशनचे दक्षिण बाजूस आहे. मुख्य प्रवेशद्वार ‘ दिल्ली गेट ’ या नांवानें प्रसिद्ध आहे. यानंतर वरचे बाजूस गेलें असतां हत्तीपोळ ऊर्फ हत्ती दरवाजा लागतो. याच ठिकाणीं नौबतखाना आहे.

दिल्ली गेट

राजप्रासादाच्या आंतील बाजूस निरनिराळे भाग असून ते फारच प्रेक्षणीय आहेत. त्यांचें वर्णन आम्हीं जसें पाहिलें तसतसें येथें देतों.

हत्ती दरवाजापासून ईशान्येकडे सुमारें हजार बाराशें कदमांवर लांबून दिसेल अशी एक पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडाची उंच इमारत दिसते, तीच मोती मशीद.

मोती मशीद

या मशिदीचें वैशिष्ट्य म्हणजे हवापाण्याच्या अगदीं माऱ्याचे जागीं असून देखील अद्याप हींत कांहींच फेरबदल झालेला दिसत नाहीं. ही मशीद शहाजहान बादशहानें बांधविली. मशिदींत जाण्यास पायऱ्या असन एक भव्य दरवाजा आहे. दरवाजांतून आंत जातांच एक मोठें प्रांगण असून त्यांत सूर्याचें शंकूयंत्र व प्रक्षालनाकरितां हौद बांधविला आहे. या मशिदीस तीन पांढरे शुभ्र घुमट आहेत. मशिदीच्या दोन्ही बाजूंस संगमरवरी दगडाचेंच कोरीव काम केलेले पडदे असून आंतील बाजूस राजस्त्रियांस बसण्याकरितां व्यवस्था केलेली आहे. मशिदीची फरशी देखील संगमरवरी दगडाचीच बनविलेली असून मधूनमधून उत्तम निळ्या व पिवळ्या रंगांचे तुकडे बसवून शोभिवंत केलेली आहे. हीवर नमाज पढण्याकरितां सुमारें पावणे सहाशें लोकांची व्यवस्था केलेली आहे. मशिदींत एक वेदी असून तीवर पूर्वी सोन्याच्या सांखळीनें लोंबकळत ठेवलेला एक मोठा हिरा होता, असें समजतें.

मोती मशिदींतून बाहेर पडतांच उजव्या बाजूस गेलें म्हणजे मीना बाजार म्हणून एक भाग आहे. याचें बांधकाम लाल दगडाचें असून चोहों बाजूंनीं दुकानवजा उघड्या जागा केलेल्या दिसतात. येथें पूर्वी व्यापारी लोक राजे लोकांकरितां माल आणून विकण्यास बसत असत, असें म्हणतात. त्याचप्रमाणें अंतःपुरांतील स्त्रियांकरितां एक मीना बाजार म्हणून एक भाग आहे.

मीना बाजार


तेथें व्यापारी लोकांच्या अंत:पुरवासिनी स्त्रिया विक्रीचा व्यवहार करीत असत.

राजवाड्याच्या मोठ्या प्रांगणांत पूर्वेच्या बाजूस मधोमध ‘ दिवाणी-आम ’ या नांवाची एक इमारत आहे. ही इमारत लाल दगडांची असून तिची दक्षिणोत्तर लांबी सुमारें २०० फूट असेल. या इमारतींत सार्वजनिक भेटीगांठीं व कामधाम चालत असे. तिची रचना ३।४ फूट जोतें ठेवून तिन्ही बाजूंनीं उघडी अशी केलेली आहे. यास सारसेनिक पद्धतीवर बांधलेल्या पांढऱ्या व क्वचित् ठिकाणीं चांगला मुलामा दिलेल्या कमानींमुळें फारच शोभा आलेली आहे. याचें वरील छतकाम अगदीं सपाट असून त्यावर छानदार गच्ची आहे. आंतील बहुतेक काम पांढऱ्या संगमरवरी दगडाचें असून त्यावर सर्वसाधारण किंमतीचीं रत्नें बसवून चित्रविचित्र अशा वेलपत्त्या बनविलेल्या दिसल्या. हें सर्व अलंकारिक काम शहाजहान बादशहाचे कारकीर्दीत झालें आहे.

‘ दिवाणी-आम ’

दिवाणी-आमचे पिछाडीच्या बाजूस ‘ मच्छी-भवन ’ हें नामाभिधान असलेला एक भाग आहे. तो पाहण्याकरितां आम्हीं तिकडे वळलों. यास मच्छी-भवन म्हणण्याचें कारण असें कीं, या भागांत एक मोठा हौद असून त्यांत पूर्वीं मोठमोठे मासे सोडलेले असत. या हौदाभोंवतीं पूर्वीं चांगल्या सुंदर इमारती असाव्यात असें दिसलें; कारण त्यांचे जुने अवशिष्ट भाग अद्याप तेथें दिसतात. याचें आंगण लाल दगडाचें असून तेथून राजसिंहासनाकडे जाण्यास रस्ता असावा असें दिसलें. पण सध्यां तेथील दगड वगैरे कांहीं दिसत नसून गवत उगवलें आहे.

‘ मच्छी-भवन ’



राजवाड्यांतील स्नानखाना, आग्रा

[ पान ७६

मच्छी-भवन पाहून झाल्यावर आम्हीं ‘ चितोड दरवाजा ’ पाहिला.

‘ चितोर गेट ’

पूर्वी येथून मच्छी-भवनांत जाण्यास रस्ता होता. पण सध्यां तो क्वचितच उघडतात. हे दरवाजे कलाकुसरीचें काम केलेल्या मोठ्या धातूंचे आहेत. अकबर बादशहानें १५६८ मध्यें रजपुतांचा पाडाव करून आग्र्यास आल्यावेळीं हीं विजयचिन्हें म्हणून आणलीं आहेत, असें तेथील मार्गदर्शकानें आम्हांस सांगितलें.

यानंतर ‘ नगिना-मशीद ’ म्हणून एक इमारत आहे तीकडे गेलों.

‘ नगिना-मशीद ’

अंत:पुरांतील स्त्रियांकरितां ही मशीद बांधविण्यांत आली होती. मशीद पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडांची आहे व ती शाहाजहानानें बांधविली. पुढें याच मशिदींत **अवरंगजेबानें शहाजहानास कैद करून ठेविलें होतें.** या ठिकाणीं खिडकींतून बादशहा ताजमहालाकडे पाहत बसत असे. आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस प्रिय पत्नीच्या समाधिदर्शनाचें सुख अनुभवित त्यानें घालविले.

‘ हमामशाही ’ म्हणजे बादशहाचें स्नानगृह. पूर्वी या ठिकाणीं

‘ हमामशाही ’

संगमरवरी दगडाचे मोठे हौद बांधून त्यांतून तांब्याच्या नळांतून बादशहाचे स्नानाकरितां पाणी घेण्याची योजना केलेली होती. तेथील खिडक्यांस सुंदर चित्रें चितारलेलीं तावदानें बसवून यमुना नदीचें रमणीय दृश्य पाहण्यासाठीं व्यवस्था केलेली होती.

‘ दिवाणी-खास ’ ही बादशहाची स्वारी स्वत: बसून लोकांचे न्याय-

‘ दिवाणी-खास ’

निवाडे देण्याकरितां बांधलेली इमारत. ही संगमरवरी दगडाची आहे. या ठिकाणीं एक पर्शियन पद्धतीवर कोरलेलें लिखाण पाहावयास मिळतें. त्यावरून १६३७ मध्यें दिवाणी-

खास शहाजहाननें बांधविली असें दिसून आलें. याशिवाय न्याय-दानाच्या सांखळीचाहि उल्लेख यांत केलेला आहे. यामध्यें दोन दिवाणखाने आहेत, एक बाहेरील व एक आंतील. दिवाणखान्यांत बारा कोनी खांब असून ते वेलपत्त्यांनीं चितारलेले आहेत. येथील चित्रविचित्र केलेल्या कमानीहि फारच सुंदर दिसतात. आंतील दिवाणखान्यांत संगमरवरी दगडांचे कोरीव पडदे फारच प्रेक्षणीय आहेत. दररोज सायंकाळीं बादशहा येथें दरबार भरवी, असें म्हणतात.


‘ मिना-मशीद ’

तेथेंच एक ‘ मिना-मशीद ’ अगर ‘स्वर्गीय मशीद’ नांवाची इमारत आहे, ती पाहिली. ही बादशहाच्याकरितां खास म्हणून बांधविली असल्यामुळें फारच लहान आहे.

जॅस्मिन बुरूज, सुमन बुरूज

बुरूज या शब्दावरून कदाचित् हा बुरूज असेल अशी कल्पना होणें साहजिकच आहे. पण हा बुरूज नसून एक महाल आहे. **जॅस्मिन अगर सुमन** असें नांव पडण्याचें मुख्य कारण म्हणजे यावर तशा प्रकारचीं फुलें कोरलेलीं आहेत. ही इमारत जहांगीर बादशहानें बांधविली असावी अशी लोकांची अटकळ आहे. कारण जहांगीर बादशहाची पट्टराणी नूरजहान इनें आंतील सर्व कलाकुसरीचें अलंकारिक काम करवून घेतलेलें आहे. याच महालांत कांहीं काल शहाजहान बादशाहा आपली अत्यंत प्रिय राणी मुमताजमहाल इच्यासह राहत असे आणि तिच्या पश्चात् येथेंच बसून तो दुःखानें ताजमहालाकडे पाहत असे.

यानंतर किल्ल्यांतील ‘ अंगुरी बाग ’—द्राक्षांच्या बागा असलेली जागा व ‘ शिश-महाल ’ ऊर्फ ‘ ऐने महाल ’ पाहून ‘ खास महाल ’ म्हणून



सुमन अगर जॅस्मिन बुरूज, आग्रा

[ पान ७८

त्याच आवारांत प्रसिद्ध असलेली इमारत पाहण्याकरितां आम्ही तिकडे वळलों.

अंगुरी बागेच्या पूर्वेकडील बाजूस आम्हांस एक उंच संगमरवरी दगडाचें सौधतल दिसलें. तोच खास-महाल. अंतःपुरांतील स्त्रियांकरितां जितकी सुंदर इमारत करतां येईल तशा तऱ्हेचीं कोरीव कामें व सर्व तशा दृष्टीनें अलंकृत झाल्यामुळें इतका सुंदर भाग राजवाड्यांत कोठेंहि दिसून आला नाहीं. यास 'आराम गड' (विश्रांतिस्थान) असेंहि नामाभिधान प्राप्त झालें आहे. या इमारतीमध्यें एक अप्रतिम असा मध्यवर्ती दिवाणखाना आहे; व त्या ठिकाणीं शहाजहान बादशाहा आपल्या जनानखान्याशीं हितगुज करीत बसे. खास-महालाच्या प्रांगणांत एक चांगला मार्ग असून तो, खालीं असलेल्या एका विहिरीकडे जातो. याचा उद्देश असा कीं, जर एखादी राज-स्त्री दुर्वर्तनी निघाली तर या मार्गातून तिला खालीं सोडलें असतां ती विहिरींत जाऊन नंतर यमुनानदीच्या पात्रांत लोटली जाई व हें बाहेरील कोणासहि कळूं नये अशी योजना केली आहे. मोंगली न्यायदानाचा हा एक अजब मासलाच म्हणावयाचा!

'खास-महाल'

यानंतर आम्ही जहांगीर बादशहानें आपल्या हिंदु आईकरितां बांधलेला जहांगीर-महाल व हिंदु स्त्री जोधबाई इच्याकरितां बांधलेला राजवाडा पाहून किल्ल्यांतून बाहेर पडलों व मार्गस्थ झालों. परत जात असतां वाटेंत दिल्ली दरवाज्याजवळ असलेली '.जामे मशीद' पाहून घेतली. दिल्ली येथील मशिदीपेक्षां ही कमी दर्जाची आहे, यांत शंका नाहीं. मशीद पाहून झाल्यावर आम्ही बराच वेळ झाल्यामुळें


आपल्या निवासस्थानाकडे येऊन भोजन वगैरे कार्यक्रमाचे तयारीस लागलों.

‘ हतिमद्दौलाची कबर ’

भोजनोत्तर दोन प्रहरीं आम्हीं तेथील हतिमद्दौलाची कबर पाहण्यास जावयाचें ठरवून विश्रांतीकरितां वामकुक्षी केली. नंतर दोनप्रहरीं कबरीकडे जाण्यास बाहेर पडलों. ही कबर यमुनानदीचे पश्चिम तीरावर वसली आहे. हिचें मुख्य वैशिष्टय म्हणजे मोंगल कालीन कबरीच्या शिल्पकामापेक्षां हें बांधकाम निराळें आहे. पूर्वीच्या कबरीप्रमाणें हिला घुमट दिसून आले नाहींत. यावरील पुरोभागीं असलेलें जाळीदार नक्षीकाम पाहून आमचें मन थक्क होऊन गेलें. नूरजहानच्या बापाचें हें थडगें असल्यामुळें शक्य तितक्या भरगच्च व सुंदर नक्षीकामानें ही इमारत श्रृंगारलेली आहे. ताज-महालच्या खालोखाल आग्रा येथील नमुनेदार अशी ही दुसरी इमारत आहे. नूरजहाननें आपल्या बापाच्या स्मरणार्थ ही कबर बांधवून घेतली. या थडग्याचे पलीकडेच नदीकांठावर चिनी-का रोझा म्हणून प्रसिद्ध असलेली एक कबर आहे. पर्शियन कवि **अफझलखान** याचें हें समाधिस्थान असावें असें म्हणतात. यानंतर वेळ असल्यामुळें आम्हीं लागलीच ताजमहाल पाहण्यासाठीं निघालों.


‘ ताजमहाल ’

आग्रा शहरांतील जगत्प्रसिद्ध व आजपर्यंत जगाच्या इतिहासांत अदृष्टपूर्व अशा तऱ्हेची केव्हांहि न झालेली इमारत पाहण्याचा योग प्रथमच प्राप्त झाल्यामुळें आम्हांस अत्यंत आनंद झाला होता. पवित्र यमुनानदीचे कांठीं दिव्य प्रेमाचा संदेश जगास सांगणारी ही इमारत आजपर्यंत तरी अद्वितीय व अप्रतिम



हातिमद्दौल्याची कबर, आग्रा

[ पान ८०



ताजमहाल, आग्रा

[ पान ८१

ठरली आहे, यांत शंका नाहीं. भारतवर्षांतीलच नव्हे, तर अखिल जगांतील शिल्पशास्त्रज्ञांचे मतें अशी कलाकृति पुढें केव्हां उत्पन्न होईल कीं काय अशी शंका आहे.

प्रेमाच्या पायावर उभारलेला हा ताजमहाल (Crown of Palaces) 'प्रासादांचा मुकुटमणी' म्हणून प्रसिद्ध आहे, हें आपणांस माहीत आहेच.

शहाजहान बादशहाचें आपली प्रियपत्नी मुमताजमहाल इजवर प्राणापलीकडे प्रेम होतें व त्या प्रेमाचें अत्यंत सुंदर परिणत स्वरूप व प्रतीक म्हणजेच ताजमहाल. याबद्दल एक आख्यायिका आम्हांस कळली. ती अशी कीं, मुमताजमहाल ही शहाजहानबरोबर बऱ्हाणपुरास लढाईचे स्वारींत गेली असतां तेथेंच प्रसूत झाली व त्या वेळीं ती एकाएकीं बरीच आजारी झाली. प्रसूतीपूर्वीच आपण यांतून उठणार नाहीं असें तिला वाटूं लागलें व त्या वेळीं तिनें बादशहाला विनंति केली कीं, "माझ्या पश्चात् माझें स्मरण राहावें म्हणून आपण माझी हजारों वर्षें अर्थात् चिरकाल टिकणारी व जगांतील सर्व इमारतींपेक्षां श्रेष्ठ दर्जाची एक कबर बांधावी." हें तिचें अंतकालचें मागणें शहाजहान बादशहानें तंतोतंत पाळलें, याची साक्ष यमुनानदीचे कांठीं असलेला 'ताज' आपणांस देत आहे. आमची कल्पना अशी आहे कीं, जगांतील पत्नीविषयक आत्यंतिक प्रेमाचा नमुना म्हणजेच ताज.


ज्या बादशाही प्रेमी हृदयावर या मंदिराची उभारणी झाली त्याबद्दल आम्हांला अत्यंत कौतुक वाटतें. अशा तऱ्हेचीं थोर प्रेमळ माणसें विशेषतः राजघराण्यांत पाहावयास मिळणें क्वचित्‌च. आग्रा शहराचें सर्व वैभव एकट्या ताजमध्यें एकवटलेलें आहे, असेंच आम्हांस वाटतें.

आम्ही शिल्पशास्त्राचे दृष्टीनें केव्हांहि अज्ञच. ताजमहाल सौंदर्यशास्त्र व शिल्पकलेच्या दृष्टीनें पाहावयाचा झाल्यास खरोखरच बराच काल दररोज पाहून त्याविषयीं आपलें मत बनविण्यास हवें. पण कालाचे अभावीं व निव्वळ मनोरंजन या दृष्टीनेंच आम्हीं तो पाहिल्यामुळें त्यांतील अंतर्यामींच्या व सूक्ष्म कलेच्या गमती कळणें अशक्यच ! असो.

ताजच्या ऐतिहासिक महत्त्वासंबंधीं आमच्या लिहिण्यानें आजपर्यंत ज्या मोठमोठया इतिहासज्ञांनीं आपल्या विद्वत्ताप्रचुर भाषेंत त्याविषयीं जें कांहीं लिहिलें असेल त्यांत मुळींच भर पडणार नसल्यामुळें आम्हीं त्या भानगडींत पडत नाहीं. म्हणूनच ताजमहाल कोणीं बांधला ? त्या वेळीं कोणता शिल्पकार या कामावर नेमला होता ? हें ठरविण्याची जरूरी आम्हांला वाटत नाहीं.

ताजमहालचें बांधकाम पुरें होण्यास १७ वर्षें अवधी लागला व कोटयवधी रुपये खर्च झाले. प्रसिद्ध संगमरवरी दगड जवळ जवळ २५० मैलांवर असलेल्या जयपूरहून मुद्दाम आणण्यांत आला होता.

ताजमहालाचें भव्य प्रवेशद्वार लाल दगडाचें असून त्यावर तऱ्हे-तऱ्हेच्या फुलांच्या आकृति कोरलेल्या आहेत. शिवाय पांढऱ्या संगमरवरी दगडांत कुराणांतील कांहीं सुभाषितें पण कोरलेलीं आहेत. हें सर्व कोरीव काम अत्यंत अप्रतिम झालें असून अगदीं ताजें दिसत आहे. या प्रवेशद्वारानें आंत शिरतांच आपणांस फारच सुंदर, विस्तीर्ण व हिरवागार असा बगीचा लागतो. जगांतील कोठल्याहि बागेचें प्रवेशद्वार इतकें भव्य व सुंदर नाहीं, असें म्हणतात. या प्रवेशद्वारापासून मुख्य



ताजमहालचें अंतरंग, आग्रा

[ पान ८३

ताजमहालची इमारत सुमारें अर्धा मैल लांब आहे. यावरून बागेच्या विस्तीर्णत्वाची कल्पना येईल.

मुख्य दरवाज्यापासून तों ताजपर्यंत जाण्यास दुतर्फा दगडी रस्ता बांधिलेला असून त्याच्या मधून पाण्याचा स्वच्छ प्रवाह वाहत आहे व त्यांत कारंजीं बसविलेलीं आहेत. जलमार्गाच्या दोन्ही बाजूंस मधोमध सुरूच्या झाडांची रांग असल्यामुळें रस्ता फारच मनोरम दिसतो.

ताजचा मुख्य भाग संगमरवरी दगडाचा आहे व त्यावर एक मोठा घुमट व बाकी लहानलहान घुमटवजा शिखरें आहेत. ताजची इमारत पूर्णपणें चौकोनी असून तीस चोहों बाजूंनीं प्रवेशद्वारें ठेविलीं आहेत. मुमताजमहालची कबर ज्या बाहेरील चबुतऱ्यावर बांधविली आहे तो पांढऱ्या व काळ्या संगमरवरी दगडाचा आहे आणि त्याच्या प्रत्येक कोपऱ्यांत चारी बाजूंस चार, तीन मजली मनोरे त्या सुंदर कबरीचे रक्षणार्थ जणूं काय पहाराच करीत उभे असावेत असें वाटतें. मुख्य कबरस्थान जेथें आहे, तेथें जाण्यास एक मोठा कमानीवजा दरवाजा आहे व त्यावर काळ्या संगमरवरी दगडाचे फारशी भाषेंत कोरीव लेख लिहिले आहेत. याहि ठिकाणीं फुलांच्या वेलबुट्टीसारख्या आकृति खोदविलेल्या दिसतात. मधील भाग अष्टकोनी असून त्याच्या मधोमध घुमटाचा आंतील भाग आहे, यामुळें त्या ठिकाणीं आपल्या प्रत्येक शब्दाचा विशिष्ट तऱ्हेचा प्रतिध्वनि ऐकावयास मिळतो. येथील प्राचीन रचनाचातुर्य व शिल्पकौशल्य खरोखरच अभिमानास्पद आहे, यांत शंका नको. पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडाच्या तक्तपोशीवर मधोमध मुमताजमहालची कबर विराजमान झाली आहे व तीवर चांदीचा व सोन्याचा मुलामा असलेला एक दीप सारखा

तेवत असतो. बादशहाचें थडगें थोडेंसें एका बाजूस आहे. या दोन्ही कबरींवर दररोज गुलाब, पुष्पें उधळलेलीं आढळून येतात व त्यांच्या मधोमध वरच्या बाजूस गव्हर्नर लॉर्ड कर्झन यांनीं दिलेला एक सुंदर दिवा लटकलेला दिसतो.

हें झालें वरील थडगें. पण ताजमहालचे बाहेरील चबुतऱ्यामधून खालीं तळघरवजा जागेंत जाण्यास एक मार्ग आहे. तेथें जातांच वरील थडग्याखालीं बरोबर त्याच ठिकाणीं आंतील बाजूस एक कबर आहे. तेथेंच मुमताजमहालच्या अस्थि पुरल्या आहेत. मुख्य कबरस्थान हेंच. वरील थडगें फक्त शोभेकरितां आहे.

या दोन्ही कबरींचें काम संगमरवरी दगडाचें असून पूर्वी त्यावर सर्व शिल्पशास्त्रासंबंधीं अलंकारिक काम खरोखर उत्तम उत्तम जवाहिरे बसवून खोदून केलें होतें. पण आज त्या ठिकाणीं त्याच्या खुणाच फक्त दिसतात. गतवैभवाचे विचार येऊन आमच्या मनाला एक प्रकारची खिन्नता आली; पण उपयोग काय ? या दोन्ही कबरींभोंवतीं सभोंवार संगमरवरी दगडाचा कोरीव काम केलेला एक पडदाच ठेवलेला आहे, असें वाटतें. या पडद्याचें काम इतकें सुंदर, सूक्ष्म व कलायुक्त आहे कीं, जणूं काय कोळ्यानें आपलें जाळेंच विणल्याप्रमाणें दिसतें. फुलांच्या आकृति तर इतक्या अप्रतिम व बरोबर वठल्या आहेत कीं, प्रत्येक पाकळी न् पाकळी व त्या ठिकाणीं बसविलेल्या रत्नांच्या खुणा एकदम स्पष्ट दिसाव्यात. आज अशा तऱ्हेचें काम होईल कीं नाहीं, याचीच आम्हांला शंका वाटते. ताजचें वर्णन करणें म्हणजे मानवी बुद्धि व लेखणी खुंटते हें म्हणणें खरोखरच सार्थ आहे, यांत संदेह नाहीं.

ताजमहालचें एकंदर वातावरण अत्यंत गंभीर व दुःखमय वाटतें. बादशाही प्रेमी जोडपें अद्याप देखील आपल्या सूक्ष्म लिंगदेहानें हित-गुज करीत बसलेलें पाहून त्या वेळच्या प्रत्यक्ष प्रेमाची कल्पना येऊन मानसिक औदासिन्य वाटतें. पण याच औदासिन्यांत सौंदर्याचा आनंद मनमुराद लुटावयास मिळतो. दुःख व आनंद परमेश्वरानें एकाच वस्तूंत एकवटून ठेवावे याचेंच कौतुक वाटतें व ईश्वरी अगाध लीलेच्या सामर्थ्या-बद्दल एक प्रकारचा भीतियुक्त आदर उत्पन्न होतो. निदान आमची तरी अशी खात्री आहे. ज्या आत्यंतिक स्वर्गीय प्रेमाच्या पायावर एवढी अलौकिक इमारत उभारली गेली त्या प्रेमाचा उगम होणाऱ्या अंतःकर-णांत खरोखरच कांहीं तरी दैवी अंश असला पाहिजे.

ताजमहालमधील बाकीचे भाग कसे तरी पाहून आम्ही बाहेर पडलों. ताजमहालचें वैशिष्ट्य व गंमत हीच कीं, मुख्य इमारत पाहिली असतां तिचा पगडा आपल्या मनावर इतका जबरदस्त बसतो कीं, मग दुसरें कांहीं पाहणें नकोसें वाटतें. या मानसिक औदासिन्ययुक्त आनंदांत आम्ही बाहेर पडलों व घरीं परत आलों.


आग्र्यास आल्याचे दुसरे दिवशीं म्हणजे ता. २२ रोजीं फत्तेपूर-शिक्री पाहावयास सकाळीं ७ वाजतां मोटारनें निघालों. आग्रा व फत्तेपूर-शिक्रीमधील अंतर सुमारें २२ मैल आहे. जाण्यास दुतर्फा सांवलीकरितां झाडें असलेला चांगला रस्ता आहे. आम्हांस जाण्यास सुमारें १॥ तास लागला. आम्ही तेथें ८॥ वाजतां पोहोंचलों.

**फत्तेपूर-शिक्री**

फत्तेपूर-शिक्री हें पूर्वी अकबर बादशहानें राजधानीचें शहर म्हणून वसविलें होतें. यासंबंधीं एक आख्यायिका अशी आहे कीं, बादशहाचे मुलांपैकीं कोणीहि जगत नसे व लहानपणींच मरत. बादशहानें फत्तेपूर-शिक्रींत सलीम चिस्ती या नांवाचा प्रसिद्ध धार्मिक साधु राहत असे त्याला नवस केला व त्यानंतर अशी एक दंतकथा प्रचलित झाली आहे कीं, अकबरानें आपली हिंदु बायको जोधबाई ईस साधूच्या आज्ञेवरून शिक्री येथें राहण्यास पाठविलें व त्या मुदतींत अकबराला मुलगा झाला. या नवसपूर्तीप्रीत्यर्थ बादशहानें शिक्री येथें आपली राजधानी वसविली. यामुळें शिक्रीस त्या काळीं फारच महत्त्व प्राप्त झालें. पण पुढें कालांतरानें कांहीं राजकीय भानगडीमुळें व पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळें बादशहास शिक्रीहून राजधानी उठवावी लागली. तेव्हां फत्तेपूरशिक्रीचें महत्त्वहि गेलें व तीस एक प्रकारचें उध्वस्त स्वरूप प्राप्त झालें. पण बादशहाच्या वेळीं बांधलेल्या इमारती आजहि बांधकाम या दृष्टीनें प्रसिद्धच आहेत व तत्कालीन शिल्पकलेचे नमुने म्हणून पाहण्यासारखे आहेत. या राजधानीचा व्यास ६ मैल आहे असें कळलें.

येथें पाहण्यासारख्या इमारती बऱ्याच आहेत; पण त्यांतील आम्हांस ज्या विशेष चांगल्या वाटल्या त्यांचेंच क्रमवार वर्णन देत आहों.

प्रथम आम्हीं राजवाडा व त्यांतील भाग पाहिले. येथेंहि आग्रा येथील किल्ल्याप्रमाणें दिवाणी-आम, दिवाणी-खास, वगैरे बादशाही महाल आहेत. प्रवेशद्वारांत जातांच नौबतखाना लागतो. नौबतखान्याचा आकार चौकोनी असून याच्या चारी बाजूंस द्वारें ठेविलीं आहेत.



दिवाणी-खासमधील एक स्तंभ फत्तेपूर शिक्री, आग्रा [ पान ८६

एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी कीं, कोठेंहि गेल्यास तत्कालीन बादशाही राजप्रासादांत सारखीच योजना असे. या इमारतींपैकीं येथील दिवाणी-खास फारच प्रेक्षणीय आहे. दिवाणी-खासची इमारत बाहेरून दुमजली वाटते. पण आंत जातांच ती एकमजलीच आहे, असें आढळून आलें. यांत विशेष गोष्ट म्हणजे कलाकुसरीच्या कामानें शृंगारलेला मध्यवर्ती एक खांब असून त्यावर चारी बाजूंस सभोंवार गॅलरी केलेली आहे. मुख्य मध्यस्थानीं बादशहा बसण्याकरितां जागा असून चारी बाजूंस चार दिवाण बसावेत, अशी योजना केलेली आहे. या खांबावरील नक्षीकाम म्हणजे शिल्पशास्त्राच्या अभ्यासू माणसाला खरोखर अजबखानाच !

दिवाणी-खास

ही, पूर्वीं आम्हीं उल्लेखिलेला साधु सालिम चिस्ती याची, एक सुंदर कबर आहे. ती फारच प्रेक्षणीय आहे. प्राचीन मोंगल शिल्पकलेचा अत्युत्कृष्ट मासला म्हणून ही प्रसिद्ध आहे. ही कबर शुभ्र संगमरवरी दगडाची असून तीवरील कोरीव काम पाहून आम्हांस फारच आनंद झाला. आजपर्यंत यासारखें कोरीव काम आम्हांस क्वचितच पाहावयास मिळालें होतें. यांत विशेष म्हणजे कोरीव काम शिंपल्याचें केलें असल्यामुळें शोभिवंतपणांत फारच भर पडली आहे. मक्का येथील मशिदीच्या लहान प्रमाणांत याचें बांधकाम झालें आहे, असें समजतें. येथेंच जहांगीर बादशहाचा जन्म झाला. हीस अद्याप देखील धर्मस्थान म्हणून लोक फारच पूज्य मानतात व बरेच लोक दर्शनास येतात. बायकांना एका विवक्षित जागेपर्यंत जाण्यास मुभा आहे. कबरस्थानास जावयाचें झाल्यास मोकळया पायानें जावें लागतें.

‘ दर्गा मशीद ’

दफतरखाना म्हणून बादशाही रेकॉर्ड ठेवण्याची जागा आहे. येथें

' दफतरखाना '

अकबर बादशहा रात्रीचे निवांत वेळीं दररोज येऊन बसत होता असें म्हणतात.

महाली-खासच्या जवळ चारी बाजूंस सोपा असलेला एक महाल

' तुर्की सुलतानाचा महाल '

आहे. येथें बादशाहाची तुर्की बायको राहत असे. जरी ही इमारत लहान आहे तरी शिक्री येथील सर्व इमारतींत अतिशय सुंदर आहे. ही इमारत लाल आहे. हिचें बाह्यांग व अंतरंग विपुल कोरीव कामानें भरलेलें आहे. हिच्या छतावर जंगलाचे, फुलांचे वगैरे देखावे कोरलेले आहेत.

हा वाडा खरोखर अकबराची पट्टराणी सुलताना बादशाही बेगम


'जोधबाईचा वाडा'

इचा असतां यास जोधबाईचा वाडा म्हणून नांव दिलेलें पाहून आम्हांस आश्चर्य वाटलें. पण याचें एक कारण असावें. आंतील सर्व कोरीव काम हिंदु पद्धतीवर असल्यामुळें आतां त्यास जोधबाईचा महाल म्हणून नामाभिधान प्राप्त झालें असावें. शिक्री येथील सर्वांत मोठा वाडा हाच आहे व अकबर बादशहानें प्रथमच ही इमारत बांधविली, असें म्हणतात.

या नांवानें प्रसिद्ध असलेली ही एक इमारत आहे. हिला पूर्वी ' सोनारी

मरियामचें घर

मकाण ' ऊर्फ ' सोनेरी घर ' असें म्हणत होते. हिचे बाहेरील व आंतील बाजूस सोनेरी मुलामा दिला असल्यामुळें सोनेरी महाल म्हणत असावें. हीस ' मरियाम कोठी ' असेंहि म्हणतात. अकबर बादशहाची राणी मरियाम-उल-झमानी म्हणजे जहांगिरची आई येथें राहत असे. या इमारतीवर कोरीव काम भरपूर



शेख सलिम चिस्ती याची गुंबद, फत्तेपूर शिक्री, आग्रा

[पान ८८

असून अत्यंत प्रेक्षणीय आहे. मरियाम-उल-झमानी हिंदु असल्यामुळें हींवरील चित्रकाम हिंदु पद्धतीचें असून श्रीराम-अवतारांतील कांहीं प्रसंग कोरलेले दिसतात.

याशिवाय अकबर बादशहाच्या आवडत्या हत्तीस पुरलेल्या ठिकाणीं बांधलेला ' हरण मिनार ' नांवाचा मनोरा, तुर्की राणीचें स्नानगृह, बिरबल व अबुलफजलचीं वसतिस्थानें, टांकसाळ, खजिना अशीं एकवार बादशाही वैभवांत असलेलीं पण आज उध्वस्त झालेलीं स्थानें पाहून होई-पर्यंत १०॥ वाजले. तेव्हां आम्हीं सर्वांनीं तेथें थोडासा उपहार करून सुमारें १२ वाजतां शिक्री सोडली व आग्र्यास एक वाजतां येऊन पोहोंचलों.

त्या दिवशीं सायंकाळीं आग्रा येथील नथुराम आणि कं. च्या मालकाचें दगडावरील कोरीव कामाचें दुकान होतें, तेथें ठेवलेले कांहीं सुंदर नमुने पाहण्यास आम्ही गेलों. ताजमहाल व इतर इमारतींच्या उत्कृष्ट प्रतिकृति पाहण्यास मिळाल्या व त्यांपैकीं एक हतिमद्दौलाच्या थडग्याचा नमुना आम्हीं खरेदी केला. कारण तो ताजमहालप्रमाणेंच अति सुंदर वाटला. तेथून जवळच असलेलें गणेशलाल आणि सन्स्चे जरतारीच्या कामाचें दुकानहि पाहिलें. तेथें देखील ताजचें सुंदर काम दृष्टीस पडलें. यांव्यतिरिक्त बाहेर कोठेंहि न जातां आम्ही विश्रांती-करितां स्वस्थानीं परतलों.

' शिकंदरा '


दुसरे दिवशीं सकाळीं म्हणजे ता. २३ रोजीं तेथून ५।६ मैलांवर असलेलें ' शिकंदरा ' गांव पाहण्यास गेलों. शिकंदरा येथें अकबर बादशहाची छत्री, इदगा, मशीद वगैरे पाहण्यासारखीं आहेत. ' शिकंदरा ' हें नांव शिकंदर

लोदी यापासून पडलें असावें. येथें असलेल्या पूर्वीच्या उध्वस्त व अवशिष्ट भागांवरून पूर्वी येथें बरेंच मोठें व महत्त्वपूर्ण शहर होतें, असें वाटतें. आज मात्र शिकंदर लोदीच्या बारदरीव्यतिरिक्त तेथें कांहींच दिसत नाहीं. ही बारदरी लाल दगडाची व दुमजली आहे. बारदरी चौकोनी असून चारी बाजूंस अष्टकोनी कलाकुसरीचें काम केलेले मनोरे आहेत. या बारदरीचें रूपांतर जहांगीर बादशहानें आपल्या मातोश्रीच्या समाधींत केलें. दुसऱ्या मजल्यावर या राणीचें थडगें आहे.

यानंतर लाल दगडाची संपूर्ण घोड्याची आकृति व लहानसें थडगें लागतें. येथें एका श्रीमंत सरदाराचा घोडा व मोत्तद्दार पूर्वी मारला गेला म्हणून त्याच्या स्मरणार्थ हें बांधलें असावें.

पण ' शिकंदरा ' आज जर प्रसिद्ध असेल तर तें तेथें असलेल्या अकबर बादशहाच्या सुंदर छत्रीबद्दल. ही छत्री अत्यंत प्रेक्षणीय असून कांहींशी बुद्धकालीन विहाराच्या धर्तीवर बांधली असावी, असें वाटतें. अकबर बादशहानें जहांगीरच्या मातोश्रीच्या थडग्यानजीकच आपल्या समाधीकरितां स्थान पसंत करून तेथें थोडेंसें काम सुरू केलें होतें. जहांगीर बादशहानें आपल्या कारकीर्दींत पूज्य बुद्धीनें आपल्या बापाच्या समाधि-स्थानाकडे पायीं चालत प्रवास केला. त्या वेळीं तेथील एकंदर वैभवशून्य व उध्वस्त स्वरूप पाहून त्यास फारच वाईट वाटलें व त्या वेळीं बराचसा भाग पाडून पुनः आपल्या मनाप्रमाणें सर्व छत्रीचें काम अत्यंत सुंदर करून घेतलें, असें कळतें. ही छत्री ज्या स्थानावर बांधली आहे त्यास

अकबरची छत्री



अकबराची कबर, शिकंदरा आग्रा

[ पान ९०

'बिहिस्ताबादची बाग' असें नांव असून ती फारच विस्तीर्ण आहे. यास चहूं बाजूंनीं उत्तम उंच दगडी कोट आहे. या कोटाच्या चारी बाजूंस कलाकुसरीचें काम केलेले अष्टकोनी दुमजली मनोरे आहेत व त्यावर घुमटवजा शिखरें आहेत. कबरस्थानास येण्यास चारी बाजूंनीं दरवाजे ठेवलेले आहेत. मुख्य दरवाजा दक्षिणेस आहे. हा दरवाजा चौकोनी असून त्यामध्यें नौबतखान्याची योजना केली आहे. या चारी दरवाज्यांतून कबरस्थानास येण्यास दगडी रस्ता बांधलेला आहे. कबरस्थान अत्यंत सुंदर पिऱ्यामीडच्या आकाराचें खालून वर निमुळतें होत गेलें आहे. यावरील कलाकुसरीचें काम अत्युत्तम झालेलें असून तें हिंदु व बौद्धकालीन आहे. यावरून बादशहाची धार्मिक भावना अजमावतां येते. त्याच्या ठिकाणीं इतर मुसल्मान लोकांमध्यें अस्तित्वांत नसलेली परधर्मसहिष्णुता होती, यांत शंका नाहीं. हें कबरस्थान व जवळील सर्व भाग पाहून आम्ही परत निवासस्थानीं आलों.

दोन प्रहरीं तीन वाजतां आम्ही प्रो. मुल्लरचे एक स्नेही डॉक्टर इ. एच्. हँकीन, D. Sc., यांचें प्रयोगालय पाहण्याकरितां गेलों. हिंदुस्थानांतील हें एक चांगल्यापैकीं प्रयोगालय आहे. विषप्रयोगाच्या केसीजसंबंधीं ते संशोधन करतात असें कळलें. तेथून परतल्यावर सायंकालीन करमणुकीकरितां आम्ही यमुनेचे पुलावर फिरावयास जाऊन आलों.

घरीं आल्यावर रा. ब. खांडेकर यांच्या शाळा व लायब्ररीकरितां अजमिरास ४० रुपये देणगीदाखल पाठवून दिले.

आज म्हणजे तारीख २४ रोजीं दोन प्रहरीं आम्हीं आग्रा सोडण्याचें निश्चित ठरविलें होतें म्हणून सकाळचा सर्व वेळ तेथील कांहीं चांगल्या

वस्तु खरेदी करण्यांत घालवावा, असा विचार करून बाहेर पडलों. आम्हीं स्वतःकरितां, श्री. कै. सौ. राणीसाहेबांकरितां व आमचे चिरंजीव श्री. भाऊसाहेब व चि. काशीताई व जान्हवीबाई यांच्याकरितां बऱ्याच वस्तु खरेदी केल्या. सुमारें ५००।६०० किंमतीचा माल आम्हीं खरेदी केला होता. सर्व खरेदी झाल्यावर घरीं परत आलों. त्या वेळीं लाला हरकिसनदास यांनीं कुमठेकर यांच्यासह आमचा फोटो घेतला. आग्र्यास असतांना आम्ही बाहेर पडल्या वेळीं माहिती सांगावी अशा उद्देशानें तेथील सेसिल हॉटेलमधील एक मार्गदर्शक ( Guide ) ठरविला होता, त्यास त्याबद्दल ५० रुपये दिले.

आग्र्यास जर आम्हांस विशेष कांहीं वाटलें असेल तर उत्तम उत्तम इमारतींची विपुलता व त्याहि सौंदर्यसंपन्न व बादशाही वैभवयुक्त. पण हें सांगण्यास पाहिजे असें नाहीं. कारण आमची खात्री आहे कीं, एकटा ताजमहालच जगांतील अद्वितीय, सुंदर व वैभवयुक्त इमारतींना पुरून उरणारा आहे. ताजमहालची गम्मत ती हीच कीं, प्रत्येक वेळीं तो नाविन्यपूर्ण दिसतो. सकाळीं एक सौंदर्य, तर दोन प्रहरच्या वेळीं त्याच सौंदर्याचा दुसरा मासला, तर सायंकाळच्या सौंदर्यांत आणखी कांहीं तरी नवीनच! सर्व काळांत रात्रीच्या प्रशांत समयीं शीतल चंद्रिकेंत नितांत रम्य असा ताजमहाल पाहणें म्हणजे स्वर्गीय सौंदर्यामृताचें आकंठ पान करणेंच. या क्षणीं सर्व ऐहिक जगाला विसरून मनुष्य एका उच्च वातावरणांत गुरफुटून जातो, अशी आमची भावना झाली. एकंदरींत आग्रा येथील आमचा ४।५ दिवसांचा मुक्काम आनंदकारक झाला, यांत शंका नाहीं.

आग्रा शहरांत बहुतेक इमारती दगडी दिसल्या व सर्व हिंदुस्थानांत त्यांची बांधणी फारच चांगली असावी, असें आम्हांस वाटलें.

दगडांचें कोरीव त्याचप्रमाणें खोदीव काम याबद्दल आग्रा फारच प्रसिद्ध. आग्र्याच्या सुती सतरंज्याहि फारच टिकाऊ व चांगल्या असतात. येथें धान्य व गूळ यांचा व्यापार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चाललेला असतो.


---

# मथुरा

आम्हीं आग्रा स्टेशन बरोबर ५ वाजून १२ मिनिटांनीं सोडलें व मथुरा कँटोन्मेंट येथें ७॥ वाजतां पोहोंचलों. मथुरेस भरतपूरचे महाराज-साहेबांचे बंगल्यांत आम्ही राहिलों होतों. महाराजांचा हा बंगला यमुनेच्या तीरावर श्रीद्वारकाधीशाचे देवळासमीपच आहे. रा. ब. खांडेकर यांचे मदतीनें हा बंगला आम्हांस मिळाला. त्या वेळीं भरतपूरचे वकील राधाकृष्ण या नांवाचे एक सद्गृहस्थ होते.

दुसरे दिवशी तेथील प्रेक्षणीय स्थळें असतील तीं पंडित राधाकृष्ण यांच्या विचारें पाहण्याचें ठरवून आम्हीं विश्रांति घेतली.

भगवान् श्रीकृष्णाचें जन्मस्थान म्हणून मथुरेस एक प्रकारचें धार्मिक महत्त्व आहे. श्रीकृष्णाच्या सहवासानें पुनीत झालेलें गोकुळ, वृंदावन व महावन वगैरे स्थानांसंबंधीं माहिती ऐकून आमच्या मनांत भाविकपणें आदर उत्पन्न झाला होताच व तींच आतां प्रत्यक्ष पाहण्याचा योग आला म्हणून फारच समाधान वाटलें. श्रीकृष्ण व त्यांचे सवंगडी



सामान्य देखावा, मथुरा

[ पान १४

यांनीं आपल्या लीलांनीं पवित्र केलेलीं तीं स्थानें ' व्रजमंडल ' म्हणून प्रसिद्ध होतीं.

मथुरेस ऐतिहासिक दृष्ट्या देखील महत्त्व आहे. मथुरेवर इ. स. १०१७ सालीं महमूद गझनवी यानें व इ. स. १५०० सालीं शिकंदर लोदी यानें स्वाऱ्या करून तेथील धार्मिक स्थानें उध्वस्त केलीं होतीं. इ. स. १६६९ सालीं अवरंगजेबानें स्वारी करून येथील केशवदेवांचें देऊळ जमीनदोस्त करून तेथें मशीद बांधली. ही मशीद मुसलमानांच्या धर्मवेडाची अद्याप साक्ष देत आहे. सुमारें इ. स. ४०० चे वेळीं येथें बौद्धधर्मीयांची सत्ता होती. त्या काळचे कांहीं विहार वगैरे अद्याप दृष्टीस पडतात. मथुरेचीं कांहीं देवळें फारच प्रेक्षणीय आहेत. त्यांत विशेषतः द्वारकाधीश, विजय-गोविंद, व राधाकृष्ण हीं पाहण्यासारखीं आहेत. आम्हीं दोन तीन दिवस राहून येथील देवळें घाट, वगैरे व आसपास असलेलीं श्रीभगवान् कृष्णाचीं, वृंदावन व गोकुळ वगैरे वसतिस्थानें पाहण्याचें ठरविलें.

' महावन '

तारीख २५ रोजीं गुरुवारीं दोन प्रहरीं आम्हीं ५ वाजतां तेथील पुराणवस्तुसंग्रहालयाचे अधिकारी पंडित राधाकृष्ण यांचे बरोबर ' महावन ' पाहण्यास गेलों. या महावन गांवांत श्रीकृष्णाचें सर्व लहानपण गेलें होतें. वसुदेवानें श्रीकृष्णाला नंदाचे घरीं पोंचविल्यानंतर यशोदेनें श्रीभगवानाचें पालनपोषण या महावनांतच केलें म्हणून तें महत्त्वाचें आहे. नंदाचा राजवाडा आम्हांस दाखविण्यांत आला. याला ' ऐशी खांब ' अशीहि संज्ञा आहे. परंतु त्या वेळेचा तो असणें शक्य नाहीं. या राज-

वाड्यांत यशोदामाईची लोणी करण्याची एक रवि आहे. श्रीकृष्णाची बांसरी लपविण्याची गोपींनीं केलेली जागा आम्हांस पाहावयास मिळाली. येथील कांहीं खांब ग्रेशियन पद्धतीचे वाटतात.

त्यानंतर तेथून एक मैलावर यमुनानदीचे पश्चिम तीरावर वसलेलें 'गोकुळ' पाहण्यास गेलों. भगवान् श्रीविष्णूंनीं प्रथम गोकुळांतच कृष्णावतारांत पदार्पण केलें असें सांगतात. धार्मिक दृष्टया या दोन्ही स्थानांना महत्त्व असल्यानें येथें नेहमीं दर्शनार्थ यात्रेकरी लोक येतात. गोकुळ पाहून आम्हीं रात्रौ ८॥ वाजतां परत घरीं आलों.

'गोकुळ'

भोजनोत्तर विश्रांति घेऊन दोन प्रहरीं तेथील 'पुराणवस्तुसंग्रहालय' (Archæological Museum) पाहण्याकरितां बाहेर पडलों. पुराणवस्तुसंशोधनाचे दृष्टीनें यास फारच महत्त्व आहे. या संग्रहांत प्राचीन स्थानिक पुराणवस्तु ठेविल्या आहेत. त्याचप्रमाणें अपूर्व व महत्त्वपूर्ण असे प्राचीन शिलालेख पाहावयास मिळतात. वृंदावन व महावन या जागीं सांपडलेल्या बुद्धाच्या मूर्ति येथें आहेत, त्या आम्हांस दाखविल्या. यावरील लेखावरून त्या २००० वर्षांपूर्वींच्या आहेत असें आढळून आलें. यापूर्वींच्या मूर्ती अद्याप सांपडल्या नसाव्यात, असें वाटतें. अगदीं प्राचीन मूर्तींच्या गळ्यांत जानवें आहे. पण अलीकडील मूर्तींच्या गळ्यांत तें आढळून आलें नाहीं. त्यानंतर आम्हीं बोटींतून सहल करण्यास गेलों. ही सहल खरोखर आनंददायक वाटली. विशेषतः सायंकालीन आरती बोटींतून पाहावयास फारच मजेशीर वाटते. पण अंधार पडला असल्यामुळें आम्हांस घाईनेंच परतावें लागलें.

दुसरे दिवशीं दोन प्रहरीं ३ वाजतां वृंदावनास जाण्यास निघालों.

‘ वृंदावन ’

मथुरेहून वृंदावन ८ मैल लांब आहे. आम्ही मोटारीनें गेलों. रेल्वेचाहि एक फाटा वृंदावनापर्यंत जातो. वृंदावनांत मथुरेप्रमाणेंच शेंकडों देवळें आहेत. तीं सर्वच पाहणें शक्य नव्हतें, म्हणून विशेष प्रसिद्ध तेवढींच आम्हीं पाहण्याचें ठरविलें. विशेषतः गोविंददेव, गोपीनाथ, रंगजी वगैरे देवळें प्रसिद्ध व पाहण्यासारखीं आहेत. हीं सर्व देवळें कृष्णाचींच, पण निरनिराळीं नांवें दिलेलीं आहेत. येथील सर्व देवळांची व्यवस्था विलासी श्रीकृष्णदेवाप्रमाणें विलासपूर्ण आहे, असें आम्हांस आढळून आलें. प्रत्येक देवळाला मोठमोठालीं उत्पन्नें आहेत. प्रत्येक देऊळ उत्तम उत्तम अलंकारपूर्ण कारागिरीनें शृंगारलेलें दिसून आलें. येथें देवाचे, माणसांप्रमाणेंच सर्व सुखसोहाळे होतात. येथील सर्वांत सुंदर असें एक देऊळ जयपूरच्या महाराजांनीं बांधविलेलें आहे. पण तें मूर्तिविरहित असून अपूर्ण स्थितींत आहे. त्यास १९ लाख रुपये खर्च आला असें समजलें. गोविंदजीचें देऊळ सर्वांत प्राचीन म्हणजे बुद्धकालीन आहे. सर्वांत मोठें, भव्य व बांधकामाच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीचें देऊळ श्रीरंगनाथाचें आहे. याचें बाह्य प्रांगण फारच विस्तीर्ण आहे. देवळाचें सर्व बांधकाम मद्रासी पद्धतीवर आहे व तिकडील देवळांप्रमाणें दरवाज्यावर गोपुरें आहेत. देवळाचे समोर एक सोनेरी जयस्तंभ आहे.

याशिवाय मदनमोहन, गोपीनाथ, राधारमण वगैरे देवळें पाहण्यासारखीं आहेत. राधारमण देऊळ संगमरवरी दगडाचें अलीकडील कालांत बांधलेलें आहे. शिवाय शिव बन्सीधर, शिंदे सरकारचें राधागोपाळजीचें

देऊळ, शहाजीका मंदीर वगैरे देवळें आम्हीं पाहिलीं. वृंदावनांत श्रीकृष्ण, बलराम, यशोदा, नंद यांच्या मूर्ति आहेत. गोपींच्या रासक्रीडेचें म्हणून प्रसिद्ध असलेलें स्थान आम्हांस पहावयास मिळालें. हें सर्व पाहून घरीं परतण्यास आम्हांस रात्रीचे आठ वाजले.

आतांपर्यंत आम्हीं मथुरा शहराबाहेरील गोकुळ, वृंदावन, महावन वगैरे पाहून घेतलें. दुसरे दिवशीं मथुरा सोडणार असल्यानें दुसरे दिवशीं येथील देवळें, घाट वगैरे पाहण्याचें ठरविलें. मथुरेंतील देवळें फारच सुंदर आहेत; पण बाहेरून त्यांची कल्पना येत नाहीं. याचें कारण मथुरा शहरांत फार गर्दी झाल्यामुळें व प्रत्येक देऊळ भरवस्तींत व संकुचित क्षेत्रांत बांधलेलें असल्यामुळें त्याच्या अंतरंगांतील कोरीव काम व सुबकपणा आंत गेल्याशिवाय कळण्यासारखा नाहीं. आंत जातांच मात्र तेथील श्रृंगारलेल्या कामानें मनुष्याचें मन थक्क होऊन जातें. आम्हीं तेथील मुख्य मुख्य देवळें पाहिलीं. त्यांत द्वारकाधीश, केशवदेव, राधाकृष्ण वगैरे देवळें होतीं. केशवदेवाचें देऊळ अवरंगजेबानें उध्वस्त करून त्या ठिकाणीं मशिदीची स्थापना केली. त्यानंतर पुनः हें देऊळ नवीन बांधलें आहे. त्यामुळें हें आजतरी अलीकडचें म्हणण्यास हरकत नाहीं. रात्रौ आम्ही द्वारकाधीशाच्या दर्शनास गेलों व दर्शन घेतल्यानंतर आरती वगैरेकरितां थांबलों.

‘ विश्रामघाट ’

येथील पवित्र व सुंदर घाट म्हणजे विश्रामघाट. या ठिकाणीं कंसाला मारून आल्यानंतर भगवान् श्रीकृष्णांनीं विश्रांति घेतली, म्हणून यास हें नामाभिधान प्राप्त झालें आहे. येथें दररोज संध्याकाळीं आरती होते. मथुरेंत कासवें व माकडें विपुल

आहेत. कासवाचे पाठीवर बसून माकडें यथेच्छ मजा करतात, तें पाहण्यास फारच गम्मत वाटते.

आज सायंकाळीं आम्हीं मथुरेहून निघून सिमल्यास जावयाचें ठरविलें होतें तेव्हां तेथील आमचे क्षेत्रोपाध्याय ' भगवत् चेला, हेला चोबे '. यांस लेख लिहून दिला. त्यांच्याजवळ आमचे पूर्वज श्रीमंत शंकरराव रघुनाथ यांच्या हातचा सन १७९५ इ. स.चा, श्री. राधाबाई सचीव यांचा इ. स. १८४९ चा व आमचे पूज्य वडील श्रीमंत सरकार यांचे हातचा २५-२-१८९१ सालचा लेख पहावयास मिळाला. व त्यावरूनच आम्हीं आमच्या सहीचा लेख करून दिला.

संध्याकाळीं स्टेशनवर आल्यावर आम्हीं स्वत:चें वजन् करविलें तें एक मण तेवीस शेर भरलें. बरोबर ६ वाजून ३५ मिनिटांनीं आम्हीं मथुरा जंक्शन सोडलें. स्टेशनवर पंडित राधाकृष्ण आम्हांस निरोप देण्याकरितां आले होत. आम्ही दिल्लीस ८-३० ला पोहोंचलों. तेथें गाडी २०-२५ मिनिटें थांबते. आमच्या गाडीनें बरोबर ८-५५ ला दिल्ली स्टेशन सोडलें.

यापूर्वीं आम्ही आमचे तीर्थरूप सरकार यांचे बरोबर एडवर्ड बादशहांच्या राज्यारोहण दरबारचे वेळीं दिल्लीस आलों होतों. तेव्हां पुन: दिल्लीस मुक्काम केला नाहीं.

---

## सिमला

आमची गाडी दिल्ली स्टेशन सोडून निघाली तों बरोबर रात्रौ १२ वाजून २० मिनिटांनीं अम्बाला येथें आली. तेथें आमचा मुक्काम एक तासभर झाला व १ वाजून २० मिनिटांनीं गाडी निघाली. अम्बाला तें कालकापर्यंत सुमारें दोन तास लागतात. कालका येथें आम्हीं ३ वाजून ७ मिनिटांनीं आलों. कालका तें सिमला थेट गाडी आहे. कालक्यास आम्हांस सकाळीं ९॥ वाजेपर्यंत थांबावें लागलें. तोंपर्यंत आम्ही शौच मुखमार्जन वगैरे आह्निक विधी आटोपून भोजन उरकून घेतलें व ९ वाजून ४० मिनिटांनीं कालका स्टेशन सोडलें. येथूनच सिमल्याच्या प्रवासाची खरी मजा व रम्य सृष्टिसौंदर्य दृष्टीस पडूं लागतें. निसर्ग व मानवी बुद्धी या दोघांचा सुंदर मिलाफ झाला तर जगांत काय शक्य आहे याची प्रचीति येथें पाहावयास मिळते. सिमल्याचा रस्ता खरोखरच अखंड डोंगरांतून पोखरूनच केलेला आहे. निसर्गसुंदर मजा एकीकडे पाहावयास मिळते तर मानवी प्रयत्न व आधिभौतिक शास्त्रांची अतर्क्य



घाटांतील आगगाडीच्या रस्त्याचें दृश्य, सिमला

[ पान १००

प्रगती यांमुळें निसर्गाशीं झगडा करून शास्त्रज्ञांनीं सिमल्याची नितांत-रमणीय सृष्टिसौंदर्याची अशक्य वाटणारी व क्वचितच दृष्टिपथांत येणारी शोभा साधारण मनुष्याच्या आटोक्यांत आणली आहे हेंही दृष्टीस पडतें.

कालका ते सिमला सुमारें ७० मैलांच्या प्रवासांत सृष्टिसौंदर्याचें फारच बहारीचे देखावे पाहावयास मिळतात. मधूनमधून असे १०३ बोगदे असून सभोंवार सर्व प्रदेश उंच उंच वृक्ष असलेल्या डोंगरांनीं आच्छादित असल्यामुळें हा प्रवास कंटाळवाणा न होतां एक प्रकारची मजा आणतो. आम्ही आदले दिवशींच्या रात्रींच्या प्रवासामुळें व जागरणा-मुळें जरी त्रासलों होतों तरी सभोंवतालीं पसरलेली भरपूर रम्य वनश्री पाहून आम्हांस उत्साह वाटूं लागला.

गाडींतून जात असतांना लांब दूरवर पडणाऱ्या बर्फाची मजा कांहीं औरच दिसते व शिवाय शुभ्र हिमाच्छादित अशा टेकड्या पाहून आम्हांस आमचे एक वाङ्मयधुरीण व राजकारणी स्नेही यांच्या लेखनाची आठवण झाल्याशिवाय राहिली नाहीं. त्यांनीं या देखाव्यास उपमाच द्यावयाची झाल्यास ' उत्तम काळ्या भातावर खिसलेलें भरपूर खोबरें पसरल्याप्रमाणेंच या टेकड्या दिसतात ' असेंच म्हटलें असतें. या उपमेची स्मृति आम्हांस फारच अनिवार झाल्यानें याचा उल्लेख करावासा वाटला. गाडींतून जात असतां हिरव्यागार टेकड्यांतून पसरलेलें सिमला शहर व अंतर्गत देखावा लांबूनच दिसतो. सिमला हें सृष्टिसौंदर्याचें आगरच आहे. सृष्टिदेवीचा तो सुंदर विलास म्हणजे मानवी चक्षूंना मोठी मेजवानीच म्हणावयाची !

आम्ही सिमल्यास बरोबर सायंकाळीं ६ वाजतां पोहोंचलों. रा. ब. खांडेकर यांचे मदतीमुळें पतियाळाचे महाराजसाहेब यांच्या ' स्किप्टन व्हिला ' बंगल्यांत आमची राहण्याची सोय झाली होती. आम्हीं सिमल्यास एक आठवडा काढावा, असें ठरविलें होतें व त्याप्रमाणें पुण्याचे कलेक्टर व पो. ए. यांचे मार्फत हिंदुस्थान सरकारची आगाऊच परवानगी काढून ठेविली. कारण हवा खाण्याच्या ठिकाणीं राहण्याची परवानगी संस्थानिक व राजेरजवाडे यांना आगाऊ काढावी लागते. आम्ही सिमल्यास तारीख ३० मार्च रोजीं आलों.

सिमला बड्या लोकांचें व हिंदुस्थान व पंजाब सरकारचें उन्हाळ्यांतील राहावयाचें ठिकाण म्हणून प्रख्यात आहे. तेव्हां तेथील हवेबद्दल प्रश्नच उरत नाहीं. हवा खरोखरच आनंददायक आहे. आम्हांस तिकडील थंडीची संवय नसल्यानें थोडासा त्रास झाला; परंतु गरम ऊबदार कपडे चढविले म्हणजे मात्र थंडीची मजाच येते. आमच्या नोकरलोकांनीं प्रवासांत कांहीं तूप कागदाच्या पुड्यांतून बरोबर घेतलें होतें, तें सिमल्यास जातांना थिजून इतकें घट्ट झालें कीं, जणूं काय दगडाचा गोळाच ! यावरून तेथील थंडीची साहजिकच कल्पना येईल. सुंदर वनश्री, निसर्गाची अपूर्व मजा व हिमाच्छादित डोंगराचे अद्भुत देखावे पाहण्यास मिळत असल्यामुळें थंडीचें आम्हांस कांहींच वाटलें नाहीं. सिमला येथील खरा आनंददायक व मजेशीर काल म्हटला तर हिंवाळा व त्याच्या खालोखाल वसंत ऋतु.

सिमला समुद्रसपाटीपासून सुमारें ७२५० फूट उंच आहे. याचें किमानपक्षीं रेकॉर्ड उष्णतामान १७·१ ते १४·४ असें नोंदलें गेलें आहे.



सामान्य देखावा, सिमला

[ पान १०२

शहर डोंगरांतून असल्यामुळें विवक्षित मर्यादेपर्यंतच वाहनें जातात. तेथून सर्व हालचाल रिक्शामधून करावी लागते. रिक्षा म्हणजे माणसा-कडून ओढण्याचा छकडा. थंड व डोंगराळ प्रदेशांतील माणसें फारच काटक असतात.

सिमल्यास आम्ही ६ वाजतां पोहोंचलों. घरीं येईपर्यंत ७ वाजले. आदले दिवशींच्या जाग्रणामुळें व इतक्या लांबच्या प्रवासाची दगदग झाल्यामुळें आम्हांस विश्रांतीची फारच जरूरी भासली. भोजनोत्तर लागलींच आम्ही निद्रादेवीच्या आराधनेस लागलों.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही चांगले गरम कपडे घालून डोंगरांतून हिंडण्याकरितां बाहेर पडलों. सकाळीं थोडेफार बर्फाचे तुषार पडतात असा भास होतो. आम्ही ज्या वेळीं गेलों होतों तो काळ वसंतऋतूचा असल्यानें बर्फ पडण्याचें मान कमीच होतें.

सिमला शहर हिमालयाचे दक्षिण बाजूस डोंगराच्या चढउतारावर पंजाब प्रांतांत वसलेलें आहे. सिमल्याच्या आसपास बाजूस इतस्तत: डोंगर पसरले असल्यामुळें पाहण्यासारखें म्हणजे फक्त वनश्री. येथील हवा जशी चांगली त्याप्रमाणें माणसें देखील प्रकृतीनें चांगलीं. चहूंकडे टवटवीतपणा व ताजेपणा दृष्टीस पडतो. फिकटपणा तोंडावर असलेला एकहि माणूस आमच्या दृष्टिपथांत आला नाहीं. पुष्कळसे आजारी लोक हवेकरितां व प्रकृति सुधारण्याकरितां येथें येतात.

शिल्पशास्त्राच्या दृष्टीनें उत्तम उत्तम इमारती पाहण्याचें सिमला हें स्थानच नसल्यानें आम्ही त्याची अपेक्षाहि केली नाहीं. ऐतिहासिक दृष्टीनें चारदोन इमारती तेथें अद्यापहि ( अर्थात पूर्वीपेक्षां पुष्कळ

सुधारणा केलेल्या ) अस्तित्वांत आहेत. त्यांत निर्देश करण्यासारख्या म्हणजे Kennedy House, Auckland House, Barne's Court वगैरे या होत. यांशिवाय छोटा सिमला, बोलाईगंज, प्रॉस्पेक्ट हिल व जक्को वगैरे भाग प्रेक्षणीय आहेत. आम्ही येथें राहिलों असल्यानें सवडीप्रमाणें दररोज करमणुकीकरितां वरील प्रत्येक ठिकाणीं जाऊन आलों. सिमल्यास येण्याचा उद्देश फक्त चार दिवस चांगल्या थंडगार हवेंत राहून फिरणें एवढाच होता. दररोज सकाळीं व सायंकाळीं फिरून आल्यावर भोजन वगैरे आटोपून विश्रांति घेणें व लवकर बाहेर पडणें हाच काय तो तेथील कार्यक्रम होता.

आज दोन प्रहरीं २ वाजतां चांगलाच पाऊस पडत होता; मधून-मधून बर्फहि पडत होतें; त्यामुळें पावसाची मजा दिसत होती.

सायंकाळीं पाऊस थांबल्यावर आम्ही हिंडून आलों. प्रथम उतरल्या ठिकाणीं आम्हांस दिलेली जागा अपुरी वाटूं लागली, पण संध्याकाळीं तिसऱ्या मजल्यावर जागा मिळाल्यामुळें आमची चांगली सोय झाली.

‘ छोटा सिमला ’

आज आमचा मुक्कामाचा तिसरा दिवस. सकाळीं बंगल्यांत बसूनच सृष्टिशोभेचें निरीक्षण चालू होतें. संध्याकाळीं मात्र आम्ही बाहेर पडलों व छोटा सिमल्यापर्यंत गेलों. ‘ छोटा सिमला ’ म्हणजे सिमला येथील बाजारपेठेचें ठिकाण. या भागांत विशेष महत्त्वाची एकच इमारत व ती म्हणजे ‘ पोस्ट व तार ऑफिस.’ सिमल्यास युरोपिअन लोक, गव्हर्मेंट ऑफिसें, वगैरे असल्या-मुळें सर्व कांहीं सोयी आहेत. बहुतेक सर्व जिन्नस मिळतात, पण ते महाग मिळतात एवढेंच. छोटा सिमल्यांत थोडेंफार फिरून आम्ही परत आलों.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही बाहेर पडलों नाहीं. थंडीमुळें सकाळचा कार्यक्रम आम्हांस रद्द करावा लागला. संध्याकाळीं मात्र बाहेर पडलों. आज येथील 'ॲननडेल' भाग पाहण्याचें ठरविलें होतें. सिमल्याचे सभोंवतालीं ज्या कांहीं करमणुकीच्या व परस्थ लोकांना पाहावयास योग्य अशा जागा आहेत त्यांपैकीं 'ॲननडेल' ही एक आहे. येथें पूर्वी जत्रा व नानाप्रकारचे खेळ होत असत. आतां देखील येथें व्यायामविषयक खेळ, शर्यती व करमणुकी यांकरितां सोयी केलेल्या आहेत. या जागेंत विशेष कांहीं असेल तर तें म्हणजे विस्तृत व सुंदर उद्यान. येथें युरोपिअन लोकांकरितां जिमखाना आहे. आम्ही तेथील **रेसकोर्स**, पोलो व क्रिकेट मैदानें व लायब्ररी वगैरे स्थानें पाहिलीं. तेथील एकंदर व्यवस्था व टापटीप पाहून आम्हांस फारच समाधान वाटलें. 'ॲननडेल' कडे आम्ही रिक्शामधून गेलों. उंच सखल वाटेनें रिक्शामधून हेलकावे खात जातांना गंमत वाटते.

'ॲननडेल'

त्यानंतर दुसरे दिवशीं दोन प्रहरीं ३ वाजतां बाहेर पडलों. लवकर बाहेर पडण्याचा उद्देश, सिमला हें हिंदुस्थान सरकारची उन्हाळ्याची राजधानी असल्यानें तेथील सरकारी व्हाइस-रीगल लॉज पाहण्याचा होता. ही इमारत तेथें असलेल्या इमारतींत खरोखरच सुरेख आहे. इमारत लाकडी असून एका डोंगरपठारावर बांधली असल्यामुळें तेथून लांबलांबचे देखावे चांगले पहावयास मिळतात. विशेषत: वरील टॉवरमधून पाहिल्यास सिमल्याच्या सभोंवारचें हृदयंगम दृश्य दिसतें. ही इमारत तीन मजली आहे.

'गव्हर्नमेंट हाउस'

तळमजल्यावर कौन्सिल चेंबर, बिलियर्ड रूम, खान्याची खोली, बॉलरूम, दिवाणखाना, वगैरे असून शिवाय प्रायव्हेट सेक्रेटरी व ए. डी. सी. वगैरेंचीं ऑफिसें येथेंच आहेत. पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर निजावयाच्या खोल्या, ड्रेसिंग रूम, बाथरूम, स्टडीरूम, वगैरे सर्व सुखसोईंनीं सुसज्जित अशा आहेत.

बाहेरील बाजूस चांगला बगीचा असून कांहीं कांहीं उंचवटे रंगीबेरंगी फुलांचीं फुलझाडें व वेली सोडून सुशोभित केलेले दिसतात.

या हद्दींतच Observation House आहे. Viceregal House पाहून झाल्यावर आम्ही बोलाई गंजकडे जाण्यास रिक्शांमधून निघालों. 'बोलाई गंज', 'जटोग' व जटोग ते प्रॉस्पेक्ट हिल व पुनः तेथून सिमला अशी एक चक्कर मारून परत घरीं परत आलों. घरीं परतावयास ७ वाजले.

'जक्को'

दुसरे दिवशीं आम्ही तेथील सुंदर प्रदेश व सर्वांत उंच असलेलें डोंगराचें शिखर 'जक्को' पाहावयास गेलों. समुद्रसपाटीपासून याची उंची सुमारें ८०४८ फूट आहे. हें शिखर Elysiam Hill चें आहे. आम्ही या शिखरासभोंवार जवळजवळ पांच मैल हिंडलों व सर्व प्रदेश पाहिला. जक्को हें सिमला येथील सर्वांत उंच शिखर असल्यामुळें येथून सिमल्याच्या व सिमल्याभोंवतालीं पसरलेल्या सर्व वनश्रीचें सुंदर स्वरूप दृष्टीस पडतें. आम्ही आतांपर्यंत पाहिलेले सर्व देखावे येथून एकदम पाहावयास मिळतात. जक्कोवर एक श्रीमारुतिरायाचें मंदिर आहे, त्याचें दर्शन घेऊन आम्ही परत फिरलों.

वनविहार करण्याकरितां येथें पुष्कळ रम्य जागा आहेत. बर्फाच्छादित डोंगरांच्या दऱ्याच दऱ्या पसरल्या असल्यामुळें त्यांतून सहल करीत फिरण्यास मौज वाटते.

दुसरे दिवशीं म्हणजे तारीख ५ एप्रिलला आम्हीं सिमला सोडण्याचें ठरविलें होतें. सिमल्याच्या सभोंवार पसरलेले कांहीं भाग सृष्टिसौंदर्याचे दृष्टीनें प्रेक्षणीय आहेत. पण वेळेचे अभावीं आम्हांस सर्व ठिकाणीं जातां आलें नाहीं. एकंदरींत सिमल्याचा प्रदेश एकवार पाहण्यासारखा आहे व तो पाहिल्यानंतर इतर उन्हाळ्याचीं ठिकाणें व सृष्टिसौंदर्याचे देखावे असलेलीं दुसरीं स्थानें तौलनिक दृष्टीनें पाहतां येतात. सिमल्यास एकंदरींत आमचा मुक्काम विशेष बहारीचा झाला.

---


## बनारस

दुसरे दिवशीं सकाळीं आम्हीं लवकर भोजन वगैरे आटोपून घेतलें व आमचें राहण्याचें ठिकाण ९-९। वाजतांच सोडलें. बरोबर १० वाजून २० मिनिटांनीं आमच्या गाडीनें सिमला स्टेशन सोडलें व कालका येथें ५। वाजतां आम्ही पोहोंचलों. तेथून पंजाब मेलनें ७॥ वाजतां बनारसला येण्यास आम्ही निघालों. रात्रीचें जेवण आम्ही गाडींतच घेतलें. पंजाब मेलसारखी सुखकर व जलद चालणारी गाडी आजपर्यंत आमचे पाहण्यांत नव्हती. वाटेंत आम्हांस दिल्ली स्टेशन लागलें. दिल्लीस आमची गाडी रात्रीं १२ वाजून ५० मिनिटांनीं आली. तेथून गझियाबाद येथें १ वाजून १९ मिनिटांनीं आली व नंतर कानपूरास सकाळीं ९ वाजून १५ मिनिटांनीं येऊन अर्धा तास थांबली. तेवढ्यांत स्टेशनवरील खानसाम्यानें आमचें जेवण गाडींतच आणलें व आम्ही भोजन उरकून घेतलें. कानपूर नंतर जवळ जवळ ३॥ तासांनीं आम्ही अलाहाबादेस ( प्रयाग ) सुमारें १ वाजतां पोहोंचलों व

श्रीक्षेत्र काशी येथील आमचें देउळ ( श्री शिवाशंकरेश्वर )



खालचा भाग



वरचा भाग

त्यानंतर मोंगलसराई येथें बरोबर ३-५० ला आलों. तेथें काशीस जाण्या-करितां गाडी बदलावी लागली. मोंगसलसराईहून आम्ही ४ वाजतां निघालों ते काशीस स्टेशनवर ४ वाजून ४० मिनिटांनीं पोहोंचलों. काशींत आम्ही 'शितला घांटावर' आमचें स्वतःचें म्हणजे **भोरकर मंदिर** प्रसिद्ध आहे तेथें उतरावयास गेलों. काशी शहर गंगेचे कांठीं वसलें आहे म्हणून कांहीं तरी बरें. अरुंद रस्ते व जागेच्या अभावीं शहरांतील इमारती मजल्यावर मजले चढवून बांधल्या आहेत. पूर्णपणें सूर्यप्रकाश खेळण्यास घरांतून जागाच नाहीं. रस्ते अगदीं अरुंद व दुतर्फा घरेंच घरें दिसतात. यामुळें प्रथमतः मनुष्याचें मन अगदीं उदासीन होतें. पण तेंच गंगेच्या कांठीं बांधलेले उत्तम, विस्तीर्ण घाट व सुंदर देवालयें पाहिलीं कीं, उदासीन-तेची जागा मानसिक प्रसन्नता पटकावते. काशी म्हणजे परमेश्वराचें अधिष्ठानच व आपल्या भरतवर्षांतील प्राचीन अतिप्रसिद्ध धर्मस्थान असल्यामुळें तेथील हजारों देवळांचीं गगनचुंबी शिखरें पाहून मानवी जीवितावर सत्ता गाजविणारी कांहीं तरी अद्भुत परमेश्वरी शक्ति खास असली पाहिजे व शेंकडों घाले आले असतांना देखील आज-तागायत आपल्या परमपूज्य आर्यधर्मानें अखिल जगांत आपलें पवित्र स्थान व महत्त्व अबाधित टिकविलें, याबद्दल खरोखरच कौतुक वाटूं लागतें. आपल्या हिंदु संस्कृतींत तर एकच कल्पना अगदीं दृढमूल झालेली आहे आणि ती ही कीं, मनुष्यानें एकदां तरी काशीयात्रा करावी व जमल्यास आपला देह काशीस ठेवावा. याशिवाय दुसरी गोष्ट मोक्षप्राप्तीसाठीं करावयास नको. अशा प्रकारच्या या धार्मिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण शहरांत आम्हीं पांचसहा दिवस राहून जमलें तर धार्मिक कृत्यें करण्याचें ठरविलें होतें.

संध्याकाळीं, आम्ही आलों असें कळतांच बरेच लोक भेटण्यास आले. आम्ही काशीस येतांच अगोदर गंगास्नान करून आलों व नंतर सर्वांच्या भेटी घेतल्या. गाडींत प्रवासाचा शीण आल्यामुळें बराच त्रास झाला होता. पण पवित्र गंगास्नान करितांच आम्ही ताजेतवाने झालों व खरो-खरीच मन इतकें प्रसन्न झालें कीं, आमच्या हातून पूर्वी कांहीं पातकें झालीं असल्यास तीं स्नान करतांच गंगौघाबरोबरच निघून गेलीं व गंगाजळ म्हणजे या कलियुगांत इह लोकचें पावन तीर्थच असावें, असें वाटूं लागलें. संध्याकाळीं लवकर भोजन आटोपून विश्रांति घेण्याचें योजिलें असल्यामुळें रात्रीच्या वेळीं आम्ही कोठेंहि बाहेर पडलों नाहीं.

दुसरे दिवशीं सकाळीं तेथील क्वीन्स् कॉलेजमधील संस्कृतचे अध्यापक गंगाधरशास्त्री व नागेश्वरपंत धर्माधिकारी भेटावयास आले होते.

संध्याकाळीं आम्हीं देवळें पाहण्याकरितां बाहेर पडलों. काशी शहरांत शेंकडों देवालयें आहेत. चहूंकडे देवळेंच देवळें दिसूं लागतात, त्यामुळें परप्रदेशांतील लोकांस हें सर्व शहर देवळांनींच भरलेलें आहे असें वाटतें. त्यामुळें एका पाश्चात्य प्रवाशानें याला 'देवळाचें शहर' असें म्हटलेलें आमच्या स्मरणांत आलें. काशी हें यात्रेचें आदिस्थान असल्या-मुळें जगांतील असंख्य लोक दरवर्षी त्यानिमित्तानें येथें येत असतात, व सर्व लोकांच्या उपयोगी पडावें म्हणून अगर येथें देवळें बांधिलीं असतां मोक्षप्राप्ति होते अशा समजुतीनें हिंदुस्थानांतील राजेरजवाडे, अमीर उमराव व धनिक लोक यांनीं आपआपल्या ऐपतीप्रमाणें देवळें, घाट, व कोणीं अन्नछत्रें, सदावर्त, वगैरे बांधून ठेविलीं आहेत व त्याच भावनेनें आमच्या वडलांनींहि येथें देऊळ बांधलेलें आहे व त्यांतच



श्रीविश्वेश्वराचें सुवर्ण मंदिर, बनारस

[ पान १११

आम्हीं उतरलों होतों. याहि हिंदूंच्या धर्मस्थानावर मुसलमानी सत्तेनें आपले पराक्रम गाजविल्याचीं चिन्हें दृष्टीस पडतात. पण आर्यधर्माचें श्रेष्ठत्व त्याहि सत्तेला पुरून उरलें यांत शंका नाहीं.

येथील देवळांत श्रीविश्वेश्वर व काळभैरव हीं देवळें फारच प्रसिद्ध आहेत. पहिल्या देवळाच्या कांहीं भागावर मुसलमानांचा छापा आलेला होता, कारण मुसलमान लोकांनीं तेथें आपली मशीद बांधली आहे. काळभैरवाचें देऊळ मात्र अविंधांच्या स्पर्शापासून अलिप्त राहिलें आहे. आम्हांला येथें अशी एक दंतकथा ऐकावयास मिळाली कीं, काळभैरवाचे देवळांत मुसलमान शिरूं लागतांच असंख्य भुंगे उडाले व त्यामुळें त्यांना आंत जातां आलें नाहीं. गोष्ट खरी असो वा खोटी असो, अद्याप काळ-भैरवाचें देऊळ सुस्थितींत आहे. काशीस घाटहि पुष्कळ म्हणजे सुमारें ऐशीं एक असावेत. त्यांत मणकर्णिकाघाट फारच सुंदर व प्रसिद्ध आहे व त्याचें पावित्र्य लोक फारच मानतात. देवळें वगैरे पाहण्यापूर्वीं आम्ही तेथील प्रसिद्ध असलेला ' कंपनीचा बाग ' पाहून आलों.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही मनकर्णिका घांटावर स्नानास जाऊन आलों. दोन प्रहरीं काशीचे कलेक्टर C. A. C. Streatfield साहेब यांना भेटावयास गेलों. त्यांची आमची भेट झाली व त्यांनीं, आम्ही जेथें जाऊं तेथें आमच्या बरोबर कांहीं कॉन्स्टेबल देण्याची व्यवस्था केली.

संध्याकाळीं काशीविश्वेश्वराचे दर्शनाकरितां देवळाकडे गेलों. या देवळावरील शिखर पूर्ण सोनेरी आहे म्हणून यास ' सुवर्ण देवालय ' अशीहि संज्ञा प्राप्त झाली आहे. दर्शन घेऊन आम्ही घरीं परत आलों.

---

# अयोध्या

काशीपर्यंत अनायासें आलों असल्यानें व शिवाय श्रीराम आमचें कुलदैवत व अयोध्या श्रीरामाच्या राजधानीचें ठिकाण असल्यामुळें एखादा दिवसच तेथें काढून लागलींच परत येण्याचें ठरवून गुरुवारीं रात्रीं १२ वाजून ४५ मिनिटांनीं आम्हीं अयोध्येस जाण्याकरितां काशी स्टेशन सोडलें. अयोध्येस बरोबर सकाळीं ६॥। वाजतां पोहोंचलों.

अयोध्या ही सप्तपुऱ्यांपैकीं एक असल्यानें धार्मिक दृष्ट्या महत्त्वाचें स्थान आहे. शिवाय श्रीरामाची जन्मभूमि व पवित्र शरयु नदीचें तीर्थ असल्यानें आम्ही एका दिवसांत जमेल त्याप्रमाणें धर्मकृत्यें करावीं असें मनाशीं योजिलें.

अयोध्येचें स्टेशन अगदींच लहान आहे व तेथील वाहनें देखील फारच त्रासदायक वाटलीं. स्टेशनपासून गांव अर्धा मैल आहे. आम्हांस तेथें सायंकाळपर्यंतचा काळ काढावयाचा असल्यामुळें तेथील शरयुतीरावर असलेलें जठारांचें गोरा रामाचें देऊळ आम्हांस उतरावयास मिळालें.

तेथील गोपाळराव आपटे, बिंदुमाधव वहिवाटदार यांचे मदतीनें राहण्याची आमची सर्व व्यवस्था ठीक झाली.

अयोध्या श्रीरामाचें जन्मस्थान म्हणून त्यास आज महत्त्व. त्याबद्दल एक आख्यायिका पुराणांत आम्हीं वाचली आहे, ती अशी: श्रीरामांनीं आपलें अवतारकृत्य संपवून ज्या वेळीं स्वर्गारोहण केलें त्या वेळीं अयोध्येंतील सर्व माणसें, पशुपक्षी वगैरे श्रीरामाबरोबर गेले. पुढें या नगरीची व्यवस्था व जीर्णोद्धार विक्रमराजाच्या कारकीर्दींत झाला. खरें काय असेल तें असो! मोंगलांच्या राजवटींत इतर धर्मस्थानांप्रमाणें याहि नगरीला उध्वस्तरूप प्राप्त झालें. श्रीरामजन्मस्थानाच्या जागेवर मुसलमानांनीं मशीद बांधली आहे, व आज अयोध्येंत मुसलमानांची वस्ती विपुल आहे, ही गोष्ट गत इतिहासाची साक्ष पटवील.

सकाळीं आम्ही पवित्र शरयू नदींत स्नान करून नागेश्वराचें दर्शन घेतलें व कांहीं धार्मिक कृत्यें केलीं. नंतर भोजन वगैरे करून शहर पाहण्यासाठीं बाहेर पडलों. येथें श्रीरामचंद्राचा वाडा, दरबार, कौसल्या, सुमित्रा, वगैरे राण्यांचे महाल वगैरे दाखवितात. तेथें आज विटा व पायाच्या खुणा आहेत. जागा अस्तित्वांत आहेत, एवढ्यावरून फार तर पूर्वीं येथें राजवाडे वगैरे होते असें म्हणावें. अयोध्येस रामाचीं देवळें मुबलक आहेत. मुख्य असें एकच देऊळ आहे. रामजन्मास येथें फारच मोठी यात्रा भरते. येथें शरयूचे कांठीं एक शिवलिंग आहे तें पाहण्यास आम्ही गेलों. त्याची प्रतिष्ठापना कुशानें केली, असें आम्हांला सांगितलें. त्यावर चंद्राचीं, धनुष्याचीं व गंगेचीं वगैरे चिन्हें आहेत.

संध्याकाळीं आम्ही काशीस जाणार असल्यानें घरीं लवकरच परतलों.

# अयोध्या

काशीपर्यंत अनायासें आलों असल्यानें व शिवाय श्रीराम आमचें कुलदैवत व अयोध्या श्रीरामाच्या राजधानीचें ठिकाण असल्यामुळें एखादा दिवसच तेथें काढून लागलींच परत येण्याचें ठरवून गुरुवारीं रात्रीं १२ वाजून ४५ मिनिटांनीं आम्हीं अयोध्येस जाण्याकरितां काशी स्टेशन सोडलें. अयोध्येस बरोबर सकाळीं ६॥। वाजतां पोहोंचलों.

अयोध्या ही सप्तपुऱ्यांपैकीं एक असल्यानें धार्मिक दृष्ट्या महत्त्वाचें स्थान आहे. शिवाय श्रीरामाची जन्मभूमि व पवित्र शरयु नदीचें तीर्थ असल्यानें आम्ही एका दिवसांत जमेल त्याप्रमाणें धर्मकृत्यें करावीं असें मनाशीं योजिलें.

अयोध्येचें स्टेशन अगदींच लहान आहे व तेथील वाहनें देखील फारच त्रासदायक वाटलीं. स्टेशनपासून गांव अर्धा मैल आहे. आम्हांस तेथें सायंकाळपर्यंतचा काळ काढावयाचा असल्यामुळें तेथील शरयुतीरावर असलेलें जठारांचें गोरा रामाचें देऊळ आम्हांस उतरावयास मिळालें.

तेथील गोपाळराव आपटे, बिंदुमाधव वहिवाटदार यांचे मदतीनें राहण्याची आमची सर्व व्यवस्था ठीक झाली.

अयोध्या श्रीरामाचें जन्मस्थान म्हणून त्यास आज महत्त्व. त्याबद्दल एक आख्यायिका पुराणांत आम्हीं वाचली आहे, ती अशी: श्रीरामांनीं आपलें अवतारकृत्य संपवून ज्या वेळीं स्वर्गारोहण केलें त्या वेळीं अयोध्येंतील सर्व माणसें, पशुपक्षी वगैरे श्रीरामाबरोबर गेले. पुढें या नगरीची व्यवस्था व जीर्णोद्धार विक्रमराजाच्या कारकीर्दीत झाला. खरें काय असेल तें असो ! मोंगलांच्या राजवटींत इतर धर्मस्थानांप्रमाणें याहि नगरीला उध्वस्तरूप प्राप्त झालें. श्रीरामजन्मस्थानाच्या जागेवर मुसलमानांनीं मशीद बांधली आहे, व आज अयोध्येंत मुसलमानांची वस्ती विपुल आहे, ही गोष्ट गत इतिहासाची साक्ष पटवील.

सकाळीं आम्ही पवित्र शरयू नदींत स्नान करून नागेश्वराचें दर्शन घेतलें व कांहीं धार्मिक कृत्यें केलीं. नंतर भोजन वगैरे करून शहर पाहण्यासाठीं बाहेर पडलों. येथें श्रीरामचंद्राचा वाडा, दरबार, कौसल्या, सुमित्रा, वगैरे राण्यांचे महाल वगैरे दाखवितात. तेथें आज विटा व पायाच्या खुणा आहेत. जागा अस्तित्वांत आहेत, एवढ्यावरून फार तर पूर्वीं येथें राजवाडे वगैरे होते असें म्हणावें. अयोध्येस रामाचीं देवळें मुबलक आहेत. मुख्य असें एकच देऊळ आहे. रामजन्मास येथें फारच मोठी यात्रा भरते. येथें शरयूचे कांठीं एक शिवलिंग आहे तें पाहण्यास आम्ही गेलों. त्याची प्रतिष्ठापना कुशानें केली, असें आम्हांला सांगितलें. त्यावर चंद्राचीं, धनुष्याचीं व गंगेचीं वगैरे चिन्हें आहेत.

संध्याकाळीं आम्ही काशीस जाणार असल्यानें घरीं लवकरच परतलों.

**अयोध्या**

तेथील आमचे उपाध्ये लालाबिहारी बिन कुदीराम पांडे व लाल बहादूर बिन विश्वंभर पांडे असे आहेत. आमचे वडील श्रीसरकार शंकरराव चिमणाजी सचीव यांचे सहीचा ता. ३१-१-१८७९ शके १८०० चा लेख पाहून आम्हीं त्यांना पुन: लेख करून दिला. वरील-पैकीं लालबहादूर हे हयात नव्हते व त्यांना मुलगा नसल्यानें त्यांची पत्नी राजदुलारी पांडे यांचें नांव घालून लेख दिला. असो !

---



सामान्य देखावा, बनारस

[ पान ११४

# पुनः काशी

यानंतर रात्रौ ८॥ वाजतां आम्ही अयोध्या सोडली व काशीस १२ वाजतां पोंचलों.

येथील हवा फारच उष्ण, तर सिमला येथील हवा फारच थंड होती. त्यांतील एकदम झालेल्या बदलाच्या योगानें व रात्रीं बारा वाजतां घरीं आल्यावर दिवसभरच्या दगदगीनें व अवेळीं येणें झाल्यामुळें आम्हांस झोंप मुळींच मिळाली नाहीं. त्यामुळें पित्त वाढून फारच त्रास होऊं लागला. दोन प्रहरीं जेवणाचे वेळीं उलटया होऊन अंगावर गांधी उठल्या. आम्ही त्या दिवशीं बाहेर कोठेंहि न पडतां पूर्ण विश्रांति घेतली. आजपर्यंत इतका प्रवास झाला, पण आम्ही आजारी पडलों नाहीं. आमची प्रकृति मूळची अशक्त असल्यामुळें त्याबद्दल आम्हांस वरचेवर भीति वाटत होती, पण तसें कांहीं आतांपर्यंत झालें नाहीं.

दुसरे दिवशींहि आम्ही आजारीच होतों. त्यामुळें वे. शा. सं. हरिशास्त्री पारखी यांच्याकडून आम्ही श्रीविश्वेश्वराची पूजा करवून महारुद्र वगैरे यथासांग करविला व त्या दिवशीं १११ पानांचे ब्राह्मणभोजन

घातलें. पात्रीं दहा आणे दक्षणा देऊन आम्ही ब्राह्मणांची संभावना केली. आमच्या कै. सौ. राणीसाहेब यांनीं ५००।६०० सुवासिनींना बोलावून हळदकुंकवाचा समारंभ केला.

आज सकाळीं आमच्या ओळखीचे विनायकशास्त्री चिरपुटकर पुण्याहून आले. त्यांची भेट झाली. त्यांनीं आमचे चि. सदाशिव बाळ आजारी आहेत व त्यांना ताप येत आहे, असें सांगितल्यावरून त्यांच्याबद्दल फारच काळजी वाटूं लागली व आतां जास्त दिवस न थांबतां लवकरच परत जावें, असें वाटूं लागलें. तरी पण काशी हें ज्ञानसंपन्न वेदोनारायणांचें व विद्वान् पंडितांचें माहेरघर असल्यानें उद्यांचे दिवस राहून व एक सभा बोलावून त्यांची योग्य संभावना करावी, असें आम्हीं योजिलें.

चिरपुटकरांकडून श्री. शांताबाई हेबळीकरांचे यजमान दिवंगत झाल्याचें दु:खद वर्तमान कळलें. त्यामुळेंही आज आमचें मन व्यग्र होऊन गेलें होतें.

ठरल्याप्रमाणें दुसरे दिवशीं आम्ही काळभैरवाची पूजा करविली व विद्वान् ब्राह्मणांची सभा बोलाविली. जवळजवळ शंभर ब्राह्मण जमले होते. त्यांना प्रत्येकीं एक एक रुपया दक्षणा देऊन आम्हीं त्यांची संभावना केली.

१ गंगाधरशास्त्री.
१ यज्ञेश्वर दीक्षित.
१ गोपाळराव आपटे.
१ नारायण भय्या.
१ नागेश्वरपंत धर्माधिकारी.
१ हरिशास्त्री पारखी.
१ गणेश काशिनाथ दीक्षित.
१ व्यासजी उपाध्ये.

शिवाय उपरोक्त मंडळींना आम्हीं योग्य प्रकारें देणग्या देऊन त्यांची संभावनाहि केली. यास सुमारें शंभर रुपये खर्च झाला.

हे दोन दिवस आम्हांस थंडी व ज्वर यांपासून त्रास झाला. आम्हीं आतां दुसरे दिवशीं सकाळीं काशी सोडण्याचें ठरविलें होतें.

# भोरास परत

श्रीकाशीविश्वेश्वराचें दर्शन घेऊन आम्हीं सकाळीं बरोबर ६ वाजून २० मि.नीं काशी स्टेशन सोडलें. त्या पवित्र धर्मस्थानाला एकवार नमस्कार करून पुन: दर्शन घडवावें अशी गाडींतूनच मनोभावें प्रार्थना केली. मोंगलसराईला आम्ही सकाळीं ७ वाजतां आलों व तेथें जेवण वगैरे उरकून घेतलें. आमचें लगेज बैलगाड्यांतून पूर्वींच तेथें आलें होतें. मोंगलसराईहून कलकत्ता मेलनें जबलपूर जंक्शनवरून पुण्यास येण्यास निघालों. वाटेंत परत येतांना मनमाडास उतरण्याचें आमचे ती. मामा व श्वशूर कै. श्रीमंत बाळासाहेब विंचूरकर यांना कबूल केल्याप्रमाणें सकाळीं ९ वाजतां मनमाड येथें उतरलों. नेहमींची गाडीची वेळ ६॥ होती. पण आज तीन तास उशीर झाला. स्टेशनवर आम्हांस घेण्यास श्री. भाऊसाहेब विंचूरकर आले होते. मनमाडास आम्ही स्वत: एक दोन हुजरे व एखादा कारकून घेऊन उतरलों व कै. सौ. राणीसाहेब इतर परिवारासह पुण्यास जाण्याकरितां कल्याणकडे रवाना झाल्या.

घरीं आल्यावर ती. मामासाहेब व मामीसाहेब यांची भेट झाली.

मनमाड

आमचें प्रथम कुटुंब कै. सौ. गंगुबाईसाहेब यांच्या वियोगामुळें आम्हांला मनमाड येथें फारच चमत्कारिक व खिन्न वाटूं लागलें. ती. मामासाहेब यांनीं राहण्याबद्दल फारच आग्रह केला. पण एक तर वरील कारणाकरितां व दुसरें चि. सदाशिवबाळ यांची प्रकृति बरी नसल्यामुळें व आमची स्वतःचीहि तब्येत नादुरुस्त झाल्यामुळें आम्ही तेथें राहिलों नाहीं. रात्रौ ९ चे गाडीनें निघून दुसरे दिवशीं सकाळीं ७॥ वाजतां पुण्यास आल्यावर चि. सदाशिवबाळ यांची तब्येत बरी आहे असें कळलें व तें ऐकून समाधान वाटलें.

पुण्यास आम्ही दोन दिवस राहिलों व प्रकृति एकदोन डॉक्टरांकडून तपासून घेतली. दांत दुखत असल्यामुळें दंतवैद्याकडूनहि तपासणी करून घेतली व भोरास ता. १८ एप्रिल १९०९ रोजीं सकाळीं परत आलों. संध्याकाळीं ती. सरकार व मातोश्री मुलांसह आंबवड्याहून परत आल्या.

---

# उपसंहार

आम्हीं भोर सोडल्यानंतर सुमारें दोन महिने प्रवासांत काढले. या दोन महिन्यांत आमचा एकंदर ३२५९ मैल प्रवास झाला व यास आम्हांस सुमारें ९९९२-१४-७ म्हणजे जवळ जवळ दहा हजार रुपये खर्च आला. आमच्या संकल्पित उद्देशाप्रमाणें नानाप्रकारचे लोक, त्यांच्यांतील रूढ असलेल्या चालीरीति, देशरिवाज वगैरे अवलोकनांत आल्यानें आमच्यावरील पूर्व संस्कारांत थोडा फार बदल होऊन मानसिक उदासीनता जाऊन प्रकृतीवर इष्ट परिणाम तर झालाच, किंबहुना याशिवाय आमचीं मतें कांहीं अंशीं बदलण्यास प्रवास हें एक कारण घडलें असें म्हटल्यास त्यांत कांहीं वावगें नाहीं. पण याबद्दल सविस्तर विवेचन आम्हीं प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें सर्व प्रवासवृत्त पूर्णपणें लिहून झाल्या-नंतर संकलित स्वरूपांत करणार असल्यानें त्याबद्दल आतांच ऊहापोह करण्यांत अर्थ नाहीं. आम्हीं प्रवास करीत असतां ठिकठिकाणीं थांबून तेथील रम्य स्थानें व इतिहासप्रसिद्ध ठिकाणें पाहिलीं. त्या वेळीं तेथील

## उपसंहार

ज्या ज्या लोकांनीं आम्हांस मदत केली त्यांना प्रवासाहून आल्यानंतर श्रीक्षेत्र काशीचा गंगाप्रसाद म्हणून आम्हीं कांहीं वस्तू पाठवून त्यांच्या मदतचिी स्वल्पांशानें कां होईना परतफेड केली. याव्यतिरिक्तदेखील आमचे आप्त, इष्ट, स्नेही वगैरे मंडळींना गंगाप्रसादाप्रीत्यर्थ कांहीं जिन्नस दिले. त्यासंबंधीं सविस्तर यादी आम्हीं पुढें जोडली आहे, तीवरून कल्पना येईल. त्याचप्रमाणें प्रवासामधील मुख्य मुख्य शहरांतील अंतर सर्वसाधारण प्रवासी माणसास समजावें म्हणून त्याचेंहि एक टिपण पण जोडलें आहे. वास्तविक रेल्वेचें भाडें देण्यास हवें, पण आम्हीं सर्व प्रवास फर्स्टक्लासमधून केला असल्यामुळें त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं, व शिवाय भाड्याचे दर वरचेवर बदलतात असें वाटल्यावरून भाड्यासंबंधीं माहिती दिली नाहीं. यापुढें आम्ही आणखी दोनचार ठिकाणच्या प्रवासवर्णनांसंबंधीं लिखाणाची जुळवाजुळव करीत आहोंत. या आमच्या प्रथम लिखाणाचा प्रवासेच्छु माणसांस उपयोग होऊन त्यांच्याकडून याचा स्वीकार झाल्यास आमच्या पुढील लेखनास उत्तेजन मिळेल यांत शंका नाहीं.

---

# परिशिष्ट ( अ )

## प्रवासाचें माइलेज

प्रमुख शहरांमधील आगगाडीनें अंतर दर्शविणारें टिपण

| शहरांचीं नांवें | | | मैल |
|---|---|---|---|
| पुणें ते मुंबई | ... | ... | ११९ |
| मुंबई ते बडोदें | ... | ... | २४८ |
| बडोदा ते अहमदाबाद | ... | ... | ६२ |
| अहमदाबाद ते अबू | ... | ... | ११५ |
| अबू ते अजमीर | ... | ... | १९० |
| अजमीर ते जयपूर | ... | ... | ८४ |
| जयपूर ते भरतपूर | ... | ... | ११७ |
| भरतपूर ते आग्रा | ... | ... | ३२ |
| आग्रा ते मथुरा | ... | ... | ३३ |
| मथुरा ते सिमला | ... | ... | ३४७ |
| सिमला ते बनारस | ... | ... | ७२४ |
| बनारस ते अयोध्या | ... | ... | १२० |
| अयोध्या ते बनारस | ... | ... | १२० |
| बनारस ते मनमाड | ... | ... | ७५४ |
| मनमाड ते पुणें | ... | ... | १९४ |
| | | एकूण | ३२५९ मैल |

# परिशिष्ट ( ब )

श्री गंगाप्रसाद दिलेल्या माणसांची यादी

बडोदें

१ श्रीमंत चिंतामणराव ऊर्फ भाऊसाहेब मुजुमदार

१ शंकरराव कृष्ण काठेवाड दिवाणजी

१ रा. शंकरराव विष्णु पुराणीक

१ रा. आचार्य वकील

१ रा. बळवंतराव पुराणीक

१ रा. गणेश भास्कर साने वकील

१ रा. रंगोपंत हरी कोठावळे

१ रा. चिपळूणकर वकील

अहमदाबाद

१ रा. पाटील वकील

१ रा. सीताराम बाळकृष्ण करंदीकर

१ अहमदाबाद येथील बंगल्याचे मालक

अजमीर

१ रा. गणेश रामचंद्र ऊर्फ काकासाहेब खांडेकर

१ रा. रघुनाथ भिमाजी फाटक

भरतपूर

१ [illegible] डेकर

REFBK-0000572

आग्रा

१ लाला जयकिसनदास

मथुरा

१ पंडित राधाकृष्ण

१ भरतपूर दरबार वकील

अबू

१ शंकरराव बळवंत केळकर

जयपूर

१ विश्वेश्वरशास्त्री द्रविड

सिमला

१ पतियाळा दरबार वकील

मुंबई

१ शेठ खेमराज श्रीकृष्णदास

१ शेठ पुरुषोत्तम विश्राम मावजी

१ श्रीमंत शिवदेवराव ऊर्फ भाऊसाहेब विंचूरकर

१ श्रीमंत बाबासाहेब चांदवडकर

१ श्री. विसूभाऊ साळवेकर, सरदारगृह मॅनेजर

१ डॉ. लक्ष्मण नीळकंठ पुरोहित

पुणें

१ रा. वासुदेव गोपाळ पुराणीक

१ रा. ब. महादेव कोंडो ऊर्फ तात्यासाहेब कुमठेकर

१ रा. कोंडो महादेव ऊर्फ दादासाहेब कुमठेकर

परिशिष्ट (ब)

१ श्री. सरदार गणपतराव दामोदरराव पानसे

१ श्रीमंत श्रीधर विठ्ठल ऊर्फ बाळासाहेब नातू

१ रा. विठ्ठल नारायण करंदीकर

सातारा

१ रा. ब. दत्तात्रय बळवंत ऊर्फ बापूसाहेब पारसनीस

१ रा. गंगाधर बल्लाळ लेले, मास्तर, फलटण

१ रा. ब. नारायण गणेश देशपांडे, शिरवळ

अस्तु

श्रीराम

वरील सर्व मंडळींना 'गंगाप्रसाद' म्हणून व इतर सर्व नोकरवर्गास बक्षीस व श्रीक्षेत्र काशी व इतर तीर्थांचे ठिकाणीं भिक्षुक मंडळींना दक्षिणा वगैरेकरितां आलेला एकूण खर्च अदमासें रु. ३३७६.